स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ अंक १८ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ मे २०२३

पाक्षिक

समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट



# दक्षिण भारताच्या वेशीवर हिंदुत्व आणि 'केरला स्टोरी'ही फेल

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५
अंक १८ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ मे २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.
**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाउंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** दक्षिण भारताच्या वेशीवर हिंदुत्व आणि ‘केरला स्टोरी’ही फेल – ३ / **दिल्ली दरबार :** कर्नाटकच्या विजयामुळे काँग्रेसला मिळाला भाजपला पराभूत करण्याचा आत्मविश्वास – **विचक्षण बोधे** – ५ / कर्नाटक निवडणूक निकालाचा अर्थ – **प्रा. नागार्जुन वाडेकर** – ९ / महा–राजकारण आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय – **अनंत बागाईतकर** – १३ / **रेशीम आणि किडे :** काखेत कळसा अन् गावाला वळसा! – **संजय पवार** – १६ / न्यायालयीन निकाल, एन्काऊंटर्स व बुलडोझर्समुळे धार्मिक ध्रुवीकरणास मदत – **कॉ. भीमराव बनसोड** – १८ / घटना : देशाचे चारित्र्य बदलण्याचा प्रयत्न – **बी.जी. वाघ** – २१ / शेतकऱ्यांचे हितकरी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर – **डॉ. विजयकुमार वावळे** – २५ / ‘आंबेडकर : अ लाईफ’ या ग्रंथ परीक्षणाच्या निमित्ताने! – **बी.व्ही. जोंधळे** – २८ / बुद्धाच्या संदेशात जागतिक प्रश्नांची उत्तरे – **निरंजन पाटील** – ३१ / **कोणता भारत :** ३६ – दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे... । ‘द केरला स्टोरी’ चित्रपट नव्हे, तर सांस्कृतिक संघर्षासाठी ठिणगी **कविता :** बाबुराव बागूल ऊर्फ आबासाठी... – **उत्तम कांबळ** । परतीच्या प्रवासाला असताना डार्विन भेटला – प्रभू राजगडकर । मार्ग... – **जी. संदीप** – ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय


# दक्षिण भारताच्या वेशीवर हिंदुत्व आणि ‘केरला स्टोरी’ही फेल




पुढच्या वर्षी हिंदू राष्ट्र करण्यास निघालेल्या आणि त्यासाठी गेली काही वर्षे कर्नाटकाच्या किनारपट्टीवर दुहीची, द्वेषाची बिजे पेरणाऱ्या हिंदुत्ववाद्यांना दक्षिण भारताचे प्रवेशद्वार असलेल्या या राज्यात पुनर्प्रवेश बंद झाला. पुन्हा एकदा सगळा भारत जिंकण्याची मोहीम आखलेल्या आणि त्यासाठी कमरेखाली आणि वर वार करणाऱ्या भाजपला कसे तरी लज्जारक्षणापुरते वस्त्र मिळाले आहे. येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हिंदुत्वाचे कार्ड लोकांनी झिडकारणे याला वेगवेगळे अर्थ आहेत. देवाधर्माच्या नावाने फार काळ टिकून राहता येत नाही. त्यातून दिसणारे चमत्कार तात्कालिक असतात. बजरंगाचे नाव फार काळ चालत नाही. कारण वैतागलेला बजरंग आपल्यावरच गदा फिरवतो आणि दिल्लीत उपोषण करणाऱ्या महिला खेडाळूंऐवजी धार्मिक भावना भडकावणाऱ्या ‘केरला स्टोरी’ या भगव्या चित्रपटाची कथाही फार काळ ताणता येत नाही. तिचा सप्ताह करता येत नाही, हेही कर्नाटकातील जनतेने थोडथोडक्या नव्हे, तर एकशे छत्तीस जागा काँग्रेसच्या पदरात टाकून सिद्ध केले आहे. किनारपट्टीवर भगव्याची पेरणीही उगवत नाही आणि ‘भारत जोडो’ या राहुल गांधींच्या उपक्रमांत सहभागी असलेल्या ३९ मतदारसंघातही कमळ खुलत नाही, याचा अर्थ राजकारणात महानायक होऊ पाहणाऱ्या मोदी आणि शाह या जोडगोळीने घ्यायला हवा. लोकशाही व्यवस्थेला धर्मात बुडवण्याच्या काही मर्यादा असतात. सतत भगवान के नाम दे देता.. असे म्हणत थाळी घेऊन फिरता येत नाही. कर्तृत्वाचे खोटे फुगेही फुगवता येत नाहीत. गेल्या दहा वर्षांत सर्वात अधिक संघर्ष कर्नाटकात झाले असतील. त्यात कलबुर्गी, गौरी, पानसरे, दाभोलकर यांच्या हत्याही आल्या. बजरंगाचे नाव घेऊन अल्पसंख्याकांना दाबण्याचाही प्रयत्न झाला. त्यालाही तात्पुरते यश येत होतेच. उत्तर प्रदेशात बुलडोझर आणि कर्नाटकात गदा फिरवण्याचा उपक्रम सदासर्वकाळ यशस्वी होऊ शकत नाही, हे कर्नाटकातील जनतेने मोठ्या धाडसाने सांगितले आहे. दबले गेलेले दलित-मुस्लिम आणि दाबला जात असलेला लिंगायत समाज बेडरपणे काँग्रेसच्या मागे आणि त्यातही द्वेषाची दुकाने बंद करून प्रेमाचे झोकळ सुरू करण्यास निघालेल्या राहुल गांधींच्या, प्रियंका गांधींच्या आणि सोनिया व खरगे यांच्या मागे राहिला. गांधी कुटुंबातील अध्यक्ष नसताना काँग्रेसने ही निवडणूक जिंकून दाखवली. कर्नाटक हे खरगे यांचे राज्य आहे. भूमिपुत्राच्या मागेही कर्नाटक एकदिलानं राहिला. देवाच्या नावाने नव्हे, तर काँग्रेसने माणसाच्या नावाने निवडणूक लढवली आणि जिंकून दाखवली. या निवडणुकीचा परिणाम कोमात घालवल्या गेलेल्या देशभरातील विरोधकांवर मिळणार आहे. थोडीफार का असेना; पण पुन्हा पाय

गच्च रोवून उभे राहण्याची संधी त्यांना मिळणार आहे. शिवाय हिंदुत्ववादी शक्ती दोन नायकांकडे संशयित नजरेनंही पाहणार आहे. या दोन नायकांना थोडं स्वतःकडे पहावं लागणार आहे आणि राजकारण म्हणजे वक्तृत्व स्पर्धा नव्हे, हेही ठरवावे लागणार आहे. निवडणूक काळात मुख्य कारभाऱ्याने काँग्रेसवर टीका करताना त्यांनी आपल्याला दिलेल्या कथित ९१ शिव्यांचा पाढा वाचून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला. पण लोकांना हेही ठाऊक होते, की गेल्या दहा-बारा वर्षांत भाजपने, हिंदुत्ववाद्यांनी ९१ हजार शिव्या काँग्रेसला दिल्या आहेत. उगवत्या नेत्याची पप्पू म्हणून हेटाळणी करण्यापासून ते त्यांच्या मानेविषयी आक्षेपार्ह शब्द वापरण्यापर्यंत सर्व काही घडले आहे. लोकांच्या लक्षात काहीच राहत नाही असे समजणे गाढवपणाचे आहे. त्यांच्याही मेंदूत मेमरी कार्ड असते आणि त्यांच्याही मनात काही घोळत असते, हे या नायकांनी समजून घ्यायला हवे. बहुमताचा बुलडोझर तेव्हापर्यंतच चालतो जोपर्यंत चकवली गेलेली लोकभावना त्यामागे असते. सैतानी बहुमत असते. हे बहुमतही कमाल करणाऱ्या बर्फासारखे असते. कधीतरी तेही विरघळायला लागते, जसे की ते कर्नाटकात, हिमाचलमध्ये, राजस्थानात विरघळले आहे. दक्षिण भारतात बर्फ तयारच होऊ शकले नाही. कारण हा मुळातच उष्णप्रदेश आहे. भाजपची सरकारे फक्त पंधरा राज्यांत आहेत. त्यातही पूर्ण बहुमत असणारी नऊ राज्येच आहेत. उत्तराखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, गोवा, आसाम, त्रिपुरा, मणिपूर आणि अरूणाचल ही ती नऊ राज्ये आहेत. महाराष्ट्र, हरियाणा, सिक्कीम, मेघालय, नागालँड, पाँडिचेरी आदी राज्यांत भाजपने छोट्या-मोठ्या प्रादेशिक पक्षांचा टेकू घेऊन सरकारे बनवली आहेत. शहाणे लोक असाही अर्थ काढतील, की भाजपच्या ताब्यात ४५ टक्के, तर काँग्रेसच्या ताब्यात २५ टक्के मतदार असतील. आठ महत्त्वाच्या राज्यांत या दोन्हीही पक्षांना स्थान नाही. हे सर्व खरे असले, तरी टिऱ्या बडवण्यात आणि रेटून खोटे बोलण्यात त्याचा म्हणजे भाजपचा हात कोणी धरू शकत नाही. जी-२० परिषदेचे मोदींनी किती भांडवल केले. बीपीएलवाल्या राष्ट्रांची ही संघटना आहे. तिचे आयोजन भारतात झाले म्हणून कर्ज काढून भारत सजवण्याचे कारण काय आणि त्यातून भारत महासत्ता कसे बनणार हे त्यांनाच ठाऊक. मृगजळालाच पाणी समजण्याची ही रीत आहे.


कर्नाटकात यावेळी काँग्रेस शहाणपणाने वागली. राज्य पातळीवर होणाऱ्या चाळीस टक्के भ्रष्टाचाराचा हिशेब लोकांपर्यंत पोहोचवण्यात ती यशस्वी झाली. एरव्ही भाजप विरोधकांना प्रतिक्रियावादी बनवत असते. यांनी काही तरी बोलावे आणि विरोधकांनी फक्त बाईट देण्याची घाई करावी, असे वातावरण भाजप नेहमीच तयार करत असते. यावेळेला कर्नाटकात काँग्रेसने त्यास बळी पडायचे नाही असे ठरवले. भाजपच्या हातात फक्त केंद्राने केलेला कथित पराक्रम होता. काँग्रेसने भाजपच्या सापळ्यात न अडकता आपण काय करणार आहोत, हे सांगण्यावर आणि ते तळात पोहोचवण्यावर भर दिला. जगण्या-मरण्याच्या प्रश्नांना काँग्रेस थेट भिडली. तिने मुस्लिमांच्या आरक्षणालाही सहजपणे हात घातला आणि बजरंग दलाकडेही कठोरपणे पाहिले. धार्मिक भावनांचे काय होईल याचा विचार करण्याऐवजी त्यात अडकलेल्या, अडकू पाहणाऱ्या जनतेला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्यांना गदांकडे नव्हे, तर जगण्याच्या वाटांकडे नेण्याचा प्रयत्न केला. लोककल्याणाच्या लाटा तयार करून हिंदुत्ववाद्यांनी तयार केलली बिळे आणि वाळूचे किल्ले पुसून टाकली. महाशक्तिमान बनलेल्या भाजपकडे प्रचंड सामग्री होती. संवाद आणि पटकथा लिहून देणारे लोक होते, सांस्कृतिक कलह तीव्र करणारे चित्रपट होते. पण काँग्रेसने तसे काही न करता लोकांत जाणे पसंत केले. स्वतःचा कार्यक्रम जाहीर केला. भाजपच्या कार्यक्रमावर भाष्य करणे टाळले. प्रतिक्रियावादी होणे टाळले. स्वतःचा अजेंडा बनवला आणि त्यात अर्थातच राहुल गांधी आणि प्रियंका गांधींचा पुढाकार होता. कुणाच्या लक्षातच आले नाही, की गुजरातमधील अमूल आणि कर्नाटकातील नंदिनी यांची टक्कर भूमिपुत्रांच्या जिव्हाळ्याचा विषय बनवला जाईल. मोदी 'केरला स्टोरी'त अडकले. तिचा वापर करून ते काँग्रेसला मुस्लिमधार्जिणे बनवत होते आणि केरळ सरकारलाही धक्के देत होते. प्रत्यक्षात केरळ स्टोरी म्हणजे एक बनाव कसा आहे, हेही प्रचारकाळात सिद्ध झाले. मोदी आणि शाहांनी रोड शोमध्ये मतदारांवर फेकलेली कोणतीच कार्डे चालली नाहीत आणि कर्नाटकचे प्रवेशद्वार भाजपसाठी बंद करण्यात आले. आता प्रश्न काँग्रेसचा आहे. सत्तावाटपाचा प्रश्न काँग्रेसमध्ये नेहमीच अंतर्गत संघर्ष घेऊन येतो आणि तो पक्षाला कमकुवत करत असतो. राजस्थानमध्ये आपण तेच पाहत आहोत. याच संघर्षामुळे कर्नाटकात काँग्रेसचे आमदार फुटून गेल्या वेळी विरोधकात गेले होते. तोंडाशी आलेला घास संघर्षाने तयार केलेल्या मातीत मिसळला होता. अंतर्गत संघर्षात काँग्रेसच काँग्रेसची खलनायक असते. 'भारत जोडो'चे स्वप्न पाहणाऱ्या राहुल गांधींसमोर सर्वात मोठा प्रश्न आहे तो काँग्रेसमध्ये फटी पडणार नाहीत याची काळजी घेण्याचा आणि पडलेल्या फटी बुजवण्याचा. पूर्वीप्रमाणे या फटी चालणार नाहीत. त्या खूप महागात पडतील कारण काँग्रेसकडे इतिहास मोठा असला, तरी तिचा आकार छोटा झाला आहे. ●●●



# कर्नाटकच्या विजयामुळे काँग्रेसला मिळाला भाजपला पराभूत करण्याचा आत्मविश्वास

**खरगेंनी कर्नाटकची निवडणूक आपल्या खांद्यावर घेतली आणि काँग्रेसला कर्नाटकने तारले. खरगेंनी सिद्धरामय्या व शिवकुमार यांच्यातील मतभेदांना आळा घातला. उमेदवार निवडीत त्यांना संधी दिली. बंडखोरी होणार नाही याची दक्षता घेतली. त्यानंतर पूर्ण महिनाभर कर्नाटकमध्ये ठाण मांडून निवडणुकीच्या आखणीपासून, प्रचारापासून बारीक-सारीक बाबींवर लक्ष ठेवले. खरगेंचे ज्येष्ठत्व आणि श्रेष्ठत्व कोणीही नाकारू शकत नाही. त्यांच्या संयमी नेतृत्वाने काँग्रेसला कर्नाटकसारख्या पुरोगामी, विकासशील, बुद्धिवादी राज्याची सत्ता मिळवून दिली.**

**विचक्षण बोधे**



कर्नाटकमध्ये काँग्रेस जिंकू शकते असे भाजपलाही वाटत होते. एखादी निवडणूक हरतो म्हणून ती लढायची नाही हा भाजपचा स्वभाव नाही. त्यामुळे भाजपने इतर निवडणुकांप्रमाणे कर्नाटकमध्येही सर्वस्व पणाला लावले, ते हरले. त्यांच्यासाठी निवडणूक लढवणे हा नित्याचा खेळ असतो. कर्नाटकमध्ये मतदान होण्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी राजस्थानमध्ये पोहोचले होते, तिथे त्यांनी जाहीरसभा घेण्यास सुरुवात केली आहे. भाजपसाठी कर्नाटक मागे पडले आहे. काँग्रेसला काठावर बहुमत मिळाले असते वा बहुमतासाठी दोन-चार जागा कमी पडल्या असत्या, तर भाजपला कर्नाटकमध्ये अजूनही रुची राहिली असती. काँग्रेसने २२४ जागांपैकी १३५ जागा जिंकून भाजपला तोडफोडीची संधीच दिली नाही. शिवाय, काँग्रेसने तिथे कुणाला किंगमेकरही होऊ दिले नाही. उलट, किंगमेकर बनू पाहणाऱ्यांची मते घेतली. ऐन मोक्याच्या वेळी कर्नाटक काँग्रेसच्या मदतीला धावला असे म्हणता येईल. आगामी लोकसभा निवडणूक दहा महिन्यांवर आली असताना काँग्रेसला या विजयाची नितांत गरज होती. मोदी-शाहांना धोबीपछाड देऊ शकतो, हा आत्मविश्वास काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होऊ शकतो.

'भारत जोडो' यात्रेमध्ये सहभागी झालेल्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा कर्नाटकमधील अनुभव तिथले वातावरण बदलू शकते याचा अंदाज देणारा होता. तुम्ही राहुल गांधींच्या पावसातील सभेला यायला हवे होते... तुम्ही यात्रेतील मैलोन्मैल रांगा बघायला हव्या होत्या... तुम्ही ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार बनायला हवे होते, असे हे कार्यकर्ते सांगत होते. 'भारत जोडो' यात्रेचा अनुभव घेतला असला, तरी कर्नाटक राहून गेले. कर्नाटकच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल पाहताना हे कार्यकर्ते नेमके काय म्हणत होते, हे समजू शकले. 'भारत जोडो' यात्रेला यश आले असे आता काँग्रेसला म्हणता येईल. कर्नाटकमधील २० विधानसभा मतदारसंघांमधून ही यात्रा गेली. २०१८ मध्ये काँग्रेसकडे ५, जनता दल (धर्मनिरपेक्ष) ६ आणि भाजपकडे ९ मतदारसंघ होते. २०२३ मध्ये काँग्रेसकडे १५ म्हणजे १० जागांची भर पडली आहे, तर जनता दलाकडे ३ आणि भाजपकडे केवळ २ मतदारसंघ उरले आहेत. काँग्रेसचे माध्यम विभागप्रमुख जयराम रमेश यांनी ट्वीटद्वारे ही आकडेवारी दिली आहे. 'भारत जोडो' यात्रेने पूर्ण राज्यामध्ये काँग्रेससाठी उत्साहाचे वातावरण निर्माण केले होते. त्याच वेळी राहुल गांधी यांनी सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार या पक्षांतर्गत स्पर्धकांची निवडणुकीपुरती का होईना दिलजमाई केली होती.

### राहुल गांधींच्या संयमाचे कौतुक

यशाचे श्रेय काँग्रेस हायकमांडला देण्याची वाईट सवय या पक्षामध्ये पूर्वापार असल्याने आता विजयाचे सगळे श्रेय राहुल गांधींना दिले जात आहे. पण फक्त ही यात्रा वा राहुल गांधींमुळे कर्नाटकमध्ये काँग्रेसला यश मिळाले असे म्हणणे चुकीचे ठरेल. राहुल गांधींनी नेटाने प्रचार केला हे कोणी नाकारत नाही. त्यांच्या प्रचारामध्ये यावेळी विशेष बाब अशी, की त्यांचा प्रचार अजिबात भरकटला नाही वा तो भरकटू दिला गेला नाही! २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत 'मोदी चोर है' चा नारा देऊन संपूर्ण निवडणूक काँग्रेसने गमावली होती. कर्नाटकमध्ये राहुल गांधींनी प्रचार करण्यातील धोका बहुधा इतर नेत्यांनी ओळखला असावा. राहुल गांधींना सावरकरांवर बोलायचे असते, कर्नाटकमध्ये भाजपने सावरकरांचा विषय उकरून काढला होता. राहुल गांधींना अदानी प्रकरणावर बोलण्याची खुमखुमी होती. एखादा अपवाद वगळता राहुल गांधींनी भाजपच्या फायद्याचे हे विषय प्रचारात काढले नाहीत. या निवडणुकीत राहुल गांधींनी दाखवलेल्या संयमाचे खरेच कौतुक केले पाहिजे. ही परिपक्वता त्यांनी इतर राज्यांतील आगामी विधानसभा निवडणुकीत दाखवली, तर काँग्रेसची ताकद वाढू शकेल.

जिथे स्थानिक प्रबळ नेते असतात, तिथे काँग्रेसला यश मिळू शकते. कर्नाटकमध्ये सिद्धरामय्या, शिवकुमार, एम. बी. पाटील, जी. परमेश्वरन् असे तिथल्या मातीत पाय घट्ट रोवून उभे राहिलेले अनेक नेते काँग्रेसकडे आहेत. मग, दिल्लीतून राहुल गांधी वा प्रियंका गांधी-वाड्रा येऊ शकतात, त्यांच्या प्रचाराचा वेगळा प्रभाव पडू शकतो. पण असे स्थानिक नेतेच नसतील तर दिल्लीतील नेत्यांचा काय फायदा मिळणार? गुजरातमध्ये काँग्रेसकडे ना नेता, ना संघटना. ही निवडणूक काँग्रेसने सोडून दिलेली होती. आंध्र प्रदेशमध्ये हीच स्थिती आहे. प्रत्येक राज्यामध्ये लोकप्रिय नेते होते, ते काँग्रेसच्या हायकमांड यंत्रणेने संपवून टाकले. गुजरातमध्ये माधवराव सोळंकी यांनी एकहाती मिळवलेल्या यशानंतरही (१४९ जागा) त्यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवले गेले. शरद पवार, ममता बॅनर्जी यांच्यासारख्या लढाऊ नेत्यांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. स्थानिक नेत्यांना बळ देऊन राज्ये भाजपकडून हिसकावून घेण्याची नवी परंपरा काँग्रेसला कर्नाटकपासून निर्माण करता येऊ शकेल.

### खरगेंचे ज्येष्ठत्व आणि श्रेष्ठत्व कोणीही नाकारू शकत नाही

कर्नाटकमधील काँग्रेसच्या विजयामध्ये अविभाज्य घटक होते पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे. खरगे कन्नड भाषक. त्यांच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या काळात काँग्रेसने कर्नाटक जिंकले. पण मुख्यमंत्रीपद त्यांच्यापासून दूर राहिले. त्याची खंत कदाचित त्यांना असेल. खरे तर ते ऐन मोक्याच्या वेळी पक्षाध्यक्ष झाले. काँग्रेसची दुर्दशा झाली होती. केवळ दोन राज्ये हाती राहिली होती. कर्नाटक जिंकण्याशिवाय पर्याय नव्हता. खरगेंनी कर्नाटकची निवडणूक आपल्या खांद्यावर घेतली आणि काँग्रेसला कर्नाटकने तारले. इंदिरा गांधींनी चिकमंगळुरूमधून लोकसभा निवडणूक लढवली आणि केंद्रात पुन्हा सत्ता मिळवली. सोनिया गांधींनी बेल्लारीतून भाजपच्या सुषमा स्वराज यांचा पराभव करून काँग्रेसवर वर्चस्व मिळवले. पुढे स्वबळावर सोनिया गांधींनी काँग्रेसला केंद्रात सत्तेत आणले. यावेळी खरगेंनी कर्नाटकमध्ये काँग्रेसच्या या दोन दिग्गज नेत्यांचा कित्ता गिरवला असे म्हणता येऊ शकेल. खरगेंनी सिद्धरामय्या व शिवकुमार यांच्यातील मतभेदांना आळा घातला. उमेदवार निवडीत त्यांना संधी दिली. बंडखोरी होणार नाही याची दक्षता घेतली. त्यानंतर पूर्ण महिनाभर कर्नाटकमध्ये ठाण मांडून निवडणुकीच्या आखणीपासून, प्रचारापासून बारीक-सारीक बाबींवर लक्ष ठेवले. खरगेंचे ज्येष्ठत्व आणि श्रेष्ठत्व कोणीही नाकारू शकत नाही. त्यांच्या संयमी नेतृत्वाने काँग्रेसला कर्नाटकसारख्या पुरोगामी, विकासशील, बुद्धिवादी राज्याची सत्ता मिळवून दिली.

### ४० टक्के कमिशनवाली सरकार

कर्नाटकमध्ये लाचखोरीला कंटाळून कंत्राटदाराने केलेली आत्महत्या भाजपच्या तिथल्या ऱ्हासाला कारणीभूत ठरली. बसवराज बोम्मई सरकार भ्रष्ट असून कंत्राट मिळवण्यासाठी ४० टक्के कमिशन द्यावे लागते, अशी जाहीर तक्रार राज्य कंत्राटदार असोसिएशनने केली होती. भ्रष्टाचाराच्या स्थानिक मुद्द्यावर निवडणूक लढवली तर राज्यातील वारे फिरू शकेल, हा अंदाज काँग्रेसला आला होता. त्यांनी हलाल, हिजाब, सावरकर अशा कुठल्याही भाजपच्या मुद्द्यांना प्रतिसाद दिला नाही. बजरंग दल आणि बजरंगबली यांच्यामध्ये गल्लत होऊ दिली नाही. प्रचार फक्त ४० टक्के कमिशनवाली सरकार या एकाच मुद्द्याभोवती केंद्रित केला, मतदारांनी मोदी-शाहांच्या काँग्रेसबद्दलच्या तक्रारीचा सूरही ऐकला नाही! मोदी-शाह-नड्डा-योगी असे भाजपचे दिग्गज राज्यभर फिरले. एकानेही बोम्मई सरकारच्या यशोगाथांचा उल्लेख केला नाही. बोम्मई यांच्या प्रशासनावर बोलण्याजोगे काही नव्हतेच, तर ते काय बोलणार? भाजपच्या राष्ट्रीय नेत्यांनी राष्ट्रीय मुद्द्यांवर भाषणे केली. मोदींनी काँग्रेसच्या ८५ टक्के कमिशनवाल्या सरकारवर टिप्पणी केली. काँग्रेसच्या नेत्यांनी ९१ वेळा शिव्याशाप दिले असे मोदी म्हणाले. बजरंगबलीला काँग्रेस कोंडून घालतोय अशी आवई उठवली. बजरंग दल ही कडवी हिंदुत्ववादी संघटना आहे, तिच्यावर बंदी घालण्याची घोषणा काँग्रेसने केली होती. बजरंग दलाचा बजरंगबलीशी काहीही संबंध नाही. त्यामुळेच कदाचित काँग्रेसच्या विजयानंतर दिल्लीतील मुख्यालयामध्ये बजरंगबलीच्या वेश परिधान करून काँग्रेस कार्यकर्त्याने भाजपला प्रत्युत्तर दिले असावे! काँग्रेसने 'बजरंगबली तोड दे भ्रष्टाचार की नली' असा नवा नारा देऊन बोम्मई सरकारच्या भ्रष्टाचारावर हल्लाबोल केला. खरे तर, बजरंगबली काँग्रेसच्या मदतीला धावला असे म्हणता येईल.

### विकासाचा मुद्दा लोकांना फारसा भावला नाही

कर्नाटकमध्ये भाजपच्या पराभवाने मोदींच्या निवडणूक जिंकून देण्याच्या मर्यादा उघड केल्या. राज्यातील पक्षाचे नेतृत्व भक्कम असेल तरच विजय मिळवता येऊ शकतो. उत्तर प्रदेशमध्ये योगी आदित्यनाथ, मध्य प्रदेशमध्ये शिवराजसिंह चौहान, महाराष्ट्रात कदाचित देवेंद्र फडणवीस, हरियाणामध्ये मोहनलाल खट्टर. हिमाचल प्रदेशमध्ये भाजपकडे नेतृत्व नव्हते. पंजाबमध्ये पक्षाचे अस्तित्वच नाही. बिहारमध्ये तीच परिस्थिती. कर्नाटकमध्ये बी. एस. येडियुरप्पा यांच्या जागी कमकुवत बसवराज बोम्मई यांना मुख्यमंत्री केले. येडियुरप्पांना बाजूला केल्याचा भाजपला पश्चाताप झालेला दिसला. मोदींनी येडियुरप्पांना प्रचारात आपल्यासोबत घेतले. येडियुरप्पांकडे भाजपच्या

प्रचाराची जबाबदारी सोपवली. पण ते मुख्यमंत्री राहिले नव्हते. मोदी–शाहा–नड्डांनी बोम्मईंना पाठिंबा दिला होता. कर्नाटकातील प्रभावी लिंगायत मतदार येडियुरप्पांमुळे भाजपसोबत होता. लिंगायत मठांचे आशीर्वाद येडियुरप्पांना मिळत होते. बोम्मईही लिंगायत असले, तरी लिंगायत समाजासाठी येडियुरप्पाच त्यांचे नेते राहिले. बोम्मईंना त्यांनी पूर्णपणे स्वीकारले नाही. या विधानसभा निवडणुकीत लिंगायत मतदार पुन्हा काँग्रेसकडे वळल्याचे दिसले. काँग्रेसने ४६ लिंगायत उमेदवार रिंगणात उतरवले होते, त्यापैकी ३७ विजयी झाले. २०१८ मध्ये केवळ १३ उमेदवार जिंकले होते. १९८९ मध्ये वीरेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने १७८ जागा जिंकून अभूतपूर्व यश मिळवले होते, त्यावेळी ४४ लिंगायत उमेदवार विजयी झाले होते. भाजपने ६९ लिंगायत उमेदवार निवडणुकीत उतरवले होते, त्यापैकी फक्त १५ जिंकू शकले. जगदीश शेट्टर, लक्ष्मण सावदी, नेहरू ओलेकर, एन. गोपालकृष्णन् असे दिग्गज लिंगायत नेते भाजपमधून बाहेर पडले. लिंगायत मतदारांचा सर्वाधिक प्रभाव असलेल्या ५० मतदारसंघांपैकी ३३ जागा काँग्रेसने जिंकल्या. गेल्या वेळी याच मतदारसंघांमधून भाजपने ३१ जागा जिंकल्या होत्या. येडियुरप्पांसारख्या मुरब्बी प्रादेशिक नेत्याच्या खच्चीकरणाची मोठी किंमत भाजपला द्यावी लागली, असे दिसते. पूर्वी काँग्रेसने पक्षातील बहुतांश ताकदवान प्रादेशिक नेत्यांचे खच्चीकरण केले. तेच कर्नाटकमध्ये भाजपने केले. जिथे कणखर, अनुभवी, बेरकी आणि लोकप्रिय प्रादेशिक नेतृत्व नसेल तिथे प्रशासनावर वचक कोण ठेवणार? मग, 'डबल इंजिन'चा उपयोग कसा होणार? भाजपने येडियुरप्पांना बाजूला करून 'डबल इंजिन'चा लाभही गमावला. विकासाचा मुद्दा लोकांना फारसा भावला नाही, असे निकालावरून तरी दिसते.

**...तर कदाचित भाजपला मते मिळालीही असती**

भाजपकडे प्रचारासाठी फक्त दोन मुद्दे उरले होते. काँग्रेसच्या काळातील भ्रष्टाचार आणि हिंदुत्व. काँग्रेस सरकारांचा भ्रष्टाचार हा मुद्दा लोकसभा निवडणुकीसाठी राखून ठेवायला हवा होता. कर्नाटकमध्ये भाजपचे सरकार भ्रष्ट असताना आमच्यापेक्षा काँग्रेस अधिक भ्रष्टाचारी असे म्हणून भाजपला नेमके काय सिद्ध करायचे होते, हे कळण्यापलिकडे आहे. काँग्रेस सत्तेवर असताना १ रुपयातील ८५ पैसे लाचखोरीत गायब होत, प्रत्यक्षात १५ पैसे लोकांच्या विकासावर खर्च होतात, असे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींनी म्हटले होते. त्याचा संदर्भ देऊन मोदींनी काँग्रेसला उत्तर देण्याचा प्रयत्न केला होता. हिंदीभाषक राज्ये आणि दक्षिणेतील कर्नाटकसारखी राज्ये यांच्या प्रशासकीय दर्जामध्ये फरक आहे. बुलडोझर म्हणजे सुशासन असे दक्षिणेकडील लोक मानत नाहीत. कदाचित उत्तर प्रदेशामध्ये काँग्रेसच्या भ्रष्टाचाराच्या मुद्याला लोकांनी प्रतिसाद दिला असता. पण कर्नाटकमध्ये तुलनेत चांगले प्रशासन लोकांनी अनुभवलेले आहे. इथे भ्रष्टाचाराची कबुली देऊन जनतेची माफी मागितली असती, तर कदाचित भाजपला मते मिळालीही असती. पण मोदींच्या चेहऱ्यावर निवडणुकीची दिशा बदलण्याचा अतिआत्मविश्वास भाजपसाठी घातक ठरला.

**...पण फासे उलटे पडले**

भाजपने आरक्षणाच्या तरतुदीमध्ये ऐनवेळी बदल करून



लिंगायत, वोक्कलिगा या दोन्ही प्रभावी मतदारांना लालूच दाखवली. येडियुरप्पांना बाजूला केल्यामुळे लिंगायत आधीच काँग्रेसकडे वळू लागले होते. येडियुरप्पांचे किमान १० निष्ठावान काँग्रेस आणि जनता दलाकडून (ध) उमेदवारी मिळवून जिंकून आले, हे त्याचे द्योतक म्हणता येईल. मुस्लिमांना दिलेले ४ टक्के आरक्षण काढून घेऊन लिंगायत व वोक्कलिगांच्या आरक्षणामध्ये प्रत्येकी दोन टक्के वाढ केली गेली. या आरक्षणवाढीचा लिंगायतांवर काही परिणाम झाला नाही हे दिसलेच. जुन्या म्हैसूर विभागातील वोक्कलिग समाज जनता दलाच्या मागे होता. यावेळी जनता दलाच्या मतांच्या टक्केवारीत झालेली घट पाहता वोक्कलिग भाजपकडे जाण्याऐवजी काँग्रेसकडे गेल्याचे दिसते. भाजपने अनुसूचित जातींचे आरक्षण १५ टक्क्यांवरून १७ टक्के व अनुसूचित जमातींचे आरक्षण ३ टक्क्यांवरून ७ टक्के केले होते. या आरक्षणवाढीचाही लाभ भाजपला मिळालेला नाही. अनुसूचित जातींसाठी राखीव ३६ जागांपैकी २१ जागा काँग्रेसने तर भाजपने फक्त १२ मतदारसंघ जिंकले. जनता दलाने ३ जागांवर विजय मिळवला. २०१८ मध्ये भाजपने १६ जागा जिंकल्या होत्या तर काँग्रेसने १२, जनता दलाने ६, तर अपक्षांकडे २ जागा गेल्या होत्या. यावेळी भाजप आणि जनता दलाकडून काँग्रेसने राखीव जागा खेचून घेतल्या आहेत. अनुसूचित जमातींसाठी राखीव १५ जागांपैकी फक्त १ जागा भाजपला जिंकता आली. उर्वरित १४ जागा काँग्रेसने ताब्यात घेतल्या. २०१८ मध्ये भाजप व काँग्रेसला प्रत्येकी ७ व जनता दलाला १ जागा मिळाली होती. कर्नाटकमध्ये भाजपने जातींचे गणित मांडले खरे; पण फासे उलटे पडले.

**हिंदुत्वाच्या आधारे प्रत्येक राज्यात निवडणूक जिंकता येणार नाही**

मंड्या वगैरे वोक्कलिगांचा गड असलेल्या दक्षिण कर्नाटकमध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना प्रचाराला पाठवले होते. गोरखनाथ मठाच्या मठाधिपतींनी नाथ सांप्रदाय आणि वोक्कलिगांचा आदी चुंचनागिरी यांच्यातील ऋणानुबंधांचा प्रचार केला. जिथे राम तिथे हनुमान असे म्हणत उत्तर प्रदेश आणि कर्नाटक यांच्यामध्ये अतूट नात्याची आठवण योगींनी करून दिली. मुस्लिमांचे आरक्षण, राम–हनुमान असे काही विषय पेरून मतांच्या ध्रुवीकरणाचा प्रयत्न भाजपने केला. हिंदुत्वाचा मुद्दा उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत प्रभावी ठरू शकतो. तिथे १९ टक्के मुस्लिम आहेत. मुस्लिम बाहुबलींच्या मुसक्या आवळून राज्य अधिक सुरक्षित केल्याचा योगींचा प्रचार भाजपला मते देऊन गेला.

कर्नाटकमध्ये किनारपट्टीच्या भागात हिंदुत्वाचा प्रभाव अधिक आहे, हा गड भाजपने तुलनेत राखलेला आहे, इथे भाजपच्या ३ जागा कमी झाल्या आहेत. हिजाब, हलाल, टिपू सुलतान हे मुद्दे इथे भाजपच्या मदतीला आले. पण अन्य विभागांमध्ये राज्य प्रशासनाची दुर्दशा लोकांना भाजपपासून लांब घेऊन गेली. त्यामुळे फक्त मोदींचा चेहरा लोकांसमोर ठेऊन, तसेच हिंदुत्वाच्या आधारे प्रत्येक राज्यात निवडणूक जिंकता येणार नाही, हे कर्नाटकने सिद्ध केले.

कर्नाटकमधील सर्व सहा विभागांमध्ये लिंगायत, वोक्कलिग, अनुसूचित जाती-जमाती, मुस्लिमांनी काँग्रेसला मते दिल्याने पक्षाचा जनाधार व्यापक होत गेल्याचे दिसते. काँग्रेसच्या मतांमध्ये ५ टक्क्यांची वाढ झाली. भाजपच्या मतांच्या टक्केवारीत घट झालेली नसली, तरी यावेळी ३८ जागा कमी झाल्या आहेत. विश्लेषकांच्या म्हणण्यानुसार, भाजपला २०१८ मध्ये सर्व विभागांतून मते मिळाली होती. यावेळी बंगळुरू आणि जुना म्हैसूर विभाग या दोनच विभागांत मते वाढली. अन्य चारही विभागांमध्ये भाजपची मते कमी झालेली आहेत. जुना म्हैसूर विभाग जनता दलाचा बालेकिल्ला होता. पण यावेळी या पक्षाच्या मतांमध्ये ५ टक्क्यांची घट झाली. ही मते दोन्ही पक्षांमध्ये विभागली गेली असली, तरी त्याचा अधिक फायदा काँग्रेसला झाल्याचे दिसते. या विभागातील ६४ जागांपैकी ४३ जागा काँग्रेसला मिळाल्या. काँग्रेसच्या जागांमध्ये २३ वाढल्या, तर भाजपच्या ११ जागा व जनता दलाच्या १२ जागा कमी झाल्या. मतांची आकडेवारी पाहता, यावेळी कर्नाटकची निवडणूक तिरंगी होण्यापेक्षा भाजप विरुद्ध काँग्रेस अशी थेट लढली गेली असे म्हणता येईल. जनता दल हा पक्ष देवेगौडा कुटुंबाचा पक्ष झाल्याचे दिसू लागले असून मते आणि जागा दोन्ही कमी झाल्याने किंगमेकर होण्याची संधी २०२३ मध्ये मिळू शकली नाही.

पुढील सहा महिन्यांमध्ये मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ आणि तेलंगणा या चार राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार असून कर्नाटकमधील विजयाने काँग्रेसला मोठे बळ दिले आहे. प्रत्येक राज्यातील राजकीय परिस्थिती वेगळी असते. मध्य प्रदेशमध्ये भाजपचे सरकार आहे. गेल्या वेळी कमलनाथ यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे सरकार भाजपने फोडाफोडी करून पाडले. यावेळी कर्नाटकप्रमाणे स्थानिक मुद्यांवर निवडणूक लढवली तर मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसला विजयाची पुनरावृत्ती करता येऊ शकेल. राजस्थानमध्ये काँग्रेस मतभेदांमुळे पोखरला गेला असून इथे काँग्रेसला सत्ता टिकवायची असेल, तर अशोक गेहलोत व सचिन पायलट यांच्यामध्ये समेट घडवून आणावा लागेल. कर्नाटकमध्ये सिद्धरामय्या व शिवकुमार यांच्यातील मतभेद नियंत्रणात ठेवण्यात खरगेंना यश आले, हाच प्रयोग खरगेंना राजस्थानमध्ये करावा लागणार आहे. छत्तीसगढमध्ये भूपेश बघेल सरकारबद्दल अनुकूल मत असल्याने इथे भाजपला सत्ता मिळवण्यासाठी कष्ट करावे लागतील. तेलंगणामध्ये विद्यमान भारत राष्ट्र समिती व काँग्रेसमध्ये थेट लढत असून भाजपने घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटकमधील यश आणि 'भारत जोडो' यात्रेला मिळालेला प्रतिसाद पाहता तेलंगणामध्येही काँग्रेससाठी आशादायी चित्र निर्माण होऊ शकते. ●●●

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**



## पक्षीय बलाबल

| | |
|---|---|
| **एकूण जागा** | २२४ |
| **काँग्रेस** | १३५ |
| **भाजप** | ६६ |
| **जनता दल (धर्मनिरपेक्ष** | १९ |
| **अपक्ष** | २ |
| **अन्य** | २ |

## मतांची टक्केवारी (कंसातील आकडे २०१८ मधील)

| | |
|---|---|
| **काँग्रेस** | ४२.९% (३८.०४%) |
| **भाजप** | ३५.९% (३६.२२%) |
| **जनता दल (धर्मनिरपेक्ष)** | १३.३१% (१८.३६%) |

## काँग्रेस व भाजपने विभागवार जिंकलेल्या जागा (कंसातील आकडे २०१८ मधील)

### मुंबई कर्नाटक
**काँग्रेस ३३ (१७) । भाजप १७ (३१)**

### हैदराबाद कर्नाटक
**काँग्रेस २६ (२१) । भाजप- १० (१५)**

### कर्नाटक किनारपट्टी
**काँग्रेस ६ (३) । भाजप- १३ (१६)**

### मध्य कर्नाटक
**काँग्रेस १९ (११) । भाजप ४ (१०)**

### जुना म्हैसूर विभाग
**काँग्रेस ४३ (२०) । भाजप ५ (१६)**

### बंगळुरू
**काँग्रेस १२ (१५) । भाजप १६ (११)**



# कर्नाटक निवडणूक निकालाचा अर्थ



प्रा. नागार्जुन
वाडेकर

**कर्नाटक राज्यातील निवडणुकीचा निकाल देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारा ठरेल आणि त्याचे पडसाद २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत नक्कीच दिसतील, असेच मत आज सर्वत्र पहावयास मिळते आहे. भाजपने ईव्हीएमचा गैरवापर लोकसभा निवडणुकीसाठी राखून ठेवला आहे, अशा अफवा आता पसरत आहेत. मात्र कर्नाटक निवडणुकीच्या निकालाने हेसुद्धा दाखवून दिले आहे, की आता जनता अवास्तव आणि काल्पनिक प्रश्नांवर भांडत बसण्यापेक्षा आपल्या प्रश्नांवर मतदान करतेय. म्हणजेच मतदार अधिक जागरूक होतोय आणि तेच आपल्या लोकशाहीसाठी महत्त्वाचे आहे.**

कर्नाटकात नुकत्याच १० मे रोजी विधानसभेच्या निवडणुका झाल्या आणि १३ मे रोजी निकाल आले. त्यात काँग्रेस पक्षाला निर्णायक बहुमत मिळाले. मुख्यमंत्री म्हणून लोकप्रिय नेते सिद्धरामय्या यांचा २० मे रोजी शपथविधीही झाला आहे, तर डी. के. शिवकुमार उपमुख्यमंत्री झाले आहेत. काँग्रेस पक्षाने या निवडणुकीची तयारी बरीच आधी केली होती आणि सुरुवातीपासूनच निवडणूक प्रचारातदेखील तो भारतीय जनता पक्षाच्या पुढे होता. बहुतेक निवडणूकपूर्व चाचण्यांत काँग्रेस पक्ष बहुमताने विजयी होईल, असे भाकीत करण्यात आले होते. काही चाचण्यांत काँग्रेसला काठावरचे बहुमत मिळेल असे म्हटले होते. गोदी मीडिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही न्यूज चॅनेल्सनी तर चक्क भाजपलाच बहुमत मिळेल असेही भाकीत केले होते. काहींनी भाजपला मोडतोड करून बहुमत जमवता येईल इतक्या जागा मिळतील, असेही भाकीत केले होते. इतक्या निवडणूकपूर्व चाचण्यांत 'इदिना डॉट कॉम' या वेबपोर्टलने वर्तवलेला अंदाज सगळ्यात खरा ठरला. त्यांच्या अंदाजाप्रमाणे, २२४ सदस्य असलेल्या विधानसभेत काँग्रेस पक्षाला १३६, भाजपला ६६ तर जनता दल (सेक्युलर)ला १९ जागा मिळाल्या. कर्नाटकात सरकार स्थापन करण्यासाठी ११३ चे बहुमत आवश्यक आहे. मात्र जनतेने इतक्या साऱ्या चाचण्यांना ठेंगा दाखवत भारतीय जनता पक्षासारख्या बलाढ्य पक्षाला हरवून काँग्रेस पक्षाला बहुमत दिले. यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आणि यामागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू झाला.

प्रथम यावेळच्या निवडणुकीत किती पक्ष होते आणि त्यांनी किती जागा लढवल्या होत्या ते पाहू. भाजपने सर्वच्या सर्व २२४ जागा लढवल्या. काँग्रेसने २२३, जनता दल (सेक्युलर) ने २०३, आम आदमी पार्टीने २०९, कर्नाटक राष्ट्र समितीने १९५, बहुजन समाज पक्षाने १३३, उत्तमा प्रजाकीय पक्षाने ११०, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ९, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने ७, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)ने ४ जागा लढवल्या होत्या.

यावेळी काँग्रेसला ४२.८८ टक्के मते मिळाली आणि १३६ जागा निवडून आल्या. मागच्यावेळी ३८.६ टक्के मते मिळाली होती आणि ८० जागा मिळाल्या होत्या. भाजपला ३६ टक्के मते आणि ६६ जागा मिळाल्या, तर मागच्या वेळी त्यांना ३६.३५ टक्के मते मिळून १०४ जागा निवडून आल्या होत्या. जनता दल (सेक्युलर)ला यावेळी १३.२९ टक्के मते आणि १९ जागा मिळाल्या आणि मागच्या वेळी १८.३ टक्के मते होती आणि ३७ जागा निवडून आल्या होत्या. यावरून असे लक्षात येते, की काँग्रेसची मते ५ टक्क्यांनी वाढली आहेत, तर जनता दल (सेक्युलर)ची मते ५ टक्क्यांनी कमी झाली आहेत. भाजपच्या मतांची टक्केवारी कमी झालेली नाही, मात्र ३८ जागा कमी झाल्या आहेत.

२०२३ च्या निवडणूक निकालाचा शोध घेण्याआधी कर्नाटकातील मागच्या सरकारांच्या मोडतोडीचा इतिहास पाहणे महत्त्वाचे ठरेल. २०१८ साली झालेल्या निवडणुकीत भाजपला १०४, काँग्रेसला ८० तर जनता दलास ३७ जागा मिळाल्या होत्या. सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपने येडियुरप्पा यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. मात्र विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यापूर्वीच येडियुरप्पा यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आणि सरकार पडले. त्यानंतर काँग्रेस आणि जनता दलाच्या आघाडीने १२० आमदारांच्या जोरावर सरकार स्थापन केले. पूर्व प्रधानमंत्री देवेगौडा यांचे सुपुत्र एच.डी. कुमारस्वामी मुख्यमंत्री झाले.



**४० टक्के कमिशन घेणारे सरकार**

साधारणतः एका वर्षानंतर भाजपचे दिग्गज नेते बी.एस. येडियुरप्पा यांनी काँग्रेसमधील १४ आणि जनता दलाच्या ३ आमदारांना फोडून सरकार पाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. कुमारस्वामी यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार घटनाबाह्य पद्धतीने पाडून २०१९ मध्ये भाजप सत्तेत आला होता. मात्र येडियुरप्पा यांचे वाढते वय (त्यावेळी ७८), त्यांच्याविरोधात पक्षांतर्गत वाढता असंतोष आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे भाजपने त्यांना बदलून २०२१ मध्ये बसवराज बोम्मई यांना मुख्यमंत्री केले होते; परंतु त्यांच्या काळात राज्यात विविध सरकारी कामांचे कंत्राट घेणाऱ्या कंत्राटदारांच्या संघटनेने ४० टक्के कमिशन घेऊ नये म्हणून आंदोलन केले आणि थेट प्रधानमंत्री मोदी यांनाच निवेदन धाडले, त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. पण ४० टक्के कमिशन घेणारे सरकार म्हणून बोम्मई यांचे सरकार बदनाम झाले होते.

या पार्श्वभूमीवर भाजप २०२३ च्या निवडणुकीला सामोरा जात होता. बंगळुरू आणि म्हैसूर आयटी आणि इतर बहुराष्ट्रीय कंपन्यांचे हब झालेले आहे. त्यामुळे देशभरातील तंत्रज्ञ तिथे नोकरीसाठी स्थायिक झालेले आहेत. महाराष्ट्रानंतर कर्नाटक राज्य दुसऱ्या क्रमांकाचे आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्य आहे. कर्नाटक बसवन्ना, अक्क महादेवी, अल्लमा प्रभू यांच्या विचारांनी भारलेले पुरोगामी राज्य आहे. मात्र तिथेच काही वर्षांपासून वाढत्या प्रतिगामी शक्तींनी माजी कुलगुरू एम. एम. कलबुर्गी आणि धडाडीच्या पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्या घडवल्या आहेत. अशा प्रकारे काही वर्षांपासून राज्यातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक वातावरण बरेच तापवले गेले होते. त्यामुळे समाजमन अस्वस्थ झालेले होते. निवडणूक निकालाच्या निमित्ताने त्याचाही थोडक्यात आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल.

**सामाजिक, राजकीय वातावरण तापत ठेवले**

२०१९ मध्ये कर्नाटकातील जनता दल-काँग्रेस आघाडीचे सरकार पाडण्यात पेगॅसस सॉफ्टवेअरचा वापर केला गेला होता, असा काँग्रेसने आरोप केला होता. काँग्रेसचे राज्याध्यक्ष आणि आमदार डी.के. शिवकुमार यांना ईडीने आर्थिक केसेस करून ४० दिवसांसाठी तुरुंगात टाकले होते. सीबीआय आणि इतर सरकारी यंत्रणांचा वापर करून विरोधकांना हैराण केले जात होते. केंद्र सरकारने नोटाबंदी आणि जीएसटी लागू केल्याने अनेक छोटे व्यवसाय आणि लघुउद्योग बंद होऊन बेरोजगारी वाढली होती. सरकारी नोकऱ्यांत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून नोकऱ्या विकल्या जात आहेत म्हणून बेरोजगार तरुणांचा आक्रोश होता. पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसचे दर वाढल्याने तसेच एकूण महागाईने जनता त्रस्त झालेली होती. भाजपचे खासदार अनंतकुमार हेगडे यांनी जाहीर वक्तव्य केले होते, की त्यांचे सरकार भारतीय राज्यघटना बदलणार आहे. खासदार तेजस्वी सूर्या यांनीदेखील सातत्याने वादग्रस्त विधाने केली होती. मुस्लिमांना 'पंक्चरवाले आणि निरक्षर' म्हणून संबोधले आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) विरोधी निदर्शनांवर टिप्पणी करताना ही निदर्शने थांबविली नाहीत, तर 'मुघल राज' परत येईल असे म्हणत सामाजिक, राजकीय वातावरण तापत ठेवले होते.

**हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण**

हिंदुत्ववादी संघटना श्रीराम सेना आणि बजरंग दल सातत्याने सामाजिक वातावरण बिघडवत होते. प्रेमी युगुलांना धमकावणे, व्हॅलेंटाईन डे साजरा करणाऱ्यांना रोखणे, महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणं असुरक्षित करून त्यांच्या स्वातंत्र्यावर विविध प्रकारची बंधने लादणे, मुलींच्या हिजाबवर बंदी आणणे (उडुपी कॉलेजमधील सर्क्युलर), हिजाब घातलेल्या मुलीच्या भोवती 'जय श्रीराम'च्या घोषणा देणे (मंड्या जिल्ह्यातील कॉलेजमधील घटना), बस-ट्रेनमध्ये हिंदू मुलींच्या शेजारी मुस्लिम मित्र बसले म्हणून आणि हिंदू मुलींच्या सोबत मुस्लिम मुलगा दिसला, तर त्याला मारहाण करणे, म्हैसूरच्या सतराव्या शतकातील टिपू सुलतानला निवडणुकीच्या पुढे 'हिंदूविरोधी आणि कन्नडविरोधी, मुस्लिम धर्मांध' म्हणून पेश करणे, हिंदू मंदिरांच्या बाहेर मुस्लिमांना दुकाने चालवण्यास बंदी करणे असे प्रकार करून एकाच वेळी मुस्लिम समाजावर सामाजिक आणि आर्थिक बहिष्कार घालून त्यांची कोंडी करून त्यांच्यात दहशत पसरवणे आणि हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण करणे अशा घटना वारंवार घडत होत्या. नोव्हेंबर २०२१ मध्ये बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी बेलूर शहरातील येशू प्रार्थना सभागृहातील प्रार्थना सभेत 'बळजबरीने धर्मांतर' होत असल्याच्या कारणास्तव व्यत्यय आणला. एप्रिल २०२२ मध्ये शिवमोगा जिल्ह्यात हलाल मांस विकल्याबद्दल एका

मुस्लिम व्यापाऱ्यावर हल्ला केल्याच्या आरोपाखाली बजरंग दलाच्या पाच कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली होती. अशा प्रकारे लोकांची सुरक्षितता, लोकशाही आणि सामाजिक शांतता आणि सौहार्द संपुष्टात आणले जात होते.



देशात जात, धर्म, भाषा, खाद्यपदार्थ, पेहेरावावरून फोफावणारे सामाजिक ध्रुवीकरण, महागाई, बेरोजगारी, जीएसटीमुळे आलेली आर्थिक विषमता आणि तपास यंत्रणांच्या गैरवापरामुळे विरोधकांची संसदेत आणि संसदेबाहेर होणारी कोंडी, तसेच या राजकीय तणावातून केंद्र आणि राज्यांमध्ये निर्माण होणारा दुरावा बाजूला सारून भारत एकसंध करण्याचा प्रयत्न म्हणून काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि खासदार राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर 'भारत जोडो' यात्रा काढली होती. कर्नाटकात या यात्रेस उदंड प्रतिसाद मिळाला होता. निवडणुकीनंतर असेही निरीक्षण आले आहे, की ज्या मतदारसंघांतून 'भारत जोडो' यात्रा गेली ते सर्व मतदारसंघ काँग्रेसने जिंकले आहेत.

यावरून लक्षात येईल, की जनतेला त्यांचे दुखः जाणून घेणारा, त्यांचे म्हणणे ऐकून घेणारा नेता हवा आहे. त्याचबरोबर काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांनी निवडणूक प्रचारात भाजपला धार्मिक ध्रुवीकरण सोडून लोकांच्या प्रश्नांवर बोलण्याचे आव्हान दिले होते आणि लोकांना ते पटत होते. काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी प्रकृती ठीक नसतानाही निवडणूक प्रचारसभा घेतली. काँग्रेसने निवडलेले नवे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे कर्नाटकाचे भूमिपुत्र आहेत. याचाही त्यांना कर्नाटक निवडणुकीत निश्चितच फायदा झाला आहे.

**...मात्र जनतेने निराळाच कौल दिला**

निवडणूक प्रचारादरम्यान प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या भाषणांतून विविध प्रकारे सहानुभूती मिळवण्याचा प्रकार केला, जसे काँग्रेस पक्षाने त्यांना ९१ वेळा शिव्या दिल्या वगैरे. तसेच 'द केरळ स्टोरी'चा उल्लेख करून सर्वांनी तो चित्रपट पाहावा म्हणून चित्रपटाचे प्रमोशनच केले. 'सत्तेत आल्यास बजरंग दलावर बंदी आणू' या काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील उल्लेखाचा विपर्यास करून 'बजरंगबली की जय' म्हणत मतदान करून काँग्रेसला धडा शिकवावा, असा सल्ला दिला. मात्र जनतेने निराळाच कौल दिला.

प्रत्येक निवडणुकीत होतो तसा या निवडणुकीतसुद्धा पैसे-गिफ्ट वाटण्याचा प्रकार घडला. आज हा खर्च कोणता पक्ष सर्वाधिक प्रमाणात करू शकतो, हे सगळे जाणतात. मात्र यावेळी एक निराळाच प्रकार बघायला मिळाला. मतदानाच्या पूर्वसंध्येला लोक साड्या आणि चिकन वाटणाऱ्यांच्या घराबाहेर त्या फेकून देताना तसेच दुसऱ्या दिवशी गॅस सिलेंडरला हार घालून पूजा करून मतदानाला जाताना दिसले.

यावरून लक्षात येते, की सर्व थरांतील जाती-धर्मातील लोकांनी ही निवडणूक गांभीर्याने घेतली आणि निश्चितपणे ठरवून भाजपला हरवले. त्याचबरोबरीने लोकांनी विचारपूर्वक आणि संघटितपणे क्षुल्लक मते खाणाऱ्या उमेदवारांना वेळीच माघार घ्यायला लावली. याचाच अर्थ जनतेने ही निवडणूक त्यांचीही निवडणूक कशी केली आणि कोणत्या मुद्यांवर मतदान केले आहे. त्यामुळे यामागची कारणे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील पाच आश्वासने**

काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यातून पाच आश्वासने दिली. 'गृह ज्योती'अंतर्गत प्रत्येक घरासाठी २०० युनिट मोफत वीज, 'गृह लक्ष्मी' योजनेंतर्गत कुटुंबप्रमुख असलेल्या महिलेला प्रतिमहिना दोन हजार रुपये, 'युवा निधी' योजनेच्या माध्यमातून पदवीधर आणि पदविका घेतलेल्या तरुणांना बेरोजगार भत्ता, 'उचित प्रयत्न' योजनेच्या माध्यमातून सर्व महिलांना राज्य परिवहन विभागाच्या बसमधून मोफत प्रवासाची सुविधा आणि 'अन्न भाग्य' योजनेच्या माध्यमातून दारिद्र्यरेषेच्या खाली असलेल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला १० किलो मोफत धान्य. स्पष्ट शब्दांत स्थानिकांच्या मूलभूत प्रश्नांना भिडणाऱ्या सामान्य लोककेंद्री निवडणूक जाहीरनाम्याचासुद्धा काँग्रेसच्या विजयात निश्चितच मोठा वाटा आहे.

एकट्या कर्नाटकात इतके सगळे घडून गेल्यानंतर निवडणुकीचा निकाल काय लागला ते आपण पहिले. त्या निवडणुका कोणत्या पार्श्वभूमीवर झाल्या त्याचाही थोडक्यात ऊहापोह केला. तरीसुद्धा या निवडणुकीचा समग्र अर्थ कसा समजून घ्यावा, या निवडणुकीचे विविध पक्षांच्या भूमिकेवर काय परिणाम होतील, याचा देशपातळीवर काय दूरगामी परिणाम होईल यावर सर्वजण चर्चा करण्यास आणि यापुढील राजकारण कसे असेल, हे समजून घेण्यास उत्सुक आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून कर्नाटक निवडणुकीचा अर्थ समजून घेण्यासाठी विचार जागर फाऊंडेशनने डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली १८ मे रोजी नाशिक येथे 'कर्नाटक निवडणूक निकालाचा अर्थ' या विषयावर जाहीर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी 'सिटू'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, ज्येष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा तसेच ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी या निवडणुकीच्या निकालाचे विश्लेषण केले.

**प्रस्थापितांच्या राजकारणाला दिलेला धक्का**

यावेळी डॉ. रावसाहेब कसबे म्हणाले, की कर्नाटकातील निवडणूक निकाल म्हणजे प्रस्थापितांच्या राजकारणाला दिलेला धक्का आहे.

जनतेने राज्यघटनेतील मूल्यांच्या रक्षणार्थ असा निवडणूक निकाल दिला आहे. लोकांना शांतता हवी आहे. इथून पुढे निवडणुकीत धार्मिक वाद आणि भेदभावाला खतपाणी घालणारे विषय चालणार नाहीत. या निवडणुकीने मोदीनंतर कोण? हा विषयसुद्धा निकालात काढला आहे. विरोधकांतील अनेक नेते या पदासाठी पात्र आहेत आणि त्यांच्यामध्ये या विशाल देशाला पुढे नेऊ शकणारे शहाणपण आहे. या निवडणुकीने हे दाखवले आहे, की भारत देश हा कुराण वा मनुस्मृती अशा कोणत्याही धार्मिक ग्रंथांतून निर्माण होणारा धार्मिक देश नसेल, तर तो राज्यघटनेतील मूल्यांवर आधारलेला माणूसकेंद्री लोकशाही देश असेल. डॉ. डी.एल. कराड म्हणाले, की कर्नाटकला दक्षिणेत प्रवेश करण्याचे द्वार समजून भाजपने महागाई, बेरोजगारी आणि सर्वसमावेशक विकास या लोकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक न करता ४०% भ्रष्टाचार करणारे अकार्यक्षम सरकार दिले. डिजिटल इंडिया, स्कील इंडियासारख्या संकल्पना आणल्या तरी त्यांना रोजगारनिर्मिती काही करता आली नाही. रोजच्या धार्मिक उन्मादाने शांतताभंग होऊन लोकांच्या जीविताचे, व्यवसायाच्या सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण केले गेले. शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या वाढत्या प्रश्नांमुळे हे जनविरोधी सरकार आहे म्हणून लोकांनी त्यांना नाकारले. आधीच घटनात्मक मूल्यांची मोडतोड करत लोकनियुक्त सरकार पाडून, बेकायदेशीर सरकार राज्यात कार्यरत होते. भाजप सरकारने शेतकरी-कामगारविरोधी कायदे करून, सरकारी उद्योग विकून ठराविक उद्योगपती मित्रांचे भले करण्याच्या नादात गरिबांकडे दुर्लक्ष केले. केंद्रातील सत्ताधारी पक्षाने विरोधी मताला ईडी आणि सीबीआयसारख्या यंत्रणाच्या धाकाखाली ठेऊन लोकशाहीवर हल्ले केले. त्यामुळे शेवटी लोकांनी सरकारच बदलले.

सुरेश भटेवरा म्हणाले, की कर्नाटकात काँग्रेसच्या विजयापेक्षा भाजपच्या पराभवाची खोली मोठी आहे. भारतासारख्या एवढ्या मोठ्या देशाच्या प्रधानमंत्र्यांनी ईशान्येतील एक राज्य मणिपूर जळत असताना दुसऱ्या एखाद्या राज्याच्या निवडणुकीत किती वेळ घालावा याला काहीतरी सीमा असायलाच हवी. देशाचे प्रधानमंत्री, गृहमंत्री, अनेक मंत्री, इतर राज्यांचे मुख्यमंत्री आणि खासदार, आमदार कर्नाटक निवडणूक प्रचारात मग्न होते. तरीही भाजपला दारूण पराभवाचे तोंड पाहावे लागले. पराभव झाला तरी भाजप 'प्लॅन बी' आणून काहीही करू शकतो, असा त्यांच्या कार्यकर्त्यांना विश्वास होता. पण लोकांनी काँग्रेसला निर्णायक मते दिल्याने तशी सोय राहिली नाही.

**...पण यावेळी काँग्रेस त्यात अडकली नाही**

गेल्या वर्षभरापासून धार्मिक ध्रुवीकरण करणारे निरनिराळे वाद निर्माण करून वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला गेला. पण त्याला नाकारून लोकांनी त्यांचा विवेक शाबूत असल्याचे दाखवून दिले. इतके दिवस असे चित्र दिसत होते, की भाजप नरेटीव्ह सेट करायची आणि काँग्रेस त्यावर प्रतिक्रिया देत असायची. पण यावेळी काँग्रेस त्यात अडकली नाही. त्यांनी स्थानिक प्रश्नांवरच भर दिला. जाहीरनाम्यात नवीन योजना आणल्या. त्यामुळे या निवडणुकीत सर्व समाजातील लोकांनी काँग्रेसला मते दिली आहेत हे त्यांच्या वाढलेल्या टक्केवारीवरून लक्षात येते. भाजपच्या प्रचारात स्थानिक नेत्यास स्थानच नव्हते. त्यांच्या बाजूने ही चेहराशून्य निवडणूक




झाली. वारंवार प्रधानमंत्र्यांचा एकच एक चेहरा दाखवणं कंटाळवाणे झाले होते.

जुने नेते येडियुरप्पा यांना तिकीट वाटपात स्थान नसणे, मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना दुर्लक्षिने भाजपला महागात पडले. डबल इंजिन सरकार, भाजप जिंकला नाही तर कर्नाटकचे नुकसान होईल, इथे दंगली उसळतील, बजरंगबली की जय म्हणत मतदान करा, अशी विधाने करणे म्हणजे घटनात्मक मूल्यांचा भंग आहे. विरोधकांची प्रचंड गळचेपी आणि माध्यमांचे स्वातंत्र्य काढले असले तरी आज भाजप बहुतांश राज्यांतून सत्तेतून बाहेर आहे. लोकांना शांततापूर्ण लोकशाही हवी आहे, घटनात्मक मूल्यांचा सन्मान करणारे सरकार हवे आहे. ही विविधताच या देशाची सुंदरता आहे.

**सामान्य जनतेच्या भूमिकेचा विजय**

उत्तम कांबळे म्हणाले, की राजकीय वर्चस्वासाठी गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून सांस्कृतिक कलह निर्माण केले जात आहेत. महिला व अल्पसंख्याक त्यांच्यावरील दहशतीला कंटाळलेले आहेत. त्यामुळे या दबावातून बाहेर पडण्यासाठी कर्नाटक निवडणुकीत पहिल्यांदा सर्व समाज एकत्र आल्याचे दिसले. जनतेवरील दहशत, धार्मिक ध्रुवीकरण, व्यावसायिक असुरक्षितता, महागाई तसेच बेरोजगारीबाबत गप्प राहणाऱ्या जनता दल (सेक्युलर)च्या भूमिकेला लोकांनी नाकारले. यामुळे कर्नाटकमधील निवडणुकीचा विजय म्हणजे सामान्य जनतेच्या भूमिकेचा विजय असल्याचे त्यांनी म्हटले.

एकूण प्राप्त परिस्थितीत कर्नाटक राज्यातील निवडणुकीचा निकाल देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारा ठरेल आणि त्याचे पडसाद २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत नक्कीच दिसतील, असेच मत आज सर्वत्र पहावयास मिळते आहे. भाजपने ईव्हीएमचा गैरवापर लोकसभा निवडणुकीसाठी राखून ठेवला आहे, अशा अफवा आता पसरत आहेत. मात्र कर्नाटक निवडणुकीच्या निकालाने हेसुद्धा दाखवून दिले आहे, की आता जनता अवास्तव आणि काल्पनिक प्रश्नांवर भांडत बसण्यापेक्षा आपल्या प्रश्नांवर मतदान करतेय. म्हणजेच मतदार अधिक जागरूक होतोय आणि तेच आपल्या लोकशाहीसाठी महत्त्वाचे आहे. ●●●

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**

# महा-राजकारण आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय



अनंत बागाईतकर

**उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता तर त्यांचे सरकार फेरस्थापित करणे न्यायालयाला शक्य झाले असते, ही न्यायालयाची टिप्पणी किंवा शेरा म्हणजे एकप्रकारे वर्तमान शिंदे-फडणवीस जोडगोळीच्या सरकारच्या वैधतेलाच आव्हान आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अशा चतुराईने किंवा खुबीने दिलेला आहे, की त्याचा अर्थ लावताना आणि तो योग्य रितीने लावून झाल्यानंतर लागू करणे हे एक आव्हान असेल. सोळा आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांवर न्यायालयाने सोपविलेला असला तरी त्यांचा निर्णय अंतिम नसेल. कारण त्या निर्णयाला किंवा त्या निर्णयाच्या वैधतेबाबत न्यायालयाकडे दाद मागितली जाऊ शकते.**





महाराष्ट्रात गेल्या वर्षी झालेल्या राजकीय फंदफितुरीनंतर ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात जाणे अपेक्षित होते. फितुरीचा फटका शिवसेनेला बसला होता. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सर्वप्रथम सोळा आमदारांनी फितुरी करून भाजपशी हातमिळवणी केली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला गळती लागली आणि एकंदर चाळीस आमदार फुटीर गटाला सामील झाले. प्रथम गुजरात आणि नंतर थेट आसामपर्यंत या फुटिरांनी केलेल्या हवाई भ्रमणाची कथा सर्वांनाच माहीत आहे. त्यानंतर तत्कालीन राज्यपाल महोदयांनी अनाकलनीय असे निर्णय करून तत्काळ शिंदे-फडणवीस जोडगोळीचे सरकार स्थापन केले. राज्यपालांनी त्यावेळी कोणत्या राज्यघटनेनुसार आणि कायद्यांनुसार निर्णय केले हे त्यांनाच माहीत किंवा त्यांचे दिल्लीत बसलेले कर्तेकरविते त्यांनाच माहीत असावे. कारण सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निर्णयात राज्यपालांनी पक्षीय राजकारणात सहभाग घेतला आणि त्यांनी केलेले निर्णय कायद्यांशी सुसंगत नसल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. याचा अर्थ एकच होतो, की बेकायदेशीर निर्णय रेटून, बिनदिक्कत आणि निलाजरेपणाने करून टाकायचे आणि त्यावर न्यायसंस्थेने ताशेरे झाडले तरी निर्लज्जपणे मूग गिळून गप्प बसून रहायचे अशी सवय लागलेली मंडळी सध्या भारतीय राजकारणावर वर्चस्व गाजवत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील फंदफितुरीबद्दल दिलेल्या निर्णयात राज्यपालांनी केलेले निर्णय, फुटीर गटाने नव्या प्रतोदांची केलेली नेमणूक हे सर्व अनुचित आणि बेकायदेशीर ठरविले आहे. उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता तर त्यांचे सरकार फेरस्थापित करणे न्यायालयाला शक्य झाले असते, ही न्यायालयाची टिप्पणी किंवा शेरा म्हणजे एकप्रकारे वर्तमान शिंदे-फडणवीस जोडगोळीच्या सरकारच्या वैधतेलाच आव्हान आहे. तरीही निकाल आपल्याच बाजूने लागल्याचा लोचटपणा या जोडगोळीने पत्रकार परिषद घेऊन करावा हा लाज व शरम सोडल्याचा पुरावा आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अशा चतुराईने किंवा खुबीने दिलेला आहे, की त्याचा अर्थ लावताना आणि तो योग्य रितीने लावून झाल्यानंतर लागू करणे हे एक आव्हान असेल. सोळा आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांवर न्यायालयाने सोपविलेला असला तरी त्यांचा निर्णय अंतिम नसेल. कारण त्या निर्णयाला किंवा त्या निर्णयाच्या वैधतेबाबत

न्यायालयाकडे दाद मागितली जाऊ शकते. महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी या निर्णयावर बोलताना असे भाष्य केले की जणू काही त्यांचा निर्णय अंतिमच असेल; परंतु विधानसभेचे अध्यक्ष असले तरी त्यांना निर्णय करताना कायद्यांचाच आधार घ्यावा लागतो आणि त्यांनी संबंधित नियम व कायदे हे उचित पद्धतीने लागू केले आहेत की नाहीत हे तपासण्याचा अधिकार न्यायसंस्थेचा असतो. कारण संसदेनेदेखील संमत केलेल्या कायद्यांचा अर्थ लावण्याची, त्याची वैधता तपासण्याची जबाबदारी राज्यघटनेने न्यायसंस्थेला दिलेली आहे. त्यामुळे कुणीही याबाबत आपले पद हे न्यायसंस्थेपेक्षा उच्च आहे आणि आपल्या निर्णयाला आव्हान देता येणार नाही अशा भ्रमात राहू नये, एवढीच अपेक्षा आहे. त्यामुळेच हे प्रकरण आपण संपवून टाकू आणि सुखेनैव कारभार करीत राहू अशी एक चुकीची समजूत पसरविण्याचे काम अपप्रचारकांनी सुरू केले आहे. त्यांना त्यांच्या आनंदात ठेवणे अधिक चांगले.



**सर्वात महत्त्वाची बाब आहे ती पक्षफुटीची**

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील या फंदफितुरीच्या प्रकरणी त्यांच्यासमोर दाखल प्रकरणाचा निकाल विचारात घेण्यापूर्वी मूळच्या पक्षांतरबंदी कायद्यातील तरतुदीही सामान्य भाषेत लक्षात घ्याव्या लागतील. त्यातील सर्वात महत्त्वाची बाब आहे ती पक्षफुटीची. सर्वप्रथम सोळा आमदार फुटले होते आणि त्यानंतर हळूहळू एकापाठोपाठ गळती लागल्याप्रमाणे आमदार फुटलेले होते. एखाद्या पक्षात फूट पडली असे म्हटले जाते तेव्हा ती एकाच वेळी घडलेली घटना म्हणून मानली जात असते, ज्याला इंग्रजीत 'वन टाईम अफेयर' म्हटले आणि मानले जाते. म्हणजेच फूट ही निरंतर चालणारी प्रक्रिया (कंटिन्युइंग अफेयर) मानण्यात आलेली नाही. म्हणूनच जेव्हा एकनाथ शिंदे आणि सोळा आमदार सर्वप्रथम फुटले तेव्हा त्यांच्याकडे पक्षांतरबंदी कायद्यातील तरतुदीनुसार दोन-तृतीयांश ही संख्या नव्हती. त्यामुळेच शिवसेना विधिमंडळ पक्षाचे अधिकृत प्रतोद सुनील प्रभू यांनी या आमदारांना अपात्र करण्याचे पत्र विधानसभा अध्यक्षांना दिले होते. त्यावेळी विधानसभेचे पूर्णकालिक अध्यक्ष नसल्याने उपाध्यक्ष नरहरी झिरवळ हे अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत होते. त्यांनी या आमदारांना अपात्रतेसंदर्भातील नोटिसा पाठविल्यानंतर त्यांच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले होते. ते प्रकरण प्रलंबित आहे. त्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने वर्तमान विधानसभा अध्यक्षांकडे सुपूर्द केला आहे. तो करताना अध्यक्षांचा निर्णय निःपक्षपातीपणाच्या तत्त्वाच्या आधारे असला पाहिजे याची आठवणही न्यायालयाने त्यांना करून दिली आहे. तरीही अध्यक्षांनी स्वतःचा अधिकार दाखविण्याकरिता हा निर्णय करण्याचा अधिकार त्यांचाच आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र त्यांनी केलेल्या निर्णयाची न्यायालयीन छाननी होऊ शकते, हे सांगताना ते आढळत नाहीत.

**या मुद्यावर भविष्यातही वादंग होणे अपेक्षित**

अध्यक्षांच्या अनुपस्थितीत त्या पदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांना आमदारांना अपात्रतेबाबत नोटिसा काढण्याचा अधिकार नाही. कारण ते हंगामी अध्यक्ष असल्याचा युक्तिवाद केला आहे. या मुद्याबाबत स्पष्टता होण्याची आवश्यकता आहे. कारण अध्यक्ष अस्तित्वात असताना उपाध्यक्षांना निर्णायक अधिकार नसणे ही बाब ग्राह्य आहे; परंतु अध्यक्षाची निवडच झालेली नसताना आणि अध्यक्षांच्या सर्व जबाबदाऱ्यांचे निर्वहन उपाध्यक्ष करीत असताना केवळ अपात्रतेबाबत त्यांनी केलेला निर्णय अमान्य करणे हे तर्कसंगत नाही. त्यामुळे या मुद्यावर भविष्यातही वादंग होणे अपेक्षित आहे.

**अध्यक्षांच्या निःपक्षपातीपणाची कसोटी**

न्यायालयाने फुटीर गटाने नेमलेले प्रतोद भरत गोगावले यांची नियुक्ती अवैध ठरवून मूळचे प्रतोद सुनील प्रभू यांची नियुक्ती वैध मानली आहे. या मुद्यावरही मोठी क्लिष्टता निर्माण झालेली आहे. कारण सुनील प्रभू हे अधिकृत प्रतोद मानण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास मान्यता दिल्यास त्यांनी आमदार अपात्रतेबाबत केलेला पत्रव्यवहारही अधिकृत व मान्यताप्राप्त मानावा लागेल. त्याबाबत अध्यक्षांना निर्णय करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. येथे वर्तमान विधानसभेच्या अध्यक्षांच्या निःपक्षपातीपणाची कसोटी लागू शकते. त्यांनी कोणत्याही बाजूने निर्णय केला तरी त्यास न्यायालयात आव्हान दिले जाणार हे स्पष्ट आहे. या अडचणींमुळेच अध्यक्षांनी त्यांना दहाव्या परिशिष्टाचा (राज्यघटनेच्या) म्हणजेच पक्षांतरबंदी कायद्याचा अभ्यास करावा लागेल, असे सांगितले आहे. न्यायालयाने अध्यक्षांना लवकरात लवकर निर्णय करण्यास सांगताना वेळकाढूपणा करू नये, असेही सुनावले आहे. याचे कारण स्पष्ट आहे. महाराष्ट्रात पुढील वर्षी ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणुका (वेळापत्रकाप्रमाणे) होणे अपेक्षित आहे. त्यामुळे या प्रकरणाचा निर्णय करताना वर्षाचा अवधी संपवायचा आणि निवडणुकीच्या तोंडावर निर्णय केल्यासारखे दाखवायचे हे चालणार नसल्याचेही न्यायालयाने सूचित केले आहे. त्यामुळेच न्यायालयाने या प्रकरणातील निर्णय करताना अनेक तिढे घालून ठेवलेले आहेत.

**एक नवी पद्धत भारतीय राजकारणात रूढ!**

अलीकडच्या काळात पक्षांतरबंदी कायद्याचे सोयीस्कर, आपल्याला अनुकूल असे अर्थ लावण्याचे प्रकार सर्रासपणे सुरू झालेले आहेत. चुकीचा निर्णयही रेटून करून टाकायचा आणि मागाहून न्यायालयीन खेळ खेळत बसण्याची एक नवी पद्धत भारतीय राजकारणात रूढ होताना दिसते आहे. ती लोकशाहीलाच घातक आहे; परंतु सध्याच्या राज्यकर्त्यांनी या खेळात विशेष प्रावीण्य व कौशल्य प्राप्त केलेले आहे. त्यामुळे पक्षांतरबंदी कायद्याचाही आपल्याला उपयोग पडेल असाच अर्थ लावण्याचे प्रकार चालूच आहेत. मूळ पक्षांतरबंदी कायद्यानुसार मूळ जो पक्ष आहे त्यास प्राधान्य ठेवले आहे; परंतु केवळ पक्षाच्या विधिमंडळ किंवा संसदीय पक्षातील दोन तृतीयांश सदस्य म्हणजेच आमदार किंवा खासदार फुटले म्हणून लगेच पक्ष फुटला असे गृहीत धरणे कायद्याला मान्य नाही. याचे कारण विधिमंडळ पक्ष किंवा संसदीय पक्ष ही केवळ मुख्य म्हणजेच मूळ पक्षाची केवळ एक शाखा आहे. त्यामुळे केवळ एक फांदी वृक्षापासून अलग होणे याचा अर्थ संपूर्ण वृक्ष उन्मळून पडला असे मानता येत नाही, तसाच काहीसा हा प्रकार आहे. म्हणूनच मूळ पक्षातील दोन-तृतीयांश सदस्यांनी वेगळी चूल मांडण्याचा निर्णय केल्यास त्याला फूट मानता येते; परंतु निवडणूक आयोगाने याबाबत कोणताही विवेक न दाखवता आणि कोणत्याही प्रकारे या कायद्याचा शास्त्रशुद्ध अर्थ न लावता एकतर्फी व अशास्त्रीय निर्णय करून शिंदे गटाला मूळचा शिवसेना पक्ष आणि त्या पक्षाचे अधिकृत निवडणूक चिन्ह धनुष्यबाण बहाल करून टाकले. या निर्णयाला कोणताही तर्कसंगत कायदेशीर अधिकार नाही; परंतु यासंदर्भातील निर्णायक अधिकार त्यांच्याकडे असल्याने त्यांनी एकतर्फी व सत्तापक्ष व राज्यकर्त्यांना अनुकूल निर्णय देऊन टाकला. त्यामुळेच आता या कायद्याच्या आधारे आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय कसा केला जाणार याची प्रतीक्षा सर्वांना करावी लागणार आहे.

**राजकीय वातावरण सत्तापक्षाला फारसे अनुकूल नाही**

कायदेशीर आणि तांत्रिक बाबींवर न्यायालयीन लढाई चालूच राहणार आहे. यातून निर्माण होणारे राजकीय प्रश्नदेखील तेवढेच महत्त्वाचे आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेची मुदत पुढील वर्षी ऑक्टोबर महिन्यात संपणार आहे. अलीकडच्या काळातील बाजार समित्या असोत किंवा कसबापेठेसारखी विधानसभेची पोटनिवडणूक असो, राजकीय वातावरण सत्तापक्षाला फारसे अनुकूल नाही. लोकांमधील शिंदे-फडणवीस सरकारबद्दलची नाराजी वाढत चालली आहे, असंतोषही वाढत चालला आहे. तो लक्षात घेता आगामी काळातील विधानसभा निवडणूक या जोडगोळीला (शिंदे-फडणवीस) फारशी सुसह्य होणारी नाही. कर्नाटकात भाजपने ज्याप्रकारे मार खाल्ला आहे, तो पाहता लोकांना आता हिंदू-मुस्लिम वाद पैदा करून मते मिळविण्याच्या मोदी-शाह यांच्या युक्तीचा कंटाळा आलेला आहे. कारण हिंदू-मुसलमान करून सामान्यांचे दैनंदिन जीवनाचे प्रश्न व समस्या सुटेनाशा झाल्या आहेत. भावनेचे मुद्दे उपस्थित करून जनतेला संभ्रमित करण्याचे प्रकारही जनता ओळखून चुकलेली आहे. त्यामुळेच येणाऱ्या निवडणुकांमध्ये मोदी-शाह यांना नव्या युक्त्या व चलाख्या शोधाव्या लागतील. त्या जनतेला पसंत पडल्या तर ठीक, अन्यथा पराभव निश्चित हे



भाजपला फारसे पचनी न पडणारे वास्तव आहे. ही परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक वेळापत्रकाच्या अगोदर म्हणजे ऑक्टोबर-२०२४ पूर्वीच होण्याची आणि लोकसभेच्या एप्रिल-मे महिन्यात होणाऱ्या निवडणुकांबरोबरच होण्याची दाट शक्यता आहे. यामागील तर्क स्पष्ट आहे. शिंदे-फडणवीस यांच्या चेहऱ्यांच्या आधारे विधानसभा निवडणूक झाल्यास जनता त्यांना आपली पसंती देईल अशी कोणतीही चिन्हे तूर्तास दिसत नाहीत. त्यापेक्षा मोदी-शाह यांच्या चेहऱ्यांच्या बळावर लोकसभेबरोबरच विधानसभा निवडणूक घेतल्यास त्याचा राजकीय लाभ मिळू शकेल अशी अटकळ भाजप मनाशी बांधून आहे. त्या परिस्थितीत विधानसभेवर कब्जा करणे काहीसे सुलभ जाईल असे भाजपला वाटते. पराभव झाला तरी त्याची जबाबदारी स्थानिक नेतृत्वावर येणार नाही ही विचारही त्यामागे असावा. त्याचप्रमाणे एकंदरीत न्यायालयाचा शिंदे गटाबद्दल किंवा एकंदरीतच शिवसेनेतील फूट व त्याआधारे स्थापन सरकारबद्दलचा दृष्टिकोन त्यांनी स्पष्ट केलेला आहे. सरकार वाचल्याच्या कितीही फुशारक्या मारल्या तरी शिंदे-फडणवीसांनी आणलेले ते उसने अवसान आहे. भाजपला शिंदे गटाचे लोढणे फार काळ सहन करणे अशक्य आहे. त्या दृष्टीनेदेखील लवकरात लवकर महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचे निमित्त करून शिंदे गटाचे लोढणे गळ्यातून दूर करणे भाजपला शक्य होईल. तसेच सध्या तांत्रिकदृष्ट्या शिंदे गट हाच मूळ शिवसेना पक्ष आहे अशी मान्यता देऊन निवडणूक आयोगाने धनुष्यबाण चिन्हही त्यांना बहाल केले आहे. त्यामुळे शिंदे गटाला खतम केल्यानंतर शिवसेना खतम केल्याचा तांत्रिक आनंद भाजपची मंडळी साजरा करू शकतील. शिंदे गटाने भाजपमध्ये विलीन व्हावे किंवा भाजपचे दास्यत्व पत्करावे अशी वेळ आणून भाजप शिंदे गटाचे अस्तित्व संपवू टाकू शकेल. मग महाराष्ट्रातील एकमेव हिंदुत्ववादी शक्ती म्हणून भाजपच्या नेत्यांना टिमकी वाजवण्यास सुरुवात करता येईल. थोडक्यात, या न्यायालयीन लढाईची परिणती एका नव्या राजकीय परिस्थितीत होऊ शकते. त्या दृष्टीनेदेखील महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका काही महिने अलीकडे घेण्याची खेळी खेळली जाऊ शकते. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांना याची जाणीव झालेली आहे आणि त्यामुळेच हे पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागलेले आहेत. ●●●


**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# काखेत कळसा अन् गावाला वळसा!



संजय पवार

**पुस्तकाच्या नव्या आवृत्तीत घातलेल्या नव्या मजकुराची भर किंवा राजीनाम्याची घोषणा यातून पुन्हा महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी येतानाच देश पातळीवरही महाराष्ट्रात साहेबांनी केलेला प्रयोग जर करायचा असेल, तर पवार पॉवर नावाची गोष्ट सर्व राष्ट्रीय नेत्यांनीही लक्षात ठेवावी यासाठीही हा वळसा असावा! साहेबांना काखेतल्या कळसाची काळजी नव्हतीच, तर देशपातळीवर ती नोंद व्हावी यासाठी हा तीन दिवसांचा वळसा होता.**



कर्नाटकात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना, राज्यातील सत्तासंघर्षाच्या न्यायालयीन लढाईचा निर्णय आठ/पंधरा दिवसात अपेक्षित असताना, सलग सुट्ट्यांचा आनंद वाहनकोंडीत लोक अनुभवत असतानाच अवकाळी पाऊसच नाही, तर आता अवकाळी हवामानात जनता भाजून, भिजून नि किंचित गारव्यात महागाईमिश्रित देशाभिमान बाळगीत, आयपीएलच्या मस्तीत, महाराष्ट्र सुशेगात पडलेला असतानाच, १ मे च्या महाराष्ट्र दिनाच्या दुसऱ्याच दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी महाराष्ट्राला व देशाला तीन दिवस फक्त आणि फक्त त्यांच्याकडे लक्ष द्यायला लावले!

**ही एकच ओळ अणुबॉम्बसारखी महाराष्ट्रावर पडली**

गोष्ट एका ओळीचीच होती. पण तिची विश्वास पाटलांना दमवेल अशी महाकादंबरी झाली! एक ओळ काय होती? तर, मी अखिल भारतीय राष्ट्रवादी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे! या ओळीच्या मागेपुढेही बरीच वाक्ये होती, सूचना होत्या, नावं होती; पण ते सगळं आऊट ऑफ फोकस झालं आणि ही एकच ओळ अणुबॉम्बसारखी महाराष्ट्रावर पडली.

ही ओळ उच्चारली गेली शरद पवार साहेबांच्या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या 'लोक माझे सांगाती' या राजकीय आत्मकथनात नवी भर घालून नवी आवृत्ती प्रकाशित केल्या गेलेल्या समारंभात आभाराचे भाषण करताना!

प्रसंग पुस्तक प्रकाशनाचा. यशवंतराव चव्हाण केंद्र मुंबईच्या सभागृहात. मंचावर दोन संपादक. प्रतिभा पवार, सुप्रिया सुळे, हेमंत टकले, अरूण गुजराथी, ग्रंथाचे शब्दांकन करणारे कुलकर्णी, निवेदक दत्ता बाळसराफ (ते विंगेतून आत-बाहेर) बस्स. एवढेच लोक. पण सभागृहात मात्र पुस्तक प्रकाशनासाठी अपेक्षित साहित्य, सांस्कृतिक आणि सर्वपक्षीय राजकीय प्रेक्षकांची अनुपस्थिती! उपस्थित सर्व पक्षांचे टॉप टू बॉटम नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी!

पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनाला वर म्हटल्याप्रमाणे संमिश्र प्रेक्षक होता. साहजिकच बॉम्ब नेम धरून मारला गेला! त्यामुळे या सर्व प्रकरणांत एक उत्स्फूर्ततेचा देखावा उभा करण्यात आला.पवार कुटुंबियांना साहेब वाचत असलेल्या लिखित भाषणाची ओळ आदल्या दिवसापासूनच माहीत होती. त्यामुळे पुस्तक प्रकाशनाला अगदी तालुका स्तरावरील कार्यकर्ता, नेता यांना उपस्थितीचा अलिखित आदेश होता. त्यामुळे उपस्थित दोन संपादक बॉम्ब पडताच आपल्या वर्तमानपत्र वा वाहिनीपुरता ऐवज गोळा होताच समोरच्या रूदाली वर्तुळातून काढता पाय घेते झाले. नंतर उरला तो फक्त न फक्त पवार आणि राष्ट्रवादीचा परिवार.

**...तर यात रडण्यासारखे काय आहे?**

गायीपासून तुटलेले वासरू हंबरत रहावे तसे बडे-छोटे नेते हंबरू लागले. कुणी मुसमुसले, कुणी ढसाढसा, कुणी ओक्साबोक्शी रडत होते. प्रतिभाताई कधी मंद हसत, तर कधी शांतपणे हे सामूहिक रडगाणं पाहत होत्या. त्यातच कुणी पोडियमवरच्या माईकचा ताबा घेऊन घोषणा दिल्या, हुशारांनी वाहिन्यांचे कॅमेरे बघून पोझ, घोषणा दिल्या व रडगाणे गायले. कसा कोण जाणे; पण एक माईक फिरत होता व दस्तुरखुद्द साहेब हाताने इशारा करत हा माईक कुणाला द्यावा, हे निर्देशित करत होते व चेहऱ्यावर एकच भाव ठेवत ऐकत होते. साहेबांनी एकाचे संपताच, दुसरा बोलेल हे हाताच्या इशाऱ्याने चालू ठेवत बाजूला बसलेल्या, मागे उभ्या नेत्यांना माईक फिरता

ठेवायला लावला.

शेवटी बहुधा अजित पवारांना हा रूदाली नाटकीपणा अती होतोय असं वाटलं असावं. कारण समोर साहेब खुर्चीत बसलेत व फक्त नी फक्त अध्यक्षपदाचा राजीनामा दिलाय. ना पक्ष सदस्यत्व सोडलंय, ना राजकारण, ना पक्षीय घडामोडीतून बाहेर झालेत. तर हा तमाशा कशाला? शेवटी माईक स्वत:कडे घेत अजितदादा करड्या कोरडेपणाने म्हणाले, की वयोमानपरत्वे साहेबांनी अध्यक्षपद सोडून नव्या नेतृत्वासाठी जागा तयार केली असेल, तर यात रडण्यासारखे काय आहे? त्यांनी स्वत:च पुढचा अध्यक्ष निवडायला समितीही जाहीर केलीय. त्यांच्या वयाचा, इच्छेचा सन्मान करूया व नवा अध्यक्ष निवडूया. काही क्षण शांतता. साहेबही किंचित सतर्क की आता दादा सर्व सूत्र हाती घेऊन आजच, इथेच नवा अध्यक्ष निवडतो की काय!

दादांच्या करड्या कोरडेपणाला साहेबांनी काहीच प्रतिसाद न देता समोर पाहिलं तसा अपेक्षित हंबरडा फुटून नाही, नाही, नाही, साहेबच अध्यक्ष हवेत दुसरा नको, चालणार नाही. सुप्रिया सुळे तर सामान्य कार्यकर्ता होत त्यांच्यातच मांडी घालून बसल्या सस्मित मुखाने. मग महिला मंडळी कलकल करत ताई तुम्ही बोला, तुम्ही बोला म्हणत माईक शोधू लागल्या तसे दादा गरजले सुप्रिया तू बोलू नको. मोठा भाऊ म्हणून सांगतो! तशा सुप्रियाताईही सत्तरच्या दशकातल्या मराठी सिनेमातल्या धाकट्या ताई थोरल्या दादाचे ऐकत तशा मुकाट बसल्या, पण सस्मित.

**'भाकरी नाही, ओळ फिरवा'**

दादांचा रोखठोकपणा सर्व रडतराऊतांनी धुडकावून लावला साहेबांसमक्ष! जणू काही साहेबांचाच मूक आदेश असावा, तसे सगळे तुम्हीच तुम्हीच म्हणत साहेबांना घेरून राहिले. 'भाकरी नाही, ओळ फिरवा' म्हणू लागले. शेवटी जेवणाच्या वेळेचा वैद्यकीय फतवा फिरवून साहेबांची सोडवणूक केली गेली. साहेब घराकडे गेले. मग नेते म्हणू लागले, आता आम्ही जाऊन त्यांना समजावतो. तरीही कार्यकर्ते हटेनात. मग संध्याकाळी साहेबांनी दोन/तीन दिवसांचा वेळ मागितलाय, असं सांगून तो दिवस मावळतीला गेला.

नंतर एक खास साहेबांच्या शैलीतील एक गोष्ट घडली. म्हणजे त्यांनी कार्यकर्त्यांकडून वेळ मागून घेतानाच साहेब म्हणाले, मी तुम्हाला निराश करणार नाही. या शब्दांमुळे साहेब अध्यक्षपदी राहत कार्याध्यक्ष वगैरे नेमून पक्षांतर्गत पुढील दिशा वगैरे ठरवतील, अशी चर्चा माध्यमांत सुरू झाली.

साहेबांनी जी समिति नेमली होती त्या समितीने साहेबांची भेट घेतली. पक्षातले वातावरण पाहून साहेबांनी मनोमन काही गोष्टी ठरवल्या. लगेचच ५ तारखेला समितीची बैठक लावली. त्यावरूनही विविध आडाखे बांधायला सुरुवात झाली. पण समितीच्या बैठकीआधीच साहेबांनी नवा अध्यक्ष निवडण्यासाठी जी समिती नेमली होती, त्या समितीच्या कार्यकक्षेत एका ओळीचा बदल केला किंवा एक ओळ वाढवली म्हणा. ती ओळ अशी होती, की नवा अध्यक्ष निवडण्याआधी साहेबांचा जो राजीनामा आहे तो स्वीकारायचा, की फेटाळायचा याचा निर्णय ही समिती घेऊ शकते जो साहेबांवरही बंधनकारक राहील!

**...मग या दोन दिवसांत साहेबांनी नेमके साधले काय?**

थोडक्यात, नवीन भर घातलेल्या ओळीने समितीने काय निर्णय घ्यावा, याचेच दिशादिग्दर्शन केलेले होते. त्यामुळे समितीने एक औपचारिकता पार पाडायची होती. तोवर साहेबांनी नवं पत्र तयार करायला घेतलं होतं, जे त्याच संध्याकाळी त्यांनी वाचून दाखवलं. ढोल, फटाके वाजले. सस्मित सुप्रियाजी होत्या. पण दादा स्वाभाविकपणे अनुपस्थित राहिले. कारण दादांच्या मनात आलंच असणार, की निर्णय मागे घ्यायचाच होता तर मग हा वळसा कशाला? इतर कुणी काही म्हणो. पण दादांच्या मनात हे आलं असेल, तर ते चुकीचं नव्हतंच. उलट अधिक योग्य म्हणता येईल. पण साहेब २ तारखेच्या देहबोलीला झटकून ५ तारखेच्या संध्याकाळी ते पुन्हा मूळ शारीरबोलीत आले. मग या दोन दिवसांत साहेबांनी नेमके साधले काय?

साहेबांनी राज्यात व देशात हा संदेश दिला, की पक्षाबद्दलच्या वावड्या या फक्त वावड्याच आहेत. राष्ट्रवादी हा आजही पवार परिवार केंद्रितच पक्ष राहणार आणि साहेब व निवृत्ती हा मोदी–शहांप्रमाणेच एक जुमला होता!

हे एवढंच होतं, का दादा व भाजपकडे आकर्षित होत असलेल्यांना जागा दाखवायची होती? सुप्रियाचा राज्याभिषेक करायचा होता? महाविकास आघाडीसह भाजप–शिंदेंनाही दाखवून द्यायचं होतं का, की टायगर जिंदा है?

हे असेलच सगळं. पण या पलिकडे पक्षाचा राष्ट्रीय दर्जा निवडणूक आयोगाने तूर्तास रद्द केलाय. अशा वेळी राष्ट्रीय पातळीवर विरोधी आघाडीची जुळवाजुळव करताना आपल्याला तो सन्मान तांत्रिक पद्धतीने मिळेल, का निव्वळ मार्गदर्शक म्हणून आमंत्रण येत राहील?

पदावर नसताना गांधी कुटुंबाला पक्षात व पक्षाबाहेर जे महत्त्व मिळतं, तसंच महत्त्व अध्यक्ष नसताना आपल्याला मिळेल? हा प्रश्न साहेबांच्या मनात येऊन गेलाच असणार. कारण 'भारत जोडो'नंतर बदललेली राहुल गांधींची प्रतिमा आणि महाविकास आघाडीसह जनतेत उद्धव ठाकरेंचं वाढत चाललेलं महत्त्व अशा काळात माध्यमांसह सर्वत्र कुठेतरी बाजूला पडत चाललेले साहेब आपलं महत्त्व अधोरेखित करण्यासाठीची संधी शोधत होते.

पुस्तकाच्या नव्या आवृत्तीत घातलेल्या नव्या मजकुराची भर किंवा राजीनाम्याची घोषणा यातून पुन्हा महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी येतानाच देशपातळीवरही महाराष्ट्रात साहेबांनी केलेला प्रयोग जर करायचा असेल, तर पवार पॉवर नावाची गोष्ट सर्व राष्ट्रीय नेत्यांनीही लक्षात ठेवावी यासाठीही हा वळसा असावा! साहेबांना काखेतल्या कळसाची काळजी नव्हतीच, तर देशपातळीवर ती नोंद व्हावी यासाठी हा तीन दिवसांचा वळसा होता.

साहेबांना देशभरातून आलेले फोन २ तारखेला उच्चारलेल्या ओळीने सिल्व्हर ओक व चव्हाण प्रतिष्ठानात, त्यांच्या वैयक्तिक मोबाईलवर आले आणि साहेब नव्या दमाने गोविंदबागेकडे निघाले! मनात म्हणत असतील याचसाठी केला होता अट्टाहास! ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# न्यायालयीन निकाल, एन्काऊंटर्स व बुलडोझर्समुळे धार्मिक ध्रुवीकरणास मदत



कॉ. भीमराव बनसोड

**बहुसंख्यांक लोकांना हे जे काही चालू आहे ते सर्व आपल्याच बाजूने आहे, असे त्यांना वाटते. एकप्रकारे ते अशा न्यायालयीन निकालातून, मुस्लिमांच्या एन्काऊंटर्समधून अथवा त्यांच्या घरादारावर चालत असलेल्या बुलडोझर्समधून आसुरी आनंद घेत असतात व त्या आनंदातच ते भाजपाच्या बाजूने मतदान करीत असतात. त्यांच्या महागाई, बेकारी, टंचाई, भ्रष्टाचार इत्यादी सर्व प्रश्नांबद्दल त्यांना बऱ्यापैकी बेफिकीर करण्यात सत्ताधारी पक्ष व वर्ग यशस्वी झालेला आहे.**

भारतीय संविधानाने भारताची लोकशाही राज्यपद्धत म्हणून संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. त्यानुसार २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान राष्ट्राला अर्पण करण्यात आले. या संविधानानुसार 'एक व्यक्ती, एक मूल्य, एक मत' हे तत्त्व स्वीकारले. त्यानुसार देशातील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळाला. त्यात गरीब-श्रीमंत, जात, वर्ण, धर्म, लिंग इत्यादी कोणताही भेदाभेद करण्यात आला नाही. ही भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत मौल्यवान गोष्ट होती. ज्या पक्षाच्या बाजूने बहुमत असेल, त्यांचं सरकार बनेल हे तत्त्व त्यातून स्वाभाविकपणेच सर्वमान्य झाले.





त्यामुळे आपल्या पक्षाचे सरकार सत्तेत यावे यासाठी वेगवेगळे राजकीय पक्ष जनतेला आपल्या बाजूने वळवण्याकरिता, जनतेच्या दैनंदिन जीवनातील जे प्रश्न असतील ते आमच्या पक्षाचे सरकार सत्तेत आल्यानंतर आम्ही सोडवू, अशी आश्वासने आपल्या पक्ष जाहीरनाम्यातून देत होते. याप्रमाणे जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडणे व जो पक्ष असे प्रश्न सोडवेल त्या पक्षाला मतदान करणे असा रिवाज पडला.

**धार्मिक ध्रुवीकरणात हातखंडा**

पण आता तर आपल्या देशातील आरएसएसच्या नेतृत्वाखालील पक्ष संघटनांनी व मुख्यतः त्यांची राजकीय आघाडी असलेल्या भाजपने या देशात स्वाभाविकपणे बहुसंख्य असलेल्या हिंदूधर्मीय मतदारांना धर्माच्या नावाने संघटित करण्याचा व त्यांना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न पूर्वीच्या तुलनेत कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणात व यशस्वीपणे केला आहे.

जनतेचे जे दैनंदिन प्रश्न होते त्या प्रश्नावरून लक्ष हटवून व जनतेनेसुद्धा ते हटू देऊन हिंदू-मुस्लिम, अल्पसंख्यांक-बहुसंख्यांक अशाच मुद्यावर त्यांना मतदान केले. त्यामुळे स्वाभाविकपणे आपल्या देशात हिंदुधर्मीय जनता जास्त संख्येने असल्याने तेच ठिकठिकाणी त्यानंतरच्या काळात निवडून येत आहेत. हिंदुधर्मीय जनतेला भूलविण्यासाठी त्यांनी हिंदू राष्ट्राच्या स्थापनेची घोषणा पूर्वीपासूनच केली आहे. तेव्हा आजच्या घडीला हा फार्मूला ते कशा पद्धतीने वापरत आहेत? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या न्याय संस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यांच्या निकालाचा वापरही धार्मिक ध्रुवीकरणासाठीच करण्यात येत आहे.

बाबरी मशिदीच्या जागेवर राम मंदिर बांधण्याचा दिलेला निर्णय हा त्यापैकीच एक आहे. या निर्णयाने केवळ भाजप, आरएसएस

यांचाच केवळ नव्हे तर तमाम हिंदुत्ववाद्यांचा उत्साह वाढला आहे. त्याशिवाय नजीकच्या काळातील असे काही निकाल म्हणजे मलियाना, हाशिमपुरा, नरोदा पाटिया, बिल्कीस बानो इत्यादी प्रकरणी दिलेले निकाल होत. तेही याचप्रकारे हिंदुत्ववाद्यांना मदतनीस ठरतात. यापैकी काही घटना ह्या काँग्रेस सत्तेत असतानाच्या काळात घडलेल्या आहेत तर काही भाजपाच्या काळातील आहेत. पण निकाल मात्र आत्ता भाजपाच्याच काळात लागत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

मलियाना, हाशिमपुरा येथील मुस्लिम समुदायातील लोकांना पोलीस दलाने गोळ्या घालून ठार मारले आहे. काही प्रकरणी हिंदुत्ववाद्यांनी मुस्लिमांना ठार मारले आहे, जिवंत जाळले आहे, बलात्कार केले आहेत. इतके गंभीर गुन्हे असतानाही अशा गुन्ह्यातील आरोपींना माननीय न्यायालयाने निर्दोष सोडून दिले आहे. ह्या प्रत्यक्ष घडलेल्या घटना आहेत. त्यात जीवित हानी झालेली आहे. बलात्कार झालेले आहेत. असे असतानाही आपल्या येथील नोकरशाहीची रचनाच जणू काही अशी झाली आहे, की या लोकांना न्याय मिळणे दुरापास्त व्हावे. त्यासाठी त्यांचा एफ आय आर न नोंदवणे, त्यासाठी टाळाटाळ करणे, साक्षी पुरावे मिळणार नाहीत अशी या यंत्रणे कडूनच व्यवस्था होऊ देणे, पुरावे काळजीपूर्वक गोळा न करणे, असलेले पुरावे नष्ट करणे, साक्षीपुरावे असलेच, तर त्यांना धाक दडपशा अथवा आमिषे दाखवून त्यापासून वंचित करणे, न्यायालयापुढे योग्य पुरावे न येऊ देणे इत्यादी सर्व हातखंडे वापरल्या जातात. इतके करूनही काही बाबतीत पुरावे असलेच तरी न्यायालयाच्या दृष्टिकोनामुळेही सदरील आरोपी निर्दोष सुटतात असाच या प्रकरणातून आलेला अनुभव आहे. उदा...

**मलियानातील, हासिमपुरा हत्याकांड**

उत्तर प्रदेशातील मेरठच्या सीमेवर असलेल्या मलियाना गावात ३६ वर्षांपूर्वी २३ मे १९८७ रोजी ७२ मुस्लिमांची हत्या करण्यात आली होती. झालेल्या या धार्मिक हिंसाचारप्रकरणी कनिष्ठ न्यायालयाने ४१ आरोपींची नुकतीच निर्दोष मुक्तता केली आहे. उत्तर प्रदेशचे डीजीपी राहीलेले विभूती नारायण राय यांनी या विषयावर बोलताना बीबीसीला सांगितले, हे राज्याच्या पूर्ण अपयशाचे प्रकरण आहे. त्याचे सर्व भागधारक म्हणजे पोलीस, राजकीय नेतृत्व, पक्षपाती माध्यमे आणि आता न्यायव्यवस्थाही पीडितांना न्याय देण्यात अपयशी ठरली आहे. हिंसाचाराच्या हृदयद्रावक घटना घडूनही, आरोपींना निर्दोष सोडण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाने पीडित आणि त्यांच्या कुटुंबीयांना धक्का बसला आहे.

२२ मे रोजी म्हणजे मलियाना हत्याकांडाच्या एक दिवस आधी पीएसीचे लोक हाशिमपुरामध्ये घुसले होते. हाशिमपुरा हा मुस्लिमबहुल भाग असून मलियानापासून फक्त सहा किलोमीटर अंतरावर आहे. पीएसी जवानांनी येथून ४८ मुस्लिमांना बाहेर काढले आणि त्यातील ४२ जणांना गोळ्या घालून ठार केले. त्यानंतर त्यांचे मृतदेह नदी आणि कालव्यात फेकून देण्यात आले. यातीलही सर्व आरोपींना निर्दोष सोडण्यात आले आहे.

**बिल्कीस बानो बलात्काऱ्यांना माफी**

जेव्हा देश स्वातंत्र्याचा वर्धापन दिन साजरा करत होता आणि



पंतप्रधान मोदींनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात महिलांचा आदर करण्याचे व्रत घेण्याचे सांगितले होते, त्याच दिवशी गुजरातमध्ये ११ दोषींची सुटका करण्यात आली. २००२ च्या गुजरात दंगलीत बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार आणि तिच्या कुटुंबातील सात सदस्यांच्या हत्येप्रकरणी ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली होती आणि त्यांना गोध्रा तुरुंगात ठेवण्यात आले होते. यानंतर गुजरात सरकारने एक समिती स्थापन केली. या समितीने या प्रकरणातील सर्व ११ दोषींना माफी देण्याच्या बाजूने एकमताने निर्णय घेतला आणि त्यांची सुटका करण्याची शिफारस केली. अखेर १५ ऑगस्ट २२ रोजी या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या ११ दोषींची तुरुंगातून सुटका झाली.

**नरोडा पटिया हिंसाचार**

२००२ साली झालेल्या या दंगलीत ११ जणांचा मृत्यू झाला होता. ज्यामध्ये गुजरातच्या माजी मंत्री आणि भाजप नेत्या माया कोडनानी आणि बजरंग दलाचे नेते बाबू बजरंगी यांच्यासह ८६ जणांना पोलिसांनी तपासाच्या आधारे आरोपी बनवले होते. पण माया कोडनानी-बाबू बजरंगीसह ६७ आरोपींची आता निर्दोष मुक्तता झाली आहे. अशी कितीतरी न्यायालयीन प्रकरणे सांगता येतील.

**एन्काऊंटर्स**

एकीकडे हिंदुत्ववादी आरोपी असलेल्या प्रकरणांचे निकाल वरील प्रमाणे लागत आहेत, तर दुसरीकडे मुस्लीमधर्मीय आरोपी असलेल्यांचे सरसकट एन्काऊंटर्स करण्यात येत आहेत. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये माजी खासदार आणि माफिया अतिक अहमद आणि त्याचा भाऊ अशरफ अहमद यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. त्याच्या एक आठवडा आधी त्यांचा मुलगा असद अहमद याला उत्तर प्रदेशातील झाशी येथे पोलिसांनी 'एन्काउंटर' करून ठार मारले होते.

२००२ ते २००६ दरम्यान गुजरातमध्ये २३ चकमकी झाल्या. इशरत जहाँ एन्काउंटरही त्यापैकीच एक होते. सोहराब हा पत्नीसह हैदराबादहून महाराष्ट्रात जात होता.तीन दिवसांनंतर शेखला अहमदाबादबाहेर बनावट चकमकीत ठार करण्यात आले. तुलसीराम प्रजापती हा सोहराबुद्दीनचा सहकारी होता आणि पोलीस कोठडीत असताना त्याचा मृत्यू झाला होता. डिसेंबर २००६ मध्ये प्रजापतीची हत्या झाली होती.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या म्हणण्यानुसार, ०१ जानेवारी २०१५ ते २० मार्च २०१९ या कालावधीत देशभरातून बनावट चकमकींशी संबंधित २११ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या

प्रकरणांमध्ये पीडितांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याचे आयोगाने मान्य केले आहे.

**बुलडोझर्स**

त्याचबरोबर कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करताच जणू काही त्यांच्यावरील गुन्हा सिद्ध झालाच आहे अशा निष्कर्षाला येऊन त्यांच्या घरा दारावर बुलडोजर्स चालविण्यात येत आहेत. जसे...

प्रयागराज हिंसाचार प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या जावेद मोहम्मदचे घर उत्तर प्रदेश सरकारने बुलडोझरच्या साह्याने जमीनदोस्त केले. त्यावर काही न्यायप्रिय व्यक्तींनी कायदेशीर प्रश्न उपस्थित केले असता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ट्विट केले, की 'गुन्हेगार/माफियांविरुद्ध बुलडोझरची कारवाई सुरूच राहील'

आतापर्यंत चार वेळा मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री झालेले शिवराज सिंह चौहान यांनी नुकतेच म्हटले होते, 'मी बदमाश आणि गुंडांना सोडणार नाही, आम्ही त्यांना धूळ चारत राहू.' शिवराज सिंह चौहान यांच्या सरकारमध्ये गृहमंत्री असलेले नरोत्तम मिश्रा म्हणाले होते, 'ज्या घरातून दगड आले आहेत, आम्ही त्या घरांना दगडांचा ढीग बनवू.' या वक्तव्यानंतर प्रशासनाने खरगोन जिल्ह्यातील अनेक मुस्लिम लोकांची घरे आणि दुकाने प्रशासनाने बुलडोझरच्या सहाय्याने जमीनदोस्त केली.

गुजरातमध्येही घरे आणि दुकाने बुलडोझरने पाडण्याच्या घटना घडल्या आहेत आणि त्यानंतर दिल्लीच्या जहांगीरपुरी येथे झालेल्या जातीय हिंसाचारानंतर बुलडोझरची कारवाई करण्यात आली. काही दिवसांनी शर्मा यांनी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे 'बुलडोजर मामा झिंदाबाद'च्या घोषणा देत स्वागत केले. जे स्पष्टपणे बेकायदेशीर कृत्य होते ते आता राजकीयदृष्ट्या फायदेशीर कृती बनले आहे.

ज्येष्ठ पत्रकार नीरजा चौधरी म्हणतात, अलीकडच्या काळात बुलडोझर वापरण्याच्या परंपरेचे एक कारण म्हणजे 'पाडण्याचे राजकारण'. जर योगी हे उत्तर प्रदेशात करू शकत असतील आणि त्यांना त्याचा फायदा मिळत असेल व आरएसएसचाही पाठिंबा मिळत असेल, तर मग शिवराज का नाही करणार अशी कृती. शिवराजनंतर भाजपशासित प्रत्येक राज्य सरकारला हेच हवे आहे. हे बघून भाजपचे 'धोरण आणि रणनीती' चांगलीच आखलेली आहे, असे वाटते. बुलडोझर चालवून जनतेत लोकप्रियताही मिळते, असे नेत्यांना वाटू लागले आहे.

आज बुलडोझर हे एका मजबूत हाताचे प्रतीक बनले आहे. तो कोणत्याही प्रकारचा गुन्हेगार असो, त्याला चिरडून टाकू शकतो. यामुळे गुन्हेगारांना अल्पसंख्याकांच्या नजरेतूनच पाहिले पाहिजे, असा संदेश देण्यात आला. तसाच संदेश इतर राज्यांमध्येही दिला जात आहे.

वरीलप्रमाणे झालेले न्यायालयीन निकाल, एन्काऊंटर्स व बुलडोझरने घरे जमीनदोस्त करणे या प्रकरणांचा उपयोग धार्मिक ध्रुवीकरण करण्यात होत आहे. त्याचबरोबर मुस्लिम समुदायात न्यायालयाकडून सुद्धा आता न्यायाची अपेक्षा करता येणार नाही, असे वातावरण निर्माण होत आहेत. तो समुदाय एक प्रकारे हतबल झालेला आहे.

गुजरातमध्ये दांडियाच्या काळात मुस्लिम मुलांना चौकात बांधून




सिव्हिल ड्रेसमधील पोलिसांमार्फत मारहाण करण्यात आली होती. त्यांच्या भोवती त्या चौकात हिंदुत्ववादी स्त्री-पुरुष, युवक-युवती जमा होऊन 'भारत माता की जय' च्या घोषणा देत होते. एकंदरीत चौकात त्या तरुणांना अशी होणारी मारहाण ही त्यांचा आनंद द्विगुणीत करीत होती, असेच वाटते. भाजपाला विधानसभेच्या निवडणुकीत अशा प्रकरणांचा फायदा झाला.

हे लोकांना कळत नाही, असं नाही. बहुसंख्यांक लोकांना हे चांगलेच कळते. पण हे जे काही चालू आहे ते सर्व आपल्याच बाजूने आहे असे त्यांना वाटते. एकप्रकारे ते अशा न्यायालयीन निकालातून, मुस्लिमांच्या एन्काऊंटर्स मधून अथवा त्यांच्या घरादारावर चालत असलेल्या बुलडोझर्स मधून आसुरी आनंद घेत असतात व त्या आनंदातच ते भाजपाच्या बाजूने मतदान करीत असतात. त्यांच्या महागाई, बेकारी, टंचाई, भ्रष्टाचार इत्यादी सर्व प्रश्नांबद्दल त्यांना बऱ्यापैकी बेफिकीर करण्यात सत्ताधारी पक्ष व वर्ग यशस्वी झालेला आहे.

कार्ल मार्क्स या तत्त्वज्ञाने शासन संस्थेच्या घटकात पोलीस व विविध प्रकारची सैन्यदले, तुरुंग, नोकरशाही सह न्यायालयांचाही त्यात समावेश केला आहे. (नंतरच्या काळात निवडून आलेल्या सरकार या घटकाचाही समावेश करायला पाहिजे.) हे सर्व घटक मिळून ज्या त्या समाज व्यवस्थेची शासन संस्था बनते, असे त्यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर या शासनसंस्थेचे कार्य म्हणजे ज्या त्या समाज व्यवस्थेतील शोषक वर्गाने शोषण करण्यासाठी शोषितांवर दडपशाही करण्याची यंत्रणा म्हणजे शासन संस्था अशी त्याची व्याख्या केली आहे. थोडक्यात, एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर दडपशाही करण्याची यंत्रणा म्हणजे शासन संस्था होय, असे त्यांचे प्रतिपादन आहे. पण वरील विवेचनावरून भारताची सद्य परिस्थितीतील शासन संस्था म्हणजे बहुसंख्यांक हिंदूधर्मीयांची अल्पसंख्यांक मुस्लिमादी धर्मीयांवर दडपशाही करण्याची यंत्रणा म्हणजे भारतीय शासन संस्था होय, असे आपणाला म्हणता येईल काय? ●●●

**(लेखक कामगार चळवळीतील कार्यकर्ते आहेत.)**


# घटना : देशाचे चारित्र्य बदलण्याचा प्रयत्न



बी.जी. वाघ

**हिंदूराष्ट्रवाद्यांचा सर्वच सुधारणांना विरोध होता. आमच्या समाजव्यवस्थेत, धर्मव्यवस्थेत तुम्हाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. हे हिंदूराष्ट्र आहे आणि आम्हीच त्याचे मालक आहोत. त्यांच्या व्यक्तिगत व जातिगत स्वार्थाला त्यांनी आधी धर्माचा आणि नंतर राष्ट्राचा रंग देऊन सामान्य लोकांना नेहमीच भ्रमित केले आहे. भारताच्या सुदैवाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या व्यवस्थेचे चारित्र्य माहीत होते आणि ते बदलण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हा देशाचे भाग्य बदलण्याचा प्रयत्न होता. हजारो वर्षे ज्यांना समता, बंधुता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय यांची साधी पुसटशी ओळखही नव्हती, त्यांना ते सर्व काही भरभरून देण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केला.**

भारतीय राज्यघटनेने देशाच्या भवितव्याला आकार दिला. तिने देशाचे चारित्र्य बदलण्याचा किंवा घडवण्याचा प्रयत्न केला. धर्म व जातींमुळे या देशाची मानसिकता खेकड्यांसारखी झाली होती. ते ना पुढे सरकत होते, ना इतरांना पुढे जाऊ देत होते. भारतातील वैदिक संस्कृती निव्वळ मिथकीय आहे. तिला सत्याचा पाया नाही; परंतु ती स्वत:ला सनातन समजते. सनातन नावाचा कुठलाही धर्म वा संस्कृती कधी अस्तित्वात नव्हती. 'सनातन'चा अर्थ चिरंतन (eternal). मानवी संस्कृती ही सातत्याने बदलणारी, तर्क, विज्ञान आणि विवेकाद्वारे स्वत:मध्ये बदल घडवून आणणारी एक प्रक्रिया आहे. ग्रीक, रोमन, बॅबिलोनियन या संस्कृती पुढे काळाप्रमाणे बदलल्या. ज्या बदलल्या नाहीत, त्यांना आपण सनातनी म्हणतो. ती एक शिवी आहे; सन्मान नाही.









**स्त्री-शूद्रांचे बौद्धिक, नैतिक अध:पतन घडून आले**

या जगात काहीही निरंतर नाही आणि काहीही चिरंतन नाही. धर्मदेखील बदलत आले आहेत आणि बदलत राहणार आहेत. जे बदलत नाहीत ते नष्ट होतील किंवा मानवजातीच्या विनाशाला कारणीभूत ठरतील. आपण अशा कालखंडातून जात आहोत, की जेव्हा तरुण पिढी धर्मांधतेकडे झुकते आहे आणि राष्ट्रवादाच्या नावाने अधिक हिंसकही झाली आहे. मुख्य म्हणजे, ती राष्ट्रवादी नाही. कारण राष्ट्र ही संकल्पना धर्म, जात, वंश या पलीकडे जाते. राष्ट्राला जेव्हा आपण धर्माशी, जातीशी वा वंशाशी जोडतो, तेव्हा त्याला 'फॅसिझम' म्हटले जाते. आपलीच संस्कृती वा धर्म श्रेष्ठ म्हणणारे लोक एका युद्धाला जन्म देतात आणि हे युद्ध जगभर लढले जात आहे. ते निव्वळ काल्पनिक आदर्शांवर, अस्मितेवर, अहंकार व पूर्वग्रहांवर उभे आहे. एका दगडाला शेंदूर फासून त्याला नरबळी देणाऱ्या आपल्या पूर्वजांसारखेच आपण रानटी राहणार असू, तर तथाकथित संस्कृतीचा आपण अहंकार तरी का बाळगावा? धार्मिक व सांस्कृतिक राष्ट्रवाद हे एक चलनी (किंवा खोटे नाणे) नाणे आहे. ज्याचा वापर राजकारणी लोक सत्ता मिळवण्यासाठी किंवा टिकवण्यासाठी करतात. त्यामुळे त्यांना सामान्य माणसांना फसवणे सहज शक्य होते. माणसे मनाने गुलाम झाल्याशिवाय धर्मांध होत नाहीत. धर्मांधता म्हणजे असुरक्षित मनाचा उन्माद असतो. हा उन्माद वाढवणे हे राज्यकर्त्यांचे काम असते. भारतात नेमके हेच चालू आहे. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाल्यानंतरही माणसे इतकी भयग्रस्त, अविवेकी, मनोरुग्ण वाटावीत इतकी राजकीय पक्षांची वा नेत्यांची गुलाम का झाली असावीत? भारतीय शिक्षणपद्धतीने त्यांना तर्कशुद्ध पद्धतीने विचार करणे शिकवले नाही, हे त्याचे कारण आहे. अंधश्रद्धेलाच धर्म मानणे हे त्याचे दुसरे कारण आहे. शिक्षणाने माणसाला निर्भय केले पाहिजे; परंतु आपल्या शिक्षणव्यवस्थेने गुलामांचे कारखानेच निर्माण केले आहेत. त्यामुळे अंतर्मुख होण्याची गरज आहे. आधुनिक, विज्ञाननिष्ठ शिक्षणाचा अभाव हेच याचे मुख्य कारण दिसते. मनाने, बुद्धीने जे स्वतंत्र व निर्भय करील तेच खरे शिक्षण. धर्म आणि जातीपासून मुक्त करणाऱ्या शिक्षणाची गरज आहे. आपल्या आधुनिक शिक्षणव्यवस्थेचा पाया ब्रिटिशांनी घातला, असे समजले जाते. भारतात शाळा होत्या त्या पंतोजींच्या. त्यामध्ये स्त्रिया व शूद्रांना प्रवेश नव्हता. ब्राह्मणी धर्मशास्त्राप्रमाणे ९० टक्के जनता शूद्रच होती. ज्या गुरुकुल व्यवस्थेचा वैदिकांना अभिमान आहे, त्या व्यवस्थेत ब्राह्मण व क्षत्रिय या दोनच वर्गांना प्रवेश होता. ब्राह्मण हे क्षत्रियांचे आश्रित असले तरी 'गुरू' होण्याचा विशेषाधिकार फक्त ब्राह्मणांनाच होता. या व्यवस्थेमुळे ना भारत विश्वगुरू झाला, ना

त्याने विज्ञानात नवे शोध लावले. विज्ञान, तर्कज्ञान, आधुनिक शास्त्रे, संशोधन, तंत्रज्ञान यांचा मागमूसही या काळात दिसत नाही. वेद, धर्मशास्त्रे आणि पुराणे यात ज्ञानाऐवजी अज्ञानच भरलेले आपल्याला दिसून येते. बुद्धाने या व्यवस्थेला पूर्णत: नकार दिला होता; परंतु अशोकाच्या नातवाच्या खुनानंतर ब्राह्मणवर्गाने एक प्रतिक्रांती घडवून आणली आणि पुन्हा वेदोक्त वर्णाश्रम धर्माची स्थापना केली, ज्यात स्त्री-शूद्रांचे बौद्धिक, नैतिक अध:पतन घडून आले. त्यांची स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमताच नष्ट करण्यात आली, ती कायमचीच. ब्रिटिश शिक्षणव्यवस्था येईपर्यंत त्यात काहीही बदल झाला नाही. मनाने, बुद्धीने, विचाराने स्वतंत्र असलेल्या समाजाची निर्मिती झाली नाही. हा बदल विज्ञाननिष्ठ शिक्षणपद्धतीनेच होऊ शकतो.

**वर्णव्यवस्थेच्या बुरुजाला तडे**

मेकॉलेचा एक उतारा महात्मा गांधींच्या संकलित वाङ्मयातून घेतला आहे. तो म्हणतो, 'ईश्वराने जी ही थोर जमात (भारतीय लोक) आमच्या हवाली केली आहे, तिला आमच्या नियंत्रणात अधिक सुकरतेने ठेवण्याकरिता त्या सबंध जमातीस कधीही सक्तीने बाळगण्यास संमती देणार नाही अथवा त्याचे तोंड आम्ही धाकाने बंद करणार नाही. अथवा त्यांची चलनवलन शक्ती नष्ट करणार नाही. तीन हजार वर्षांच्या अनियंत्रित सत्तेने व पुरोहितवर्गाने समाजाचा ऱ्हास केला आहे. असा समाज आमच्या नियंत्रणाखाली आला आहे. आम्ही कसे आहोत? आम्हाला ईश्वराने असामान्य व्यक्तिस्वातंत्र्य व बौद्धिक प्रकाश यांचा प्रसाद दिलेला आहे. म्हणून आमची नियंत्रण सत्ता चांगल्या प्रकारे वापरणे हे आमचे पवित्र कर्तव्यच आहे. आम्ही स्वतंत्र आहोत, सुधारलेले आहोत; पण इतकेच स्वातंत्र्य व राजकीय सुधारणा जगातील कोणत्याच मानव विभागास देण्याचे जर आम्ही नाकारू, तर आमच्या स्वातंत्र्याचा आणि सुधारणांचा काही उपयोग नाही. भारतात ब्रिटिश येण्याआधी मुघलांचे राज्य होते. ते येण्याआधी भारतात एक विशाल बौद्ध संस्कृती नांदत होती. वैदिक ब्राह्मणवाद आपल्या अस्तित्वासाठी धडपडत होता. भारताचे सुखी, समृद्ध जीवन आपल्याला बुद्धकाळातच दिसते. हा साधारणत: बुद्धानंतरचा हजार वर्षांचा काळ आहे. बौद्धिक व नैतिक स्वातंत्र्याचा हा काळ होता. त्यामुळे भारतात महत्त्वाचे वैज्ञानिक शोध याच काळात लागले. इस्लाम आक्रमणे मूलत: आर्थिक कारणांमुळे होती. भारतात जी आक्रमणे झाली, ती आर्थिक कारणांमुळेच झाली. भारत हा कायम नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असा देश राहिला आहे. अर्थात, आक्रमणाचा प्रभाव सर्वदूर व सर्व क्षेत्रांत होतो, हे उघड आहे. इस्लामी आक्रमणाचे काही चांगले आणि काही वाईट परिणाम निश्चितच झाले. सर्वांत जास्त नुकसान येथील बौद्ध संस्कृतीचे झाले. नालंदा, तक्षशीलासारखी विद्यापीठे जाळण्यात आली. त्यामुळे साहित्य, वाङ्मय नष्ट झाले. विशाल बौद्ध स्तूप, विहारे, बुद्धकालीन शिल्पे नष्ट झाली. पण एक फायदा असा झाला, की वर्णव्यवस्थेच्या बुरुजाला तडे गेले. महात्मा फुले यांनी त्यामुळेच इस्लामचे स्वागत केले. इस्लाममुळे एक 'गंगाजमनी तहजीब'चा विकास झाला.

**भारताच्या अध:पतनाचे मुख्य कारण वैदिक ब्राह्मणवाद**

माणसाच्या बुद्धीच्या विकासासाठी विविध संस्कृतींचा संकर होण्याची आवश्यकता असते. शिक्षण ही मूलत: सामाजिक प्रक्रिया आहे. जितके सामाजिक संबंध मुक्त व निकोप असतील, तितका तो समाज शिक्षित व प्रगल्भ असतो. सम्राट अशोकाच्या काळात भारताचे सर्व दरवाजे भारतीयांसाठी मुक्त होते. त्यामुळे भारत आर्थिक, सामाजिक, राजकीय शिखरांवर होता. बौद्धिक व नैतिक विकासातही भारताने परमोच्च शिखर गाठले होते. या संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे डॉ. आंबेडकरांनी आपल्या 'क्रांती आणि प्रतिक्रांती' या अग्रलेखात दिली आहेत. इस्लामची आक्रमणे रानटी होती, हे निश्चितच; परंतु अरबांनीच गणित, भूमिती, रसायनशास्त्र शिकवले आहे. संगीत आणि कलेचा समृद्ध वारसा त्यांनी जगाला दिलेला आहे. पुढे आत्यंतिक कर्मठपणामुळे त्यांचा विकास थांबला. धर्म, धर्मांधता, कर्मठता, धार्मिक शिक्षण यांनी मानवी संस्कृतीवर नकारात्मक ठसा उमटवलेला आहे. तो पुसून काढणे ज्ञान व सत्याच्या साधनेसाठी आवश्यक असते. भारतातील ज्ञान व सत्याची परंपरा खंडित झाली त्याची कारणे जे. कृष्णमूर्तींनी पंडित नेहरूंना सांगितली आहेत. ते म्हणाले, बुद्धकाळात भारताची बौद्धिक व नैतिक प्रगती शिखरावर होती. त्यामुळे बौद्ध धर्म जगभर पसरला. त्यानंतर भारतात धर्माचे अध:पतन झाले. एकेकाळी बुद्धाने सर्व जग व्यापले होते. ती परंपरा आता लुप्त झाली आहे. तिचे पुनरुज्जीवन (Regeneration) करणे आवश्यक आहे. निव्वळ राजकीय स्वातंत्र्यास मर्यादा आहेत. त्यामुळे भारताचा उद्धार होत नाही. भारताचे ते 'स्वत्त्व' जागवले पाहिजे. आता धर्म म्हणजे जाती, गुरू परंपरा, महंत पीठ आणि कर्मकांडे उरली आहेत. त्यात धर्म कोठे आहे? भारताच्या अध:पतनाचे मुख्य कारण येथील वैदिक ब्राह्मणवाद आहे. त्याने आता हिंदूराष्ट्राचे रूप धारण केले आहे. तो समजल्याशिवाय भारतातील सांस्कृतिक, भाषिक वा धार्मिक संघर्ष समजणार नाही. बहुजनांतील हिंदू संत, पराक्रमी राजे वा विद्रोही विचारवंत या ब्राह्मणवादी संस्कृतीने नष्टच केलेले आपल्याला दिसून येतात. यामागे त्यांच्या हाती असलेली ज्ञानसत्ता (शिक्षण आणि धर्म) हेच प्रमुख कारण आहे. या पार्श्वभूमीवर मेकॉलेची शिक्षणपद्धती आपल्याला तपासता येईल. भारताच्या अध:पतनाचे कारण मूलत: येथील शिक्षणव्यवस्था आहे, हेदेखील आपल्या लक्षात येईल.

**देशाचे भाग्य बदलण्याचा प्रयत्न**

ब्रिटिशांनी भारताचे आर्थिक शोषण केले, ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. दादाभाई नौरोजी, आर.सी. दत्त, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या पद्धतीने मांडणी केली आहे; परंतु त्याआधीही एतद्देशीय राजा-महाराजांनी, जमीनदारांनी, गावच्या पाटील-देशमुखांनीही गरीब जनतेची अपरिमित लूट केली आहे. शशी थरूर यांनी आपल्या 'डार्क एज' (अंधारयुग) या पुस्तकात कोणी कोणकोणत्या कारणांनी आणि कशी लूट केली, याचे सखोल विश्लेषण केले आहे. कंपनी सरकारांचा भ्रष्टाचार हे त्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. औद्योगिक क्रांतीबरोबरच भांडवलशाहीचा जन्म ब्रिटनमध्येच झाला. या व्यवस्थेत नफा मिळवणे, अधिकाधिक नफा मिळवणे हेच उद्दिष्ट असते. ॲडम स्मिथ हा भांडवलशाहीचा वैचारिक पिता समजला जातो. त्याने कधी शोषणाचे समर्थन केलेले नाही. माणूस हा विवेकशील प्राणी आहे आणि कुठलेही आर्थिक निर्णय तो बुद्धीगम्य स्वार्थाने (Enlighted self) घेत असतो.

त्यामुळे सर्वांचे सर्वकाळी हित साधले जाते. माणूस भावनेने निर्णय घेत असतो. याच काळात डार्विनचा सिद्धांतही पुढे आला होता. सबलांनी दुर्बलांचे शोषण करणे नैसर्गिकच आहे, अशी विचारसरणी पुढे येत होती. भांडवलशाहीतून राजकीय साम्राज्यवाद पुढे आला. त्याला प्रत्युत्तर म्हणून मार्क्सवाद, समाजवाद, उदारमतवाद अशा विचारधारा पुढे आल्या. या सर्व विचारधारांची गंगोत्री ब्रिटन होती; परंतु भारतात ब्रिटिश सत्ता असूनही त्याचे पडसाद मुळीच उमटत नव्हते, याचे मुख्य कारण भारतातील निरक्षर जनता, शिक्षण व आरोग्य सुविधांचा अभाव, सामाजिक व आर्थिक दळणवळण नाही. मुख्य म्हणजे, रोटी-बेटी व्यवहारांबरोबरच व्यवसायबंदीही. या मुठीसारख्या बंदिस्त असलेल्या समाजव्यवस्थेला ब्रिटिशांनीच जगासाठी मुक्त केले. मेकॉलेच्या शिक्षणव्यवस्थेमुळे जगाची दारे भारतीयांसाठी खुली झाली, असे म्हणता येईल. आर्थिक शोषणापेक्षा सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक छळ वा शोषण अधिक दु:खदायक असते. सतीसारख्या अनेक अनैतिक परंपरा ब्रिटिशांनी बंद केल्या. स्त्री-शूद्रांचे जे अमानवी शोषण येथील उच्चवर्णियांनी हजारो वर्षे केले, त्यासंबंधी अवाक्षरही आपल्या अंधारयुगात थरूर यांनी लिहिले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा काँग्रेसला आणि सवर्ण हिंदूंना विरोध होता, तो याच कारणामुळे. दक्षिणेकडे-विशेषत: केरळमध्ये अजातीच्या स्त्रियांना आपले स्तन उघडे ठेवावे लागत किंवा कर भरावा लागत असे. एका स्वाभिमानी स्त्रीने आपले स्तन कापून गावच्या मुखियाला दिले व आंदोलन सुरू केले. नायर स्त्रियांना आपल्या लग्नानंतरची पहिली रात्र नंबुद्री ब्राह्मणांबरोबर घालवावी लागे. याविषयी शशी थरूर काहीही लिहीत नाहीत. ब्रिटिशांना मात्र आपण भारताचे आर्थिक शोषण करत आहोत, याची जाणीव होती. हेस्टिंग्जने अत्याचार केले म्हणून ब्रिटिश पार्लमेंटने त्याच्यावर अभियोग खटला दाखल केला. एडमंड बर्क या महान विचारवंताने ही केस उभी केली. पार्लमेंटमध्ये हेस्टिंग्जच्या बंगाली स्त्रियांवरील अत्याचारांचे वर्णन अशा पद्धतीने केले, की शेरेडीनच्या बायकोला भोवळ येऊन ती बेशुद्ध झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेतही ब्रिटिशांचा मोठा हात आहे. भारतात शिक्षणबंदीचा अलिखित कायदाच होता. १८५४ च्या वूडच्या खलित्यामुळे भारतातील सर्व जाती-धर्मांच्या मुलांना शिक्षणाचा अधिकार मिळाला. शिक्षणाचे स्वातंत्र्य हाच सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याचा प्रारंभ असतो. भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची इच्छा निर्माण झाली ती मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीमुळेच. महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व अचूक ओळखले होते. राजा राममोहन रॉय यांनीदेखील इंग्रजी शिक्षणाचाच आग्रह धरला होता. मेकॉलेने म्हटले होते, भारतीयांची शिक्षणव्यवस्था पोथीनिष्ठ, धर्मनिष्ठ असून, त्यात वैज्ञानिकतेला, आधुनिक विचारसरणीला थोडेही स्थान नाही. निव्वळ भाकडकथा आणि पुराणे... त्याला वास्तवाचा आधार नाही. पुढे तो प्रौढीने म्हणतो, की भारतातील सर्व तथाकथित ज्ञान ब्रिटनमधल्या लायब्ररीतील एखाद्या कपाटातही मावू शकेल. अर्थात, भारतातही तक्षशीला, नालंदासारख्या विद्यापीठांची परंपरा होती व सर्व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानावर बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे, हे तो विसरून गेला असण्याची शक्यता आहे. सांख्य, चार्वाक, कपिल, महावीर, उपनिषदे यांच्यातही मानवी जीवनाविषयी आणि एकूण विश्वाविषयीही काही गंभीर चिंतन होते; परंतु वैदिकांच्या तथाकथित सनातनी धर्मामुळे या परंपरा लुप्त झाल्या. हा तथाकथित वर्णाश्रमधिष्ठित वैदिक धर्म हाच भारताच्या अध:पतनाचे मूळ कारण आहे. माणसाचे शिक्षण व स्वातंत्र्य नाकारणारा तो एकमेव धर्म होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही ते घटनेला विरोध करतात याचे कारणही तेच आहे. ज्ञानामुळे सामाजिक, बौद्धिक, नैतिक क्रांती शक्य आहे. आपण कोणते शिक्षण देतो यावरही ते अवलंबून आहे. मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीमुळे तीन विचारप्रवाह निर्माण झाले. एक मोठा सुशिक्षित वर्ग इंग्रजांचे अनुकरण करू लागला. इंग्रजी खानपान पद्धती, तसा वेश, तशा चालीरीती, इंग्रजी वक्तृत्व, इंग्रजी साहित्य, शिक्षणपद्धती यांचे तो उघड समर्थन करू लागला. हेच लोक प्रशासनात मोठ्या प्रमाणात शिरले व त्यांनी उच्च पदे प्राप्त करून घेतली. अर्थात, सामाजिकदृष्ट्या ते तितकेच असहिष्णू राहिले. दुसऱ्या वर्गाला इंग्रजी शिक्षणामुळे देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्या कळल्या. त्यांनी सामाजिक व आर्थिक सुधारणांचा आग्रह धरला. त्यांचा ब्रिटिश लोकशाही व परंपरांवर विश्वास होता. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, गोखले आदी खरे देशभक्त त्यात होते. तिसरा वर्ग होता तो हिंदुराष्ट्रवाद्यांचा. त्यांचा सर्वच सुधारणांना विरोध होता. आमच्या समाजव्यवस्थेत, धर्मव्यवस्थेत तुम्हाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. हे हिंदूराष्ट्र आहे आणि आम्हीच त्याचे मालक आहोत. चातुर्वर्ण्य व्यवस्था ईश्वरनिर्मित आहे. वेद अपौरुषेय आहेत. आमचा धर्म/संस्कृती सनातन म्हणजेच सर्वश्रेष्ठ आहे, ही त्यांची मानसिकता आजही आहे. स्त्री-शूद्रांना जर शिक्षण तर आम्ही उच्चवर्णियांनी जायचे कोठे, सर्व नोकऱ्या तेच पटकावतील आणि आम्हाला त्यांच्या हाताखाली काम करावे लागेल. धर्म बुडेल. नोकऱ्यांतील, शिक्षणातील आरक्षणाचा प्रश्न तेव्हापासून आहे. कारण त्यावेळी ब्राह्मणांचे आरक्षण शंभर टक्के होते. त्यांच्या व्यक्तिगत व जातिगत स्वार्थाला त्यांनी आधी धर्माचा आणि नंतर राष्ट्राचा रंग देऊन सामान्य लोकांना नेहमीच भ्रमित केले आहे. लोकमान्य टिळक, शि.म. परांजपे, सावरकर या पंथाचे होते. टिळकांनी संमती वयाच्या कायद्यालाही विरोध केला होता. 'मी अस्पृश्यता पाळणार नाही' या पत्रावर सही करण्यास नकार दिला होता. त्यांचेच शिष्य चापेकर बंधूंनी रँडचा खून केला. त्यांनी आपल्या आत्मवृत्तात लिहिले आहे, की 'रँडने आमच्या धर्मात हात घालण्याकडे दुर्लक्ष केले असते, तर आम्ही तसे केले नसते. तो आमचा धर्मशत्रू बनला होता म्हणून त्याचा सूड घेणे आम्हाला भाग पडले.' भारताच्या सुदैवाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या व्यवस्थेचे चारित्र्य माहीत होते आणि ते बदलण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हा देशाचे भाग्य बदलण्याचा प्रयत्न होता. हजारो वर्षे ज्यांना समता, बंधुता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय यांची साधी पुसटशी ओळखही नव्हती, त्यांना ते सर्व काही भरभरून देण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केला. डॉ. बाबासाहेब संविधान सभेत म्हणाले, "It has changed the course of history or in another words it has redeemed the dark age of history and tried to bring nation not only economically sound, but socially, politically liberated with full guarntee of fundamental

rights.'

**प्रत्येकाला मतदानाचा अधिकार हे क्रांतीचे पहिले पाऊल**

प्रत्येकाला मतदानाचा अधिकार हे क्रांतीचे पहिले पाऊल होते. या क्रांतीद्वारे राजकीय सत्ता सामान्य माणसांच्या, स्त्री-शूद्रांच्या हातात गेली. ही रक्तशून्य राज्यक्रांती भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात प्रथमच घडत होती. या मतदानाच्या अधिकाराबरोबरच मूलभूत मानवी अधिकार व्यक्तीला देण्यात आले होते, ज्यासाठी घटना आणि राजकीय व्यवस्था प्रतिबद्ध होती. त्यासाठी व्यक्तीला आपले हक्क आणि कर्तव्यांची प्रखर जाणीव होणे आवश्यक होते. भारतातील शिक्षणव्यवस्था व त्यातील स्त्री-शूद्रांचे स्थान हाच एक कळीचा मुद्दा होता. या विषयाची यथार्थ जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशिवाय कोणालाही नव्हती. भारतात नेहमीच शिक्षणाचा संबंध जातीय वर्चस्वाशी राहिला आहे. त्यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, आधुनिकीकरण, वैज्ञानिकीकरण आणि त्याची धर्म व सांस्कृतिक वर्चस्वातून मुक्तता केल्याशिवाय येथील घटनात्मक लोकशाही टिकणार नाही, याची त्यांना खात्री होती. शिक्षण हा मूलभूत अधिकार असला पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता आणि तो आज मिळालेला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणात मूलगामी बदल होण्याची आवश्यकता होती; परंतु नंतरच्या आलेल्या सरकारांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे घटनात्मक मूल्यांना आणि एकूण घटनेलाच ज्यांचा विरोध होता, ते आज सत्तेवर आले आहेत. ही घटनात्मक मार्गानेच निर्माण केलेली प्रतिक्रांती आहे. सध्याचे जे शैक्षणिक धोरण आहे ते पाहता, येथे नवीन वर्ण-वर्गसंस्कृती निर्माण होईल, यात शंका नाही. त्यामागील उद्देश हा पुन:श्च अनुसूचित जाती-जमाती, बहुजन, भटके, वंचित समाजाला आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या गुलाम करणे हा आहे. मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीला विरोध करणाऱ्या तथाकथित सांस्कृतिक राष्ट्रवाद्यांचा एक गट या नवीन शिक्षणपद्धतीचा निर्माता आहे. शिक्षणाचे खासगीकरण व बाजारीकरण करून, तसेच आहे ती व्यवस्था उद्ध्वस्त करून मागासवर्गीयांना उच्चशिक्षणाचे दरवाजे क्रमाक्रमाने बंद करण्याचे हे धोरण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रयत्नांमुळे एक शैक्षणिक क्रांती महाराष्ट्रात तरी झाली होती. त्यात अनेक त्रुटी होत्या. नवे शैक्षणिक धोरण मात्र घटनात्मक मूल्यांना (स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय) विरोध करणारे आहे. त्याच्या मुळाशी सांस्कृतिक दहशतवाद आहे. शिक्षण हे राजकीय विचारसरणी व धर्मापासून मुक्त असले पाहिजे. डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक धोरणावर बर्ट्रांड रसेल व जॉन ड्यूने यांचा प्रभाव होता. जॉन ड्यूने डॉ. बाबासाहेबांचे गुरूच होते. अमेरिकन शिक्षणपद्धतीवर जॉन ड्यूनेंचा मोठा प्रभाव आहे. त्यांचे विचार Democracy and education, The school and society, The child and curriculam, Experiance and educate आदी ग्रंथांतून व्यक्त झाले आहेत. भारतातल्या मुलांना शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच एका विषम, अन्यायी, पूर्वग्रहदूषित व्यवस्थेशी सामना करावा लागतो. ड्यूने म्हणतात, कुठलीही जातिगत परंपरा, व्यवसाय किंवा विद्यार्थ्याला प्राप्त झालेले सामाजिक वास्तव यातून विद्यार्थ्याला आधी मुक्त केले पाहिजे. तो जसा आहे तसे त्याला स्वीकारले पाहिजे. त्याला नव्याने घडवले पाहिजे. आपल्या शिक्षणव्यवस्थेत मुलांना ते जसे आहेत तसे स्वीकारले जात नाही. त्यांना नकाराचा सामना करावा लागतो. त्यामुळे जिथे स्पर्धा जास्त आहे, अशा उच्च तांत्रिक वा शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीय तरुणांचा कोंडमारा होतो व त्यांना शिक्षण सोडायला किंवा आत्महत्या करायला भाग पाडले जाते. डॉ. पायल तडवी, आयआयटी मुंबईतील सोलंकी किंवा रोहित वेमुला यांसारखी असंख्य प्रकरणे आपल्याकडे घडतात. त्यातली थोडी प्रकरणे उघडकीस येतात किंवा त्यांच्यावर चर्चा होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही ही जातीय, वांशिक किंवा धार्मिकतेची, पूर्वग्रहांची कीड नष्ट न होता वाढतच असेल, तर शिक्षणात मूलगामी बदल करावे लागतील. भारतीय राज्यघटना, तिच्यामागील सामाजिक, आर्थिक तत्त्वज्ञान यांचा शिक्षणक्रमात समावेश करणे अनिवार्य असेल. परंपरा, धर्म, संस्कृती, राष्ट्रवाद यांसारख्या कल्पना शिक्षणातून पूर्णत: वगळाव्या लागतील. आधी समाजसुधारणा की राजकीय सुधारणा या वादाप्रमाणेच आधी बहुजनांचे शिक्षण की उच्चवर्णियांचे, हा मूलगामी प्रश्न सोडवावा लागेल. आपल्या प्राथमिक शिक्षणाची अवस्था अत्यंत वाईट असताना, परकीय विद्यापीठांना प्रवेश देणे आणि उच्चशिक्षणाचे खासगीकरण आणि बाजारीकरण करणे देशाला मध्ययुगीन काळात ढकलण्यासारखे आहे. महात्मा फुले यांनी हंटर कमिशनला त्यासाठीच विरोध केला होता. सामाजिक व आर्थिक समतेशिवाय गुणात्मकतेचा आग्रह धरणे दांभिकपणाचे आहे. हे तथाकथित गुणवत्ताधारक (?) निर्लज्जपणे आर्थिक व सामाजिक विषमतेचे समर्थन करतात. 'Tyranny of Merit' (मायकल सँडल) या ग्रंथात लेखकाने असे दर्शवले आहे, की तथाकथित गुणवत्तेमागे धार्मिक, सामाजिक, वांशिक श्रेष्ठत्वाचा दंभ असतो. मेरिटचा संबंध संधीच्या समानतेशी, सामाजिक पर्यावरणाशी असतो. त्याशिवाय गुणवत्तेचे मापदंड निश्चित करता येणार नाहीत. घटनाकारांनी आर्टिकल १४, १५, १६ आणि २१ मध्ये सामाजिक, आर्थिक विषमता व त्यातून उद्‌भवलेल्या समस्यांचा सखोल विचार केलेला दिसून येतो. तो आपण पुढे पाहणारच आहोत. 'शिक्षणाचा अधिकार' ही डॉ. आंबेडकरांनी देशाला दिलेली देणगी आहे. नंतर आलेल्या सरकारांनी या प्रश्नाचे गांभीर्य फार उशिरा ओळखले. तो कायदा २००८ मध्ये मंजूर झाला. त्यावेळी आम्ही मसुरीत एका ट्रेनिंगला होतो. या कायद्यावर व देशातील सर्व शिक्षा अभियानावर विशेष चर्चा करण्यात आली. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांना बाजूला ठेवून महत्त्वाकांक्षी वाटणारे; परंतु मूलत: प्रतिगामी असलेले नवे शैक्षणिक धोरण (२०२०) राबवता येणार नाही.

खोटा धर्म, खोटी संस्कृती, खोटा इतिहास यांचे उदात्तीकरण शिक्षणात थांबवले पाहिजे. धर्म व धार्मिक शिक्षण आणि विशिष्ट विचारसरणी यापासून शिक्षण पूर्णत: मुक्त असले पाहिजे, असे बर्ट्रांड रसेलने म्हटले आहे. त्यामागे शतकांचा अनुभव आहे. या अनुभवातून स्वत:मध्ये आणि समाजात बदल घडवून आणणे म्हणजेच शिक्षण आहे. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**


# शेतकऱ्यांचे हितकारी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर



डॉ. विजयकुमार वावळे

**भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि समाजव्यवस्थेचा शास्त्रशुद्ध अभ्यास फक्त आणि फक्त याच महापुरूषाने केला होता. या महापुरूषाच्या आर्थिक आणि सामाजिक विचारांची अंमलबजावणी या देशात झाली असती, तर आजचा शेतकरी, शेतमजूर, कामगारांची इतकी दैन्यावस्था झाली नसती आणि शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ आली नसती.**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रज्ञा भास्कराला दिशांचे बंधन नव्हते. तो प्रज्ञासूर्य आंतरविद्याशाखीय विचारांचा प्रणेता होता. तो केवळ दलितांचा कैवारी नव्हे, तर अखिल भारतीयांचा कैवारी होता. या महामानवाने अर्थ, कृषी आणि पाण्याविषयी विचारांसाठी आपले पूर्ण जीवन वेचले. कृषी व्यवसाय हा जगातील अत्यंत पुरातन जुना व्यवसाय असला तरी आधुनिक काळातही तो व्यापक प्रमाणात केला जातो. जगातील दोन तृतीयांश लोकसंख्येचा व्यवसाय शेती आहे. भारतात आजही ६०% इतकी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून १६.११% राष्ट्रीय उत्पन्न शेतीतून निर्माण होते. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज, पशूसंवर्धनासाठी आवश्यक असलेले खाद्य आणि उद्योगासाठी लागणारा कच्चा माल हा शेती व्यवसायातूनच पुरवला जातो. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाला शेतीची प्रगती होणे आवश्यक असते. आज प्रगत झालेले देश विकासाच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी अगोदर शेतीचा विकास करून घेतला आणि या क्षेत्रात प्रगती व स्थैर्य निर्माण केल्यानंतर म्हणजेच कृषीक्रांतीनंतरच औद्योगिक क्रांतीकडे वळले. याचा अर्थ देशाच्या आर्थिक विकासासाठी कृषी क्षेत्राची प्रगती होणे अपरिहार्य असते; परंतु नेमके याच ठिकाणी स्वतंत्र भारतानंतर भारत सरकार, राज्य सरकारांनी कृषी क्षेत्राच्या प्रगतीऐवजी औद्योगिकरणाकडे अधिक लक्ष दिले गेले. शेती हे प्राथमिक क्षेत्र असूनही त्याकडे दुय्यम दर्जाचे स्थान दिले गेले आणि म्हणून आज भारतातील महाराष्ट्र, तेलंगणा, आंधप्रदेश, गुजरात इत्यादी राज्यात शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची व पाण्यावाचून ग्रामीण जनतेला मरण्याची वेळ आली तसेच आपली गावे सोडून स्थलांतरित व्हावे लागत आहे. कारण आतापर्यंतच्या सरकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थ, कृषी आणि पाण्याविषयी विचारांकडे दुर्लक्ष करून घोडचूक केली.





डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा एवढा द्रष्टा महापुरूष या देशात झाला नाही. पण दुर्दैव भारतीयांचे की, हाही महापुरुष फक्त जयंती महोत्सव, महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमापुरताच मर्यादित करून टाकला गेला. भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि समाजव्यवस्थेचा शास्त्रशुद्ध अभ्यास फक्त आणि फक्त याच महापुरूषाने केला होता. या महापुरूषाच्या आर्थिक आणि सामाजिक विचारांची अंमलबजावणी या देशात झाली असती, तर आजचा शेतकरी, शेतमजूर, कामगारांची इतकी दैन्यावस्था झाली नसती आणि शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ आली नसती.

**याला म्हणतात महापुरुषांची दूरदृष्टी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील सामाजिक-आर्थिक असमानता दूर करतानाच शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांवर भर दिला होता. त्यामुळे भारतीयांमध्ये समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राचा अतिशय सूक्ष्म, मूलगामी स्वरूपाचा आणि चिरकाल टिकेल अशा स्वरूपाचा संशोधनात्मक अभ्यास केला होता. भारतातील शेतीक्षेत्राचा विचार करत असताना १९१८ साली लिहिलेल्या 'लहान शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावरील उपाय' या महत्त्वपूर्ण शोधनिबंधात ते म्हणतात, 'अल्पभूधारकांवर आधारित भारतीय शेतीची उत्पादकता व उत्पन्न कमी असण्याचे मुख्य कारण शेतीमधील अल्पभांडवली गुंतवणूक

हे होय’ त्यामुळे जमिनीच्या तुलनेने लोकसंख्येचा भार जास्त असल्यामुळे दरडोई उत्पन्न कमी, त्यामुळे बचत कमी व शेवटी भांडवली गुंतवणूक कमी. या दुष्ट चक्रातून बाहेर पडण्यासाठी शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी औद्योगिकीकरण हा एकमेव उपाय आहे. अशी भूमिका या शोधनिबंधात अवघ्या वयाच्या २७ व्या वर्षी बाबासाहेबांनी मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे कारण त्यांच्या वारसाहक्काच्या कायद्यामुळे सतत होणारे शेतजमिनींच्या लहान तुकडे विभाजनात होय. लहान तुकड्यातील शेतजमिनीत आधुनिक यंत्रे, अवजारे व भांडवल गुंतवण्यास वाव मिळत नाही. तसेच वाढत्या लोकसंख्येला केवळ शेतीवर अवलंबून रहावे लागते. परिणामी शेतकऱ्यांच्या दारिद्र्यात आणखी वाढ होत जाते. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या जादा लोकसंख्येला शेतीव्यतिरिक्त अन्य व्यवसाय केल्याशिवाय शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे दुष्टचक्र संपुष्टात येऊ शकत नाही, असे ठाम मत त्यांचे होते. डॉ. आंबेडकरांनी असे प्रतिपादन केले होते, की जे फायदे औद्योगिक कामगारांना मिळतात उदा. भविष्य निर्वाह निधी, नुकसानभरपाई, आरोग्य विमा, अपघात विमा इत्यादी सर्व फायदे शेतकरी व शेतमजुरांना मिळाले पाहिजेत. तसेच भूमिहीन शेतमजुरांना जोपर्यंत जमीन मिळणार नाही, तोपर्यंत त्यांच्या परिस्थितीत सुधारणा होईल असे वाटत नाही. जी पडीक जमीन आहे, ती भूमिहीनांना सरकारने द्यावी असे त्यांचे मत होते. आज आपण पाहतो शेतजमिनीचे लहान तुकडे शेती करण्यास परवडत नसल्यामुळे देशात हजारो एकर जमीन पडून आहे. १५ मार्च १९४७ रोजी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेड्यूल्ड कास्टच्या संरक्षणाची मागणी करणारे सविस्तर प्रबंधवजा निवेदन घटना परिषदेला सादर केले. ते नंतर संस्थाने व अल्पसंख्यांक (States and Minorities) या नावाने प्रसिद्ध झाले. त्यामध्ये भारताने सामुदायिक शेतीचा स्वीकार करावा, असे डॉ. बाबासाहेबांनी मांडले होते. सामुदायिक शेतीचा आपण फार संकुचित अर्थ घेतो. त्यांच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास, शेतकरी, शेतमजूर, प्रशासक आणि सरकार या चार घटकांनी मिळून शेती करणे म्हणजे सामूहिक शेती, इतका व्यापक अर्थ यामागे दडला आहे. डॉ. आंबेडकरांनी असे प्रतिपादन केले होते, की सरकारने जमीनमालकांना त्यांची नुकसानभरपाई देऊन त्या जमिनी ताब्यात घ्याव्या व सरकारच्या आदेशाने सामुदायिक शेती करावी. या शेतीला राज्य सरकारने भांडवल, पाणी, बी-बियाणे, जनावरे आणि आधुनिक अवजारे यांचा पुरवठा करावा. तसेच सरकारने कायद्याने धान्याची वसुली करावी व जे लोक उत्पादन साधनांचा जास्तीत जास्त उपयोग सामुदायिक शेतीवर करणार नाहीत, त्यांना शिक्षा देण्याची तरतुद करावी, असे मत व्यक्त केले होते. सर्व जमिनीवर सरकारची मालकी प्रस्थापित झाली, की मग जाती-पातीचा विचार न करता निरपेक्ष बुद्धीने ती जमीन ग्रामस्थांना कसण्यासाठी दिली जाईल. असे घडल्यास कोणीही मालक नाही, कोणीही भूमिहीन असणार नाही. त्यामुळे ही पद्धत अन्याय व शोषणविरहीत आहे, असे त्यांचे मत होते. त्यामुळे आजही आपण पाहतो, लहान शेतकरी आपल्या जमिनी गावातील सावकार, मोठे शेतकरी व व्यापाऱ्यांना




विकून कायमचे देशोधडीला लागले आहेत. सामुदायिक शेतीचा पुरस्कार आपण केला असता, तर देशाच्या कृषीक्षेत्राचे चित्र वेगळे असते. निश्चितच आजच्यासारखे आत्महत्याग्रस्त नसते. याचदरम्यान बाबासाहेबांनी सहकारी शेतीला विरोध केला होता व त्यांना हा मार्ग मंजूर नव्हता आणि आज आपण पाहतो महाराष्ट्रात हे क्षेत्र सध्या पूर्णपणे भ्रष्टाचाराने बरबटले आहे. याला म्हणतात महापुरुषांची दूरदृष्टी.


**भांडवल व तांत्रिक साधनांची कमतरता ही प्रमुख समस्या**

जुलै १९३९ मध्ये नाशिकच्या हंसराज प्रागजी ठाकरजी (एच.पी.टी.) महाविद्यालयाच्या चहापान कार्यक्रमात एका प्रश्नाला उत्तर देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, की ‘‘करभरणीच्या माध्यमातून येणाऱ्या पैशाचा उपयोग शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी केला पाहिजे, जेणेकरून ते गरिबीविरुद्ध लढू शकतील आणि शिक्षण घेऊ शकतील.’’ डॉ. आंबेडकरांनी कोकणात प्रचलित असलेल्या कूळ आणि शेतमजुरांच्या खोती (सरकार नियुक्त) पद्धतीतून वर्षानुवर्षे होणाऱ्या शोषणाविरुद्ध आंदोलन केले होते. बाबासाहेबांनी पुकारलेले ते बंड होते. तो विरोध तात्त्विक नव्हता. शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे साधन पूर्णपणे अनिश्चित असल्यामुळे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीला त्यांना तोंड द्यावे लागत असे. हा शेतकऱ्यांवर घोर अन्याय होता. शेतकऱ्यांना काढून टाकण्याचा अधिकार खोतांकडे असल्यामुळे वर्षानुवर्षे शेतात राबूनसुद्धा शेतकऱ्यांना मेहनताना (मजुरी) मिळत नव्हता. त्यापासून

वंचित रहावे लागे. अशा प्रकारच्या शोषणाविरुद्धचा खोतीविरुद्धचा कायदा बनवून लाखो शेतकऱ्यांची खोतांकडून होणारी पिळवणूक त्यांनी थांबवली. १५ मे १९३८ च्या देवरुख येथील जाहीर सभेत बाबासाहेब म्हणतात, 'बहुसंख्यांक असा शेतकरी व कामकरी वर्ग या देशाचा खरा सत्ताधारी वर्ग बनला पाहिजे. बाबासाहेबांच्या मते, शेठजी, भांडवलदार आणि सावकारांच्या पैशांवर निवडून आलेले सरकार आपल्या अन्नदात्याच्या विरोधी कायदे करून शेतकऱ्यांचे हित केव्हाच करू शकणार नाही (जनता ४ जून १९३८). डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १८ फेब्रुवारी १९२७ रोजी मुंबई प्रांतिक विधिमंडळाच्या सरकारमध्ये नियुक्त सदस्य म्हणून नेमणूक झाल्यानंतर त्यांनी विधिमंडळात केलेल्या पहिल्या भाषणात शेतकऱ्यांबद्दल सरकारने दुजाभाव ठेवणे योग्य नसल्याचे सांगितले. अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास ही महसूल व्यवस्था आर्थिक विषमतेला खतपाणी घालणारी आहे, म्हणून ती असमर्थनीय आहे. उदा. शेतसारा शेतीतून मिळणारे उत्पन्न दुष्काळामुळे कमी झाले काय किंवा भरघोस उत्पादन झाल्यामुळे वाढले काय, प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या जमिनीच्या प्रमाणात शेतसारा भरावाच लागतो. त्यातून सर्व शेतकऱ्यांना शेतसाऱ्याचा एकच दर लागू होतो. मग तो अल्पभूधारक असो, की जहागीरदार वा इनामदार असो. याउलट आयकर (Income Tax) हा करदात्याच्या देय्य क्षमतेवर अवलंबून असतो. एखाद्या व्यक्तीला त्या त्या वर्षात काहीही उत्पन्न झाले नाही किंवा विशिष्ट मर्यादेपेक्षा कमी उत्पन्न झाले, तर त्या व्यक्तीला आयकर भरावा लागत नाही. शेतकऱ्यांबद्दल असा दुजाभाव ठेवणे योग्य नाही. याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई प्रांतिक विधिमंडळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरच तीन भाषणे दिली होती. त्या भाषणात ते म्हणतात, 'शेती ही लाभदायक आहे किंवा नाही हे शेतीच्या आकारावरून ठरविले जाऊ शकत नाही, तर शेतीत गुंतविलेले भांडवल, मनुष्यबळ व त्या तुलनेत शेतीतील उत्पन्न यावरून ती फायदेशीर आहे किंवा नाही हे ठरविता येऊ शकते. म्हणून भारतीय अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या बाबतीत कमी शेती असणे ही महत्त्वाची समस्या नसून भांडवल व तांत्रिक साधनांची कमतरता ही प्रमुख समस्या आहे.

**नदीजोड प्रकल्प संकल्पनादेखील बाबासाहेबांचीच**

भारतामध्ये दुष्काळ काही नवीन नाही. भारतातील कोणत्या ना कोणत्या राज्यात नेहमी दुष्काळ असतो आणि दुष्काळ म्हणजे अन्नधान्याची टंचाई, आताच्यासारखी पाणीटंचाई नव्हे. १९५२ मध्ये भारत सरकारने अन्नधान्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी 'जास्त अन्न उगवा' या योजनेअंतर्गत उत्पादकांना अन्नअनुदान द्यायला सुरुवात केली होती; परंतु डॉ. बाबासाहेबांनी १९५२-५३ च्या भारत सरकारच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भारत सरकारचे हे धोरण सपशेल अयशस्वी झाल्याचे म्हटले होते. अन्नअनुदान देणे अर्थमंत्र्यांना अपेक्षित परिणाम देऊ शकलेले नाही. कारण बाबासाहेबांनी असे दाखवून दिले, की एकीकडे सरकार शेतकऱ्यांना जास्त अन्नधान्य उत्पादनासाठी अनुदान देत आहे, तर दुसरीकडे नगदी पिकांनापण प्रोत्साहन देत आहे. परिणामी अन्नधान्याच्या किमतीवर त्यांचा परिणाम होत आहे. त्यासाठी सरकारने काही तरी निर्बंध



लावले पाहीजेत, जेणेकरून अन्नधान्याच्या किंमती वाढणार नाहीत. आजही आपल्या देशात तूरदाळ, तेलांच्या किमती प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. कारण आपल्या देशात कृषीक्षेत्रात दोन प्रतिस्पर्धी आर्थिक क्रिया सुरू आहेत. नगदी पिके विरुद्ध अन्नधान्य उत्पादन. आज स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत अशा प्रकारची प्रतिस्पर्धा सुरू आहे आणि यावर कुठलेही निर्बंध नाहीत, हे आपले दुर्दैवच म्हणावे लागेल. याचबरोबर सध्याच्या स्थितीत अन्नधान्यामध्ये विशेषतः डाळी, तेलबिया व कांद्यासारख्या शेतमालाची व्यापारी कृत्रिमटंचाई निर्माण करून प्रचंड मोठ्या प्रमाणात नफेखोरी करतात. यावरदेखील सरकार निर्बंध लादण्यास अपयशी ठरत आहे. सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्राची ग्रामीण व शहरी जनता पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करत आहे. नव्हे तर, ग्रामीण जनता व प्राणी पाण्यावाचून तडफडत आहेत. आजही ग्रामीण महाराष्ट्रात व काही शहरी भागात विजेवाचून लोकांचे हाल होत आहेत. काही भागात अठरा-अठरा तास वीज गायब असते. महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार या कामी पूर्णपणे अपयशी ठरले आहेत, मग ते सरकार कोणत्याही पक्षांचे असो. कारण हे परिणाम काही अलीकडील काळातील नाहीत, तर मूलतः केंद्र सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नियोजन, जल व विद्युत विकास या कार्याकडे केलेले दुर्लक्ष होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९४२ ते १९४७ या दरम्यान ब्रिटिश व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात मजूरमंत्री होते. तेव्हा त्यांच्या नेतृत्वाखाली भारतातील जल, विद्युत साधनसामुग्रीच्या विकासाला चालना मिळाली होती. त्याकाळात दामोदर खोरे प्रकल्प. तसेच कोमी आणि सोन नदी प्रकल्प तयार झाले आणि शेती, सिंचन आणि वीज या क्षेत्रात आपण अल्पावधीतच भरीव कामगिरी केली. एवढेच नव्हे, तर नदीजोड प्रकल्प संकल्पनादेखील बाबासाहेबांचीच होती; परंतु स्वतंत्र भारतानंतर आम्ही जातीपातीच्या व धर्माच्या राजकारणात एवढे अडकलो, की या महामानवाने सांगितलेल्या मार्गाचा आम्हाला केव्हाच विसर पडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थ, कृषी आणि पाण्याविषयीचा इतका मूलगामी विचार केला होता, की या देशात त्यांच्याइतका मूलगामी विचार कुणीही केला नसेल. तरीसुद्धा या जात आणि धर्मधार्जिण्या देशाला या कोहीनूर हिऱ्याचे महत्त्व पटावे म्हणून केलेला हा लेखनप्रपंच. ●●●

**(लेखक अर्थशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक आहेत.)**


# ‘आंबेडकर : अ लाईफ’ या ग्रंथ परीक्षणाच्या निमित्ताने



बी.व्ही. जोंधळे

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी अलीकडेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जे चरित्र ‘आंबेडकर अ लाईफ’ या नावाने इंग्रजीत ग्रंथरुपाने लिहिले, त्या ग्रंथाची समीक्षा करणारा हा लेख आहे. या लेखात समीक्षक प्रा. अविनाश कोल्हे यांनी जशी वादग्रस्त विधाने केली आहेत तसेच बाबासाहेबांच्या कार्यातील ज्या तथाकथित चार उणिवा शशी थरूर यांनी ग्रंथात नोंदविल्या आहेत, तो साराच भाग टीकेस पात्र ठरावा असाच आहे.**

‘द पीपल्स पोस्ट’ पाक्षिकाचा यंदाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक वैशिष्ट्यपूर्ण ठरला, तो या पाक्षिकाचे संपादक चेतन शिंदे यांच्या कल्पक दृष्टीमुळे. यामुळे संपादक चेतन शिंदे यांचे खास अभिनंदन! यावेळच्या जयंती विशेषांकाचे वैशिष्ट्य म्हणजे, संपादकांनी आंबेडकरी दलित विचारवंत, लेखकांकडून लेख लिहून न घेता दलितेतर लेखकांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी त्यांना काय वाटते, हे जाणून घेण्यासाठी दलितेतर विचारवंतांना लिहिते केले, ही बाब मला विशेष महत्त्वाची वाटते. संपादकांनी जी कल्पक दूरदृष्टी दाखविली ती यशस्वी ठरली असून सर्वच लेख वाचनीय नि माहितीपूर्ण ठरले आहेत,




याविषयी शंकाच नाही. मात्र अपवाद ठरला तो प्रा. अविनाश कोल्हे यांनी लिहिलेला ‘काँग्रेस नेत्याने लिहिलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र’ या मथळ्याचा लेख. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी अलीकडेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जे चरित्र ‘आंबेडकर अ लाईफ’ या नावाने इंग्रजीत ग्रंथरुपाने लिहिले, त्या ग्रंथाची समीक्षा करणारा हा लेख आहे. या लेखात समीक्षक प्रा. अविनाश कोल्हे यांनी जशी वादग्रस्त विधाने केली आहेत तसेच बाबासाहेबांच्या कार्यातील ज्या तथाकथित चार उणिवा शशी थरूर यांनी ग्रंथात नोंदविल्या आहेत, तो साराच भाग टीकेस पात्र ठरावा असाच आहे.

**बाबासाहेबांना ‘भारतरत्न’ मिळायला १९९१ साल उजाडावे लागले**

प्रा. अविनाश कोल्हे यांचे समीक्षण वाचत असताना असे वाटते, की समीक्षकाला शशी थरूर यांनी बाबासाहेबांवर ग्रंथ लिहून जसे काही फारच मोठे महनीय कार्य केले आहे, असे वाटते. ते लिहितात, ‘‘काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी अलीकडेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ‘आंबेडकर : अ लाईफ’ हे इंग्रजीत चरित्र लिहिले आहे. या वाक्यातील ‘काँग्रेसचे ज्येष्ठ नेते’ हा उल्लेख महत्त्वाचा आहे. याचे कारण बाबासाहेबांनी हयातभर काँग्रेसच्या विरोधात राजकीय भूमिका घेतल्या होत्या.’’ प्रा. अविनाश कोल्हे यांच्या या विधानाचा अर्थ काय होतो? तर तो असाच ना, की बाबासाहेबांनी हयातभर काँग्रेसला विरोध करूनही शशी थरूर बाबासाहेबांवर लिहितात, म्हणजे ही केवढी मोठी गोष्ट आहे? बाबासाहेबांनी बुद्धिवादाच्या नि समतेच्या मूल्यावर आधारित काँग्रेसला विरोध केला. पण काँग्रेसने मात्र पदोपदी बाबासाहेबांचा अपमान करून त्यांची उपेक्षाच केली असेच इतिहासाची साक्ष सांगते, त्याचे काय? याचसंदर्भात त्यांनी लेखाच्या प्रारंभीच ‘‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाला त्यांच्या हयातीत जेवढा मानसन्मान मिळाला नाही, त्यापेक्षा किती तरी जास्त मानसन्मान त्यांना मरणोत्तर खास करून एकविसाव्या शतकात मिळत आहेत. १९९० साली (९० का ९१?) त्यांना भारत सरकारने ‘भारतरत्न’ हा बहुमान प्रदान केला.’’ असे जे म्हटले आहे त्याचाही विचार व्हावा. शशी थरूरांची भलामण करायला निघालेल्या प्रा. अविनाश कोल्हेंना हे विचारले पाहिजे, की ज्या ज्येष्ठ काँग्रेसी नेत्याने बाबासाहेबांवर ग्रंथ लिहिला त्यांच्या काँग्रेसी सरकारने बाबासाहेबांना ‘भारतरत्न’ हा बहुमान दिला काय? नाही. बाबासाहेबांना ‘भारतरत्न’ मिळायला १९९१ साल उजाडावे लागले ते व्ही.पी. सिंग पंतप्रधान असताना. म्हणजे बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर ३५ वर्षे काँग्रेसला बाबासाहेबांचा ‘भारतरत्न’ देऊन गौरव करावा असे वाटले

नाही. त्यांनी तो दिलाही नाही. पण ज्येष्ठ काँग्रेस नेते शशी थरूर इंग्रजीत बाबासाहेबांचे चरित्र लिहितात या गोष्टीचे कोण अप्रूप आहे प्रा. अविनाश कोल्हे सरांना?

**मतांच्या बेगमीसाठी सोयीनुसार बाबासाहेबांच्या नावाचा जप**

याचसंदर्भाने कोल्हे सरांनी अजून एक चमत्कारिक विधान केले आहे. ते म्हणतात, ''आजच्या भारतात बाबासाहेबांना सर्वपक्षीय मान्यता मिळाली आहे. भाजपसारखा हिंदुत्व प्रमाण मानणारा पक्ष तर सतत बाबासाहेबांचा उदोउदो करीत असतो. थरूर नमूद करतात त्याप्रमाणे २०२२ साली पंजाबात सत्तेत आलेल्या आम आदमी पक्षाने सरकारी कार्यालयात शहीद भगतसिंग आणि बाबासाहेबांचे फोटो लावण्याचा हुकूम काढला'' (पृष्ठ. १८०). प्रा. कोल्हेंच्या आणि थरूरांच्या या उथळपणास काय म्हणावे? काँग्रेससहित सर्वच पक्ष पक्षीय राजकारणासाठी बाबासाहेबांचे उठता-बसता नाव घेतात, मनातून नाही हे माझ्यासारख्या छोट्या माणसाने महनीय माणसांना सांगावे काय? भाजप बाबासाहेबांचे नाव जरूर घेतो; पण आज बाबासाहेबांच्या संकल्पनेतील लोकशाही धर्मनिरपेक्ष राजकारण-समाजकारण भाजप करतो काय? बाबासाहेबांच्या संविधानाला अनुसरून देशाची आजची वाटचाल सुरू आहे काय? आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आम पक्षाचे तर काय सांगावे? अरविंद केजरीवाल यांच्या मंत्रिमंडळातील माजी समाजकल्याणमंत्री राजेंद्र गौतम पाल यांचा राजीनामा केजरीवालांनी बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा उच्चारल्यामुळे जिथे घेतला, तो अरविंद केजरीवालांचा आप पक्ष खरोखरच बाबासाहेबांना मान्यता देतो? आणि पंजाबात सरकारी कार्यालयात भगतसिंग आणि बाबासाहेबांचे फोटो लावण्याचे आदेश देणाऱ्या आप पक्षाचे सर्वेसर्वा केजरीवाल गुजरात विधानसभा निवडणुकीत हिंदू मतदारांना भुलविण्यासाठी चलनी नोटांवर लक्ष्मी वा हिंदू देवदेवतांचे फोटो छापावेत असे म्हणतात, त्याचे काय? तात्पर्य, मतांच्या बेगमीसाठी सर्वच राजकीय पक्ष सोयीनुसार बाबासाहेबांच्या नावाचा जप करतात. याचा अर्थ, बाबासाहेबांना सर्वपक्षीय मान्यता मिळाली असा होतो काय?

**लोकनिष्ठा म्हणजे सर्व अन्यायाच्या विरोधात उभी राहणारी कर्तव्यनिष्ठा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, त्यांनी केलेले लेखन, त्यांनी लढविलेले सामाजिक न्यायाचे लढे आज जगभरच्या 'नाही रे' वर्गाला लढण्याची प्रेरणा देत आहेत' असे नमूद करून प्रा. अविनाश कोल्हे असेही म्हणतात, की ''नाहीरे' वर्गाच्या संदर्भात आज जगात असा एकही देश नाही, की ज्याला आदर्श देश म्हणता येईल. अनेक लोकांना अमेरिका हा आदर्श देश वाटतो. पण तेथील कृष्णवर्णीय समाजाची स्थिती बघितली तर आपल्याला वेगळीच अमेरिका दिसते. २५ मे २०२० रोजी जॉर्ज फ्लॉईड या ४४ वर्षीय कृष्णवर्णीय माणसाला मिनियापोलिस येथील डेरेक चौव्हिन या पोलिस अधिकाऱ्याने मानेवर गुडघा ठेऊन दिवसाढवळ्या मारून टाकले. फ्लॉईडवर खोट्या नोटा खपवण्याचा प्रयत्न केल्याचा संशय होता. आजही फ्लॉईडसारख्या घटना घडत असतात.'' (खरे आहे. म्हणूनच आपणाकडे हाथरस-खैरलांजी घडले तर तितके मनाला लावून घेऊ नये.) जगात कुठलाच देश 'नाही रे' वर्गाबाबत आदर्श नाही, हे प्रा. अविनाश कोल्हेंचे



म्हणणे बरोबरच आहे. पण यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर काय म्हणतात, तेही समजून घ्यावे लागेल. लोकशाहीसाठी लोकनिष्ठेची गरज आहे हे निक्षून सांगताना बाबासाहेब म्हणतात, 'लोकनिष्ठा म्हणजे सर्व अन्यायाच्या विरोधात उभी राहणारी कर्तव्यनिष्ठा.' ते म्हणतात, ''दक्षिण आफ्रिकेत जेव्हा भारतीय जनतेवर अन्याय होत होते, तेव्हा रेव्हरंड स्कॉट या गोऱ्या माणसाने भारतीयांवरील अन्याय दूर करण्याची पराकाष्ठा केली. तसेच गोऱ्या वंशाची मुले भारतीयांच्या बाजूने लढली. गोऱ्यांची ही लोकनिष्ठा आहे. पण भारतातील प्रत्येक खेड्यात दक्षिण आफ्रिका असूनही भारतात मात्र सवर्ण जातीतील माणूस वर्गीकृत समाजाची बाजू घेऊन क्वचितच भांडताना दिसतो. कारण आपणाकडे लोकनिष्ठेचा अभाव आहे.'' बाबासाहेब म्हणत होते ते खरे आहे. आजही स्थिती तशीच आहे, हे जगाला आणि अमेरिकेला दूषणे देणाऱ्यांनी नजरेआड न केलेले बरे. जगाची चिंता वाहण्यापेक्षा आपण आपले आधी पाहिलेले बरे, नाही का?

**बाबासाहेबांच्या कार्यातील चार उणिवांची चर्चा!**

आता बाबासाहेबांच्या कार्यातील ज्या चार उणिवांची (?) चर्चा शशी थरूर यांनी त्यांच्या इंग्रजी ग्रंथात केली त्या मुद्याकडे येऊ. थरूर यांच्या मते, 'बाबासाहेबांनी आदिवासी समाजाकडे सहानुभूतीने पाहिले नाही?' थरूरांचा हा आक्षेप शंभर टक्के खोटा आहे. आदिवासी समाजासंदर्भात बाबासाहेब त्यांच्या 'ॲनहिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथात म्हणतात, ''हजारो वर्षे संस्कृतीची शेखी मिरविणाऱ्यांच्या भूमीत हे लोक आणखीही आपल्या आदिम असंस्कृत अवस्थेत आहेत. आदिवासी जे व्यवसाय करतात, त्यामुळे त्यांचे वर्गीकरण गुन्हेगारी वर्गात झाले आहे. संस्कृतीच्या मधोमध तेरा दशलक्ष लोक अजूनही रानटी अवस्थेत आहेत; परंतु हिंदूंना त्यांची कधीही लाज वाटली नाही. आदिवासींना सुसंस्कृत करून त्यांना अधिक सन्मानजनक व्यवसाय निवडण्याचा मार्ग दाखविण्याचे प्रयत्न हिंदूंनी का केले नाहीत?'' बाबासाहेबांचे हे आदिवासी समाजविषयक चिंतन म्हणजे बाबासाहेबांनी आदिवासींकडे सहानुभूतीने पाहिले नाही, असे म्हणता येण्याजोगे आहे काय?

बाबासाहेबांनी खरे तर, दलित-अस्पृश्य, कामगार, शेतकरी, महिला अशासारख्या समाजातील सर्वच दडपलेल्या-पिळलेल्या वर्गासाठी काम केले. उलट बाबासाहेबांच्या समाज परिवर्तनाच्या कार्यात काँग्रेसने व हिंदू महासभेने खोडा घालून दलित जातींचे संघटन हाणून पाडले. त्या काँग्रेसी थरूरांनी बाबासाहेबांनी आदिवासींकडे सहानुभूतीने पाहिले नाही असे म्हणावे, याचे सखेदाश्चर्य वाटते. बाबासाहेबांचे हे वस्तुनिष्ठ तटस्थ मूल्यमापन आहे, की थरूरांचा हा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन आहे?

शशी थरूर यांचा दुसरा आक्षेप असा, की ''बाबासाहेबांनी हिंदू धर्म आणि हिंदू समाज एकच आहे असे गृहीत धरून हिंदू धर्मावर कडवट टीका केली. यामुळे जातीव्यवस्था न मानणारे, पुरोगामी विचारांच्या असंख्य हिंदू व्यक्ती बाबासाहेबांच्या विचारविश्वात येऊ शकल्या नाहीत (पृ. १७३).'' शशी थरूर यांनी हा जो दिव्य शोध लावला, तो पाहून हसू आल्यावाचून राहत नाही. बाबासाहेबांचे चरित्र लिहिणाऱ्या शशी थरूरांना हे माहीत नाही काय, की बाबासाहेबांचे चळवळीतील अनेक सहकारी जाती-धर्माने हिंदू होते? महाडच्या सत्याग्रहावेळी जेधे-जवळकरांनी सत्याग्रहातून ब्राह्मणांना वगळा तरच आम्ही सत्याग्रहात सहभागी होऊ अशी भूमिका घेतल्यावर, बाबासाहेबांनी ब्राह्मण आणि ब्राह्मण्यात फरक करून आपला एखाद्या समाजाला विरोध नाही तर ब्राह्मणी प्रवृत्तीला विरोध आहे असे स्पष्टपणे खणखणीत शब्दांत सांगितले होते? आणि शशी थरूर कोणत्या हिंदू समाजाची गोष्ट करीत आहेत? बाबासाहेबांच्या नावाला नामांतरप्रकरणी विरोध करून दलितांवर अत्याचार करणाऱ्या सवर्ण हिंदूंविषयी? दलित महिला-मुलींवर अत्याचार होत असताना, खैरलांजी-हाथरस घडताना जो हिंदू समाज हे सारे अत्याचार मूकपणे पाहतो त्या हिंदू समाजाविषयी? मागासवर्गीयांच्या आरक्षणावर आक्षेप घेऊन 'सेव्ह मेरिट-सेव्ह इंडिया' घोषणा देणाऱ्यांविषयी? दलितांना सुरक्षाकवच म्हणून लाभलेल्या ॲट्रॉसिटीचा कायदा बदला म्हणणाऱ्यांविषयी? आता एक खरे, की हिंदू समाजातही दलितांची दुःखे, दलितांच्या वेदना समजून घेणाऱ्या सुधारणावादी-पुरोगामी हिंदू व्यक्ती जरूर आहेत. त्यांच्याप्रती माझ्या मनात आदराचीच भावना आहे. पण सन्माननीय अपवाद म्हणजे सारा हिंदू समाज दलितांशी बंधुभावाने वागतो, असे शशी थरूर तरी आपल्या मनोदेवतेला जागून प्रामाणिकपणे म्हणू शकतील काय? ज्या बाबासाहेबांनी जातीअंताची चळवळ उभारली, त्याच बाबासाहेबांवर हिंदू धर्म व हिंदू समाज एकच आहेत असे गृहीत धरून त्यांनी हिंदू समाजावर कडवट टीका केली असा जो आरोप शशी थरूर करतात, त्यांना साधा प्रश्न असा आहे, की हिंदू समाजाने जात सोडली काय? जातीव्यवस्था पाळणाऱ्या हिंदू समाजाचे वकीलपत्र घेऊन बाबासाहेबांना म्हणूनच हिंदू समाजविरोधी ठरविणे निखालसपणे अन्यायकारक आहे, असे म्हटले तर चूक ठरू नये.

शशी थरूरांचा बाबासाहेबांवरील अजून एक गंभीर आक्षेप असा, की ''गांधीजींच्या विचारांचा सामना करताना बाबासाहेब गांधीजींशी व्यक्तीगत वैर असल्यासारखे वागले.'' शशी थरूरांचे बाबासाहेबांविषयीचे हे मूल्यमापनही वास्तवतेच्या कसोटीवर टिकणारे नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात म. गांधींबद्दल प्रेमच होते. त्यांची फक्त तक्रार एवढीच होती, की गांधीजी हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि खादीचा प्रचार जितका तळमळीने करतात, तितका अस्पृश्यता निर्मूलनासाठी करीत नाहीत.

'जनता'च्या २३ फेब्रुवारी १९३१ च्या अंकात जे लेखन प्रसिद्ध झाले आहे त्यात म्हटलेय, ''गांधीजींच्या अस्पृश्यता निवारणाच्या प्रयत्नात संतांचे ममत्त्व व समतेचे महत्त्व असले, तरी रोगाचे आमुलाग्र परिवर्तन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वैद्यकीय ज्ञानाचा अगर या रोगाचे बरोबर निदान करणाऱ्या बुद्धीचा त्यात अभाव असल्यामुळे गांधीजींच्या प्रयत्नांनी मर्मावर घाव बसेल, अशी आशा आंबेडकरांनी कधीच केली नव्हती. असे असले, तरी गांधीजींच्या अस्पृश्योद्धारक प्रयत्नांबद्दल बाबासाहेबांना व अस्पृश्य पुढाऱ्यांना एक प्रकारचा विश्वास वाटत होता. गांधीजींसारख्या थोर पुढाऱ्याने आपल्या राजकीय चळवळीच्या कार्यक्रमात अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाला पहिले व महत्त्वाचे स्थान दिलेले पाहून त्यांना साहजिकपणे समाधान व एक प्रकारचा आपलेपणा वाटत होता.''

म. गांधींची हत्या करण्याचे प्रयत्न हिंदुत्ववाद्यांनी जेव्हा जेव्हा केले, तेव्हा तेव्हा बाबासाहेब अस्वस्थ झालेले दिसतात. कारण गांधीजी संपले तर अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपण कुणाची मदत घेणार, असा रास्त प्रश्न बाबासाहेबांना बेचैन करीत होता.

म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात जो पुणे-करार झाला, या करारानंतर खूप वर्षांनी लुई फिशर या गांधीजींच्या चरित्रकाराला घेऊन बाबासाहेब मुंबईतील दलित वस्तीत फिरले (आजचे रमाबाई आंबेडकर नगर). या वस्तीत फिरताना त्या वस्तीतील माणसांचे जीणे पाहून फिशर अस्वस्थ झाला. त्याने बाबासाहेबांना विचारले, ''अशा स्थितीत तुम्ही पुणे करार का केला?'' या प्रश्नाचे उत्तर देताना बाबासाहेब म्हणाले, ''गांधीजींशी माझे तीव्र मतभेद आहेत. मात्र या सबंध जगात मला समजून घेणारा गांधी हाच एक माणूस आहे.''

पुणे करारानंतर मुंबईत झालेल्या सभेत बोलताना बाबासाहेब म्हणाले होते, ''माझ्यातले आणि गांधीजींमधले साम्य मला आश्चर्यचकीत करून गेले. आरंभी आमच्यात मतभेद होते; परंतु जेव्हा जेव्हा मी महत्त्वाचे मतभेदाचे मुद्दे त्यांच्यासमोर मांडले, तेव्हा तेव्हा गांधीजी माझ्याच बाजूने बोलताना व उभे राहताना दिसले. मला एका व्यूहातून बाहेर काढण्यास मदत करणाऱ्या गांधीजींचा मी कृतज्ञ आहे. ही भूमिका गांधींनी गोलमेज परिषदेतच का घेतली नाही, याचेच मला आश्चर्य आहे.''

बाबासाहेबांची म. गांधींविषयीची ही भूमिका म्हणजे बाबासाहेब गांधींशी शत्रूसारखे वागले असे म्हणता येईल काय?

अजून एक. बाबासाहेब व म. गांधी यांच्या संबंधांविषयी रावसाहेब कसबे लिखित 'गांधी-पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा' हा ग्रंथ जिज्ञासूंनी मुळातून वाचला, तर गांधी-आंबेडकर संबंधांविषयी त्यांना सकारात्मक माहिती मिळून शशी थरूरांचे बाबासाहेबांविषयीचे आकलन कसे एकांगी व थिटे आहे, हे कळू शकेल. ●●●

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार आहेत.)**

# बुद्धाच्या संदेशात जागतिक प्रश्नांची उत्तरे



निरंजन पाटील

**तथागत गौतम बुद्धांनी अहिंसा शिकवली, शांती शिकवली, न्याय, मैत्री, स्वातंत्र्य, समता, बंधुता शिकवली. तथागताला एक सामाजिक संदेश द्यायचा होता. डॉ. बाबासाहेबांचे हे मत अगदी रास्त आहे. आधुनिक लेखक, विचारवंत, जागतिक राजकारणी (पहिल्या फळीचे) यांनी बुद्धाच्या अहिंसा आणि शांती याला अधिक महत्त्व दिले आहे. बुद्धाने आपल्या जीवनात जो सामाजिक संदेश सांगितला, तो मूलतः व तत्त्वतः सामाजिक आहे. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे.**

जगाची पुनर्रचना करण्याचे ध्येय निरंतर लोकांपुढे ठेऊन दुःखमुक्तीचा मार्ग दर्शविणारे, जगातील समाजवादी, लोकशाही गणराज्याचे, मौखिक संविधानाचे आद्यप्रवर्तक, साऱ्या जगाची संस्कृती समृद्ध व उन्नत करू पाहणाऱ्या बौद्ध धर्माचे संस्थापक तथागत गौतम बुद्ध यांचा जन्म वैशाख पौणिमेला इ.स. पूर्व ५६३, दिवस शुक्रवार, दिनांक १३ मे ५६३ रोजी प्राचीन कपिलवस्तू जवळच्या आणि वर्तमान नेपाळमधील लुंबिनी वनात महामायेच्या उदरातून शाल वृक्षाच्या खाली झाला. तर इ.स. पूर्व ५२८ मध्ये वयाच्या ३५ व्या वर्षी बुधवार, दिनांक १३ मे ५२८ वैशाख पौणिमेला उरुवेला गया येथे (वर्तमान बिहार राज्यात) पिंपळ वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती (या वृक्षाला पुढे बोधिवृक्ष म्हणून मान्यता मिळाली) म्हणजे मानवाच्या दुःखमुक्तीचा मार्ग गवसला. जगात दुःख आहे, दुःखाचे कारण तृष्णा आहे, दुःख दूर करता येते, त्यासाठी तृष्णेचा त्याग केला पाहिजे, ही चार आर्यसत्ये (पाली भाषेत आर्यचा अर्थ श्रेष्ठ असा होतो. वंशाचा त्यांच्याशी संबंध नाही) गवसली आणि तृष्णा नाहीशी करण्याचा मार्ग शोधून काढलेला सिद्धार्थ गौतम सम्यक् सम्बुध्द झाला. वयाच्या ३५ व्या वर्षापासून (सम्यक् सम्बुध्द झाल्यानंतर) ८० व्या वर्षापर्यंत म्हणजे अखंडपणे ४५ वर्षे धम्मप्रसार करून इ.स. पूर्व ५८३ मध्ये मंगळवार, दिनांक १३ मे ४८३ रोजी मल्लराज्याच्या कुशीनगर येथे दोन शाल वृक्षामधोमध वैशाख पौणिमेच्या उत्तररात्री तथागत गौतम बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले. अखिल मानवासाठी दुःखमुक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या धम्माची ठेव दीपस्तंभासारखी मागे ठेऊन गेले. बुद्धाच्या विचारांचे चैतन्य देणारी ही वैशाख पौणिमा म्हणून संपूर्ण जगात साजरी केली जाते. संयुक्त राष्ट्रसंघाने म्हणजे (UNO) युनोने वैशाख बुद्ध पौणिमा साजरी करण्याबाबत मान्यता दिली आहे. ही पौणिमा आपल्याला दुःखमुक्तीचा मार्ग दाखविते. साऱ्या जगाला सम्यक् शांतीचा संदेश देते. (आधार : धम्मयान मासिक, संपादकीय मे २०२१).

बुद्धजयंतीची सुट्टी मिळावी म्हणून १९४२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात (१९४२-१९४६) मजूर मंत्री असताना त्यांनी प्रयत्न केले. त्यावेळचे गृहमंत्री कॉक्सवेल यांना सुट्टी देण्याची इच्छा होती. पण दुसऱ्या महायुद्धामुळे यश आले नाही. पण



१९५३ साली नेहरु सरकारने बुद्धजयंतीची सुट्टी दिली (२७ मे १९५३, नरेपार्क, मुंबई येथे केलेले भाषण). सर्व ब्राम्हणेतर हिंदूनी बुद्धजयंती का साजरी करावी, याबाबत डॉ. बाबासाहेब आपल्या १७ मे १९४१ रोजी जनता वृत्तपत्रातील लेखात कारणे सांगताना म्हणतात, आमचे मुख्य कारण यापेक्षा भिन्न असून सबळ आहे, असे आम्हास वाटते. हिंदूतील सुशिक्षित लोकांना राजकारणात हिंदू संस्कृतीच्या पायावर व हिंदूकरता लोकशाही प्रस्थापित करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे व त्याप्रीत्यर्थ त्यांचे सारे प्रयत्न चालू आहेत. असल्या हिंदू लोकांच्या बुद्धीची आम्हाला कीवच येते. या वंशात लोकशाही प्रस्थापित करू म्हणणारे लोक एकतर मूर्ख तर असले पाहिजेत किंवा लबाड तरी असले पाहिजेत; परंतु ही लबाडी व हा मुर्खपणा फार दिवस चालणार नाही. अनुभवाची गाठ पडल्यानंतर असे दिसून येईल, की ब्राह्मणी धर्म आणि लोकशाही या परस्परविरोधी, एकमेकांस विरोधी गोष्टी आहेत. लोकशाही हवी असेल, तर चातुर्वर्ण्य नाहीसे झाले पाहिजे. हे चातुर्वर्ण्याचे जंतू काढून टाकण्यासाठी बुद्धाच्या तत्त्वज्ञानासारखे मारक रसायन नाही, असे आम्हास वाटते. म्हणून आम्ही म्हणतो, की राजकारणाची रक्तशुद्धी करण्यासाठी बुद्धजयंती सर्व हिंदूंनी साजरी करणे हितावह व आवश्यक आहे. (डॉ. आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड - २०, पत्रकारिता १९२९ ते १९५६, पान क्र. ३३४-३३५).

लोकशाहीच्या दोन्ही शत्रूंपासून लोकशाहीच्या स्वरुपाला मोठे

धोके असल्याचे बाबासाहेब सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दि. ०३ एप्रिल १९५५, सिद्धार्थ कॉलेज (बुद्धभवन) मध्ये भरलेल्या सभेत बोलताना म्हणतात, की लोकशाहीचे प्रामुख्याने दोन शत्रू आहेत. एक म्हणजे हुकूमशाही आणि दुसरे माणसा-माणसात भेद मानणारी निती किंवा संस्कृती. अमेरिकन स्वातंत्र्यासंबंधी उद्‌गार बकल प्रतिपादितो, की हुकूमशाहीमुळे निर्माण झालेली शक्ती किंवा सामाजिक संघटना टिकू शकत नाही. कारण हुकूमशाहीप्रेरणा ही मुळातच अबाधित स्वरुपाची नाही, ती प्रेरणा काढून घेतली की ती संघटना गडगडते आणि म्हणूनच कम्युनिझमची राजवटही अबाधित नाही. त्याचप्रमाणे माणसा-माणसांत भेद करणारी निती-सामाजिक, आर्थिक भेद बुद्धीपुरस्सर करणारी संस्कृती या दोन्हीही लोकशाही स्वरूपाला मोठे धोके आहेत. या लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने समाजाच्या धारणेसाठी बुद्ध धर्माची गरज प्रतिपादितांना बाबासाहेब पुढे भाषणात बोलतात, की सद्यःस्थितीत माणसाला धर्माची काय जरूर आहे? अशा धर्माची टीका काही लोक करतात. पण मला वाटते, हे लोक मानवी समाजाच्या धारणेसाठी धर्माची किती आवश्यकता आहे, ही गोष्ट विसरतात. मानवी समाजाला दोन देणग्या दिल्या आहेत आणि त्या म्हणजे मानवी जीवनात ऐक्य अबाधित करणारी मानसिक प्रेरणा निर्माण करणे. धम्मानुवेध मानवी ऐक्याला पोषक असे एका विशिष्ट तऱ्हेचे मानसिक वातावरण निर्माण होऊ शकते व दुसरे म्हणजे मानवी समूहात धम्मच समता निर्माण करू शकतो. या दोन महत्त्वाच्या कसोट्यांमुळे सद्यःस्थितीत समता निर्माण करून चांगल्या तऱ्हेने लोकशाही नांदवायची असेल, तर धम्माची अत्यंत आवश्यकता आहे. (जनता, दिनांक ९ एप्रिल १९५५), (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ वा भाग - ३).

भारतात जर आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात समता नाकारली, तर ते राजकीय लोकशाहीला घातक ठरेल, असे घटनाकारांना वाटत होते. समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचे साधन अजूनही राजकीय पक्षांचा वापर करता येईल, या वस्तुस्थितीची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना केलेली दिसते. लोकशाही भक्कम अशा खोट्या आशावादांत सर्वसामान्यांनी न राहता निवडणूक सोडून इतरही लोकशाहीसाठी वापर होणे आवश्यक आहे. तेव्हा घटनाकारांचा विश्वास सार्थ होईल असे वागणे इथल्या नागरिकांचे कर्तव्य आहे.

आज मात्र भारतात विद्यमान असलेली लोकशाही जरी डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही नसली, तरी सनदशीर मार्ग जोवर उपलब्ध आहेत तोवर रक्तरंजित क्रांतीचा विचार धुडकावून लावला पाहिजे. म्हणूनच बुद्धाच्या मार्गाची आज आवश्यकता आहे. कारण चातुर्वर्ण्याधिष्ठित विषमता आणि शोषणाधिष्ठित राज्य आणू पाहणारे प्रत्यक्ष व्यवस्था चालवणारे पडद्यामागून देशातील जनतेचे जीवन धर्माधारित व्यवस्थेमध्ये बंदिस्त करण्याची धोरणे राबवित आहेत. त्यासाठी लोकशाहीच्या संरक्षण व संवर्धनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शासन संस्थेमध्ये धम्माचा साधन म्हणून वापर व्हावा असे वाटत असावे.

सामान्य माणसाहूनही क्षुद्र विचार करणाऱ्या राम व कृष्णास देव कोण म्हणेल? बुद्धजयंतीच्या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी टाकलेला निर्णायक सवाल! २ मे १९५० हा दिवस भारतीय इतिहासात आणि विशेषतः अस्पृश्य जनतेच्या मनात सुवर्णाक्षराने कोरला जाईल. या दिवशी भगवान बुद्धाची २४९४ वी जयंती दिल्ली येथे डॉ. बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य समाजाने साजरी केली. या प्रसंगी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले, खऱ्या धर्माशिवाय कोणाची प्रगती होणार नाही. तेव्हा कोणता धर्म सोयीस्कर हे तुम्ही ठरविले पाहिजे. बौद्धवाद व ब्राह्मणवाद यांमधील फरक व भेद नीट लक्षात ठेवल्यास मी तुम्हाला सांगत आहे. यापैकी एकाची तुम्हास निवड करायची आहे. बुद्धाने सामान्य जनतेत वास्तव्य केले आणि मानवी दृष्टिकोनातून जनतेची दुःखे दूर करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आजपासून कोणता धर्म तुम्हास उपकारक आहे हे तुम्हास ठरवायचे आहे आणि ते स्वातंत्र्य तुम्हास निर्विवादपणे आहे, असे सांगितले. (बुद्ध जयंतीचे महात्म्य, जनता, दिनांक १३ मे १९५०).

या वेळी बौद्ध धम्माबदल गैरवास्तव उद्‌गार काढताना डॉ. बाबासाहेब म्हणाले, की जवळ जवळ २५०० वर्षांनी बुद्धजयंती येथे साजरी होते, ही गोष्ट असामान्य नव्हे, असे कोण म्हणेल? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपले म्हणता येईल अशा तत्त्वज्ञानाची आपल्याला आवश्यकता आहे. हिंदू संस्कृतीत आपण पुष्कळ शोधून पाहिले. पण त्यात विशेष काहीच सापडत नाही. फक्त बौद्ध धर्मामधूनच खऱ्या ज्ञानाचे किरण दिसतात आणि बौद्ध धर्मामुळेच भारत देश महान असल्याचे आपण जगाला सांगू शकतो (डॉ. आंबेडकरांचे बौद्ध धर्मावरील भाषण, संकलन संपादन-निरंजन पाटील, प्रथम आवृत्ती २००४)

२ मे १९५० वैशाख पौणिमेच्या दिवशी सकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह माईंनी दिल्लीतील बिर्ला मंदिर परिसरातील बुद्ध विहारात भंते आर्यवंश यांच्या हस्ते बौद्ध धम्माचे त्रिशरण व पंचशील ग्रहण केले. दिल्लीतील बुद्धजयंतीच्या कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईंना निमंत्रित करण्यात आले. ब्रम्हदेशाचे राजपूत सर मॉन्स साई अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी केलेल्या भाषणात डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला असल्याची सर्वप्रथम घोषणा केली. ब्रम्हदेशात २५ मे १९५० पासून भरणाऱ्या जागतिक बौद्ध परिषदेत भाग घेता यावा म्हणून वैयक्तिक दीक्षा विधी करून घेण्यात आला. (डॉ. आंबेडकरांच्या सहवासात डॉ. सविता भीमराव आंबेडकर, पान क्र. ३८६-३८७) ६ मे १९५५ रोजी वैशाख पौर्णिमेच्या बुद्धजयंती, बुद्ध धम्मातील अष्टांगिक मार्ग, दानपारमिता, कर्म, पुनर्जन्म आदी मुद्यांवर भर देत मार्गदर्शन केले. यावेळी माई त्यांच्यासह उपस्थित होत्या. याच वैशाख पौर्णिमेचे औचित्य साधून ८ मे १९५५ रोजी भारतीय बौद्धजन समितीच्या विद्यमाने नरे पार्क, परळ, मुंबई येथे माजी राज्यपाल मंगलदास पकवासा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला माई उपस्थित होत्या. या प्रसंगी बोलताना डॉ. बाबासाहेबांनी हिंदू धर्म व बौद्ध धर्म एक आहे, हा खोटा प्रचार असल्याचे सांगितले. बौद्ध धर्मात जाती, माती, असमानता आणि चातुर्वर्ण्य नसल्याचेही त्यांनी सांगितले (उपरोक्त पान क्र. ४०५)

बुद्धजयंतीच्या निमित्ताने आकाशवाणीवरुन भारतीयांना भगवान

बुद्धाच्या मध्यम मार्गाचे महत्त्व विषद करताना भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणाले होते, की अष्टांगिक मार्गावर आधारित व्यवहार दर्शनाकडे मी सर्व मनुष्यजाती आणि सर्व राष्ट्रांचे लक्ष वेधू इच्छितो. हिंसा आणि संघर्षाचे ढग आज जेवढे आच्छादलेले आहेत, तेवढे यापूर्वी कधीच आच्छादलेले नव्हते. बुद्धाचे प्रेम, सहिष्णूता तथा शांतीच्या संदेशाची जेवढी आवश्यकता आहे, कदाचित एवढी यापूर्वी कधीच राहिली नसावी. (बुद्धकालीन आधुनिक लोकशाही गणराज्य - निरंजन पाटील, पान क्र. १७४). भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये बौद्ध धम्म आणि तत्त्वज्ञानाचे महत्त्व आवश्यक असल्याचे सांगत भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत के.आर. नारायणन् म्हणतात, की जागतिक स्तरावर भारताने जी निती अंगिकारली आहे, ती बुद्धाच्या मध्यम मार्गाचे दर्शन (तत्त्व) आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी बुद्धांनी सांगितलेल्या कल्याणकारी नीतिला आज आर्थिक विकासाकरिता जोडलेले आहे. भारतासह विश्वाच्या साऱ्या समस्यांचे समाधान बुद्धाच्या विचारांमध्ये समाविष्ट आहे. कोणत्याही समस्यांचे समाधान या आव्हानांशी सामना करण्याचा उपाय करण्यास जेव्हा इतर धर्माचे रस्ते बंद होतात, तेव्हा बुद्ध धर्म हा असा धर्म आहे, की तो अंधारातून बाहेर पडण्याचा मार्ग सुकर करीत असतो. (उपरोक्त पान क्र. १६४)

जागतिक तापमानवाढीचे दुष्परिणाम लक्षात घेता, आज जागातील सर्व प्रमुख राष्ट्रे, जागतिक हवामान आणि जागतिक समस्या या विषयासंबधी कृतिकार्यक्रम स्वतः पुढाकार घेऊन राबवत होते. जगभर पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास, त्यामुळे वाढणारा उष्मा आणि त्याचे जगाला भोगावे लागणारे दुष्परिणाम या समस्यांवर तज्ज्ञांनी आपले विचार व्यक्त केले. भारताने नद्यांच्या पाण्याचे नियोजन अजूनही नीट केलेले नाही, उद्योगधंद्यांवर कठोर निर्बंध लादलेले नाहीत. सर्वांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याचे प्रयत्न कोलमडून पडत आहेत. वाहनाच्या संख्येवर बंधने नाहीत. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरावर नियत्रंण देण्याची यंत्रणा सक्षम नाही. संयुक्त राष्ट्रसंघ (युनो)च्या पर्यावरणविषयक अभ्यासगटाचे प्रमुख शॉन मॉरकाट या प्रकारचा भीषण धोका सांगताना म्हणतात, येत्या दशकात तापमानवाढ भीषण होईल. गेल्या २,००० वर्षांत तापमान कधीच इतके वाढले नव्हते. मात्र हे संकट अटळ आहे. ऊर्जेसाठी लाकूड, कोळसा, जाळणे बंद केल्यास हवेतील कार्बनचे प्रमाण नक्की घटेल. शेजारच्या बांगलादेशाने आपल्या दहा लाख नागरिकांना सौरऊर्जेचे उपक्रम दिले. हे उदाहरण भारताने गिरवायला काय हरकत आहे? (चित्रलेखा साप्ताहिक, प्रबोधन डॉ. जे.बी. शिंदे २५ मार्च २०२२) हे लक्षात घेऊन बौद्धराष्ट्र पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्त्व देतात.

रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून जगभरातील रशियाविरोधातील नाटो (उत्तर अटलांटिका संघ) देशांनी टीका सुरू केली. भारत हा रशियाचा जुना मित्र असल्याने अद्याप युक्रेन युद्धात भारताने तटस्थ भूमिका घेतली आहे. जागतिक पातळीवर भारताने रशियाविरुद्ध उभे रहावे, अशी अमेरिकेची इच्छा आहे; परंतु भारताने या प्रकरणी थेट भूमिका घेतली नाही. भारताने तटस्त राहता शांतता पाळण्याचे आवाहन केले आहे. (एक दैनिक वृत्तपत्र, २९ मार्च २०२२).

रशियाचे महासंघ आणि युक्रेन दोघांशीही चांगले संबंध असल्यामुळे भारताने एक अलिप्त राष्ट्र म्हणून तटस्थ राहण्याची भूमिका घेतली आहे. सत्तेवर आल्यापासून पंडित नेहरूंबाबत खडेफोड करणाऱ्या प्रधानमंत्री मोदी यांना अखेर नेहरूंनी स्वीकारलेल्या अलिप्त वा तटस्थतेच्या धोरणाचा पुरस्कार करावा लागला. कारण नेहरूंनी आपण अमेरिका व रशिया या दोन्ही राष्ट्रांचे मित्र आहोत, असे सांगितले होते (द पीपल्स पोस्ट, १ ते १५ मार्च २०२२, पान क्र. १०, ११). वर्तमान रशियन महासंघ म्हणजे १९९१ पूर्वीच्या सोव्हिएत युनियनशी भारताने मैत्रीचे संबंध निर्माण केल्यामुळे भारतातील संसदीय लोकशाहीला धोका निर्माण झाला असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. भारत हा लोकशाही देश असताना लोकशाहीप्रधान देशाशी संबंध न ठेवता रशिया आणि चीन या साम्यवादी देशाशी संबंध ठेवल्याने या देशाला त्याचे परिणाम निश्चित भोगावे लागतील. भारत हा देश लोकशाही तत्त्वाला मानणारा आहे. म्हणून भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी याच तत्त्वांच्या आधारे केली पाहिजे, असे बाबासाहेबांचे (१९५४) सांगणे होते. नेहरू, सरदार आणि नेहरूंचे नेतृत्त्व यांच्यावर डॉ. आंबेडकर मार्च, १९५४ च्या भाषणात म्हणतात, की रशियाने स्वतंत्र केलेल्या देशात हुकुमशाही येते, मुक्तीनंतर स्वातंत्र्य येते असे त्याचे स्वरूप नाही (धगधगते बौद्ध राष्ट्र तिबेट- निरंजन पाटील, पान क्र-५१)

रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून त्यांचे अणुयुद्धात रुपांतर होणार का, ही चिंता सगळ्या जगाला सतावते आहे. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाचे राष्ट्रध्यक्ष पुतीन यांनी रशियाच्या न्यूक्लिअर फोर्सेसना अलर्ट राहण्याचा आदेश दिल्यानंतर ही चिंता अधिक वाढलीय. सध्या तरी रशियाकडून अणुहल्ला होण्याची अजिबात शक्यता नसल्याचे युद्ध अभ्यासक सांगत आहेत. त्यांच्या मते, तशीच वेळ आली तर रशिया आधी रासायनिक शस्त्रांचा वापर करेल. कारण रासायनिक शस्त्रांचा पुरावा नाकारणे शक्य असते. अणुहल्ला केल्यास तो कुणी केला, हे सहज कळू शकते. (साप्ताहिक चित्रलेखा-संपादक ज्ञानेश महाराव, मुखपृष्ठ कथा- २८ मार्च २०२२) ज्याप्रमाणे बुद्धांचा अनित्यवाद हा आधुनिक विज्ञानयुगातील सर्वश्रेष्ठ वैज्ञानिक सत्य असल्याचे सिद्ध झाले. त्याप्रमाणे बुद्धाचे अहिंसेविषयीचे तत्त्वज्ञानसुद्धा अणूस्फोटानंतर जगाला आचरणात आणण्याची गरज भासू लागली. युनो किंवा अणू विभाजन याचे प्रत्यक्ष दर्शन जरी विसाव्या शतकात घडले असले, तरी अणू विभाजनाच्या सत्याचा उच्चार व युद्धे टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या सामंजस्याच्या चर्चेचा आद्यउद्गाता तथागत गौतम बुद्ध आहे. सध्याच्या धर्मापैकी कोणताही धर्म, तथागत बुद्धाच्या अणूविषयक व युद्ध निराकरणाविषयक मतांचे उल्लंघन करू शकत नाही. त्यांना बुद्धाचे अनित्यवादरूपी अणूविज्ञान व युद्धनिरोधाचे तत्त्वज्ञान नाकारता येणार नाही. (सिद्धत्य बुध्द ते प्रच्छन्न बुद्ध, श्रीकांत शेट्ये पान क्र ४९.)

कोलियाविरुद्ध युद्ध घोषित करण्याच्या हेतूने बोलावलेल्या सभेत शाक्य सेनापतीने युद्धाचा प्रस्ताव मांडला असता त्या प्रस्तावास सिद्धार्थ गौतमाने जोरदार विरोध केला. कोणताही प्रश्न युद्धाच्या मार्गाने सुटू शकत नाही, हे सिद्धार्थाने त्यावेळी पटवून दिले. जीवनातील युद्ध व हिंसा नष्ट करण्यासाठी माणसाच्या मनात

आमूलाग्र क्रांती झाली पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादिले. मनुष्याच्या दुःखाची, हिंसेची कारणे स्वतःमध्ये आहेत हे पाहिले तरच तो हिंसा नष्ट करण्याचा प्रयत्न करील. तथागत बुद्ध हिंसेच्या विरुद्ध होता; परंतु तो न्यायाच्या बाजूचा होता. जिथे न्यायासाठी बलाचा वापर करणे आवश्यक असते, तिथे त्याचा वापर करण्याची तो परवानगी देत असे. याचा अर्थ बुद्ध महान अहिंसक होता, असा जो गैरसमज आहे तो दूर करण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रयत्न करतात. येथील शोषण, अन्याय, अत्याचार, विषमतेविरुद्ध लढणाऱ्या कृतिशील विद्रोही चळवळीची परंपरा नष्ट करता यावी म्हणून पुराणमतवाद्यांनी बुद्धाला महान शांतीवादी, अहिंसक लेखून बुद्धाच्या तत्त्वनिष्ठ अहिंसावादाच्या विषयास सुरुवात केली. याकडे लक्ष वेधून डॉ. बाबासाहेब म्हणतात, The Buddha was against violence, but he was in favour justice and where justice required he permitted the use of force हे पटवून देण्यासाठी एक उदारण दिले. बुद्धाच्या अहिंसा तत्त्वाचे पुरेसे आकलन होऊ न शकल्याने आपल्या शंकेचे निराकरण करण्यासाठी सिंह नावाचा वैशाली गणराज्य सेनापती बुद्धाकडे येतो (बुद्ध तत्त्वज्ञान आणि प्रबोधन क्रांती, निरंजन पाटील, पान क्र. ४२). सेनापतीने अहिंसा तत्त्वाबाबत बुद्धाशी जी चर्चा केली, ती येथील ब्राह्मण्यवादी लेखक जे बुद्धाशी अहिंसा व शांती यावर जोर देतात अहिंसातत्वाबाबत प्रचंड गल्लत करतात, सोयीस्कररित्या विसरतात. या बाबत बुद्धांनी सिंहाला सांगितले, की जर कोणी आपले धन, संपत्ती लुटून नेत असेल, आपल्या बायको-मुले यांवर अत्याचार करीत असेल, शांती स्थापन करण्यास सर्व मार्ग जर बंद झाले असतील, तर हिंसेची जबाबदारी युद्ध करणाऱ्यावरच येत नाही. युद्ध होऊ द्या; परंतु ते आपल्या स्वार्थासाठी नसावे. हे सेनापती सिंहा, तू पूर्ण उत्साहाने लढ; परंतु सत्याचा सैनिक हो, स्वसंरक्षण हे पुरेसे बोलके आहेत. स्वसंरक्षण तत्त्व आज सारे जग मान्य करते, हे प्रचलित कायदाही त्याचा सन्मान करतो. हे इथे नमूद केले पाहिजे.

हिंसा-अहिंसेच्या तत्त्वाबाबत डॉ. बाबासाहेब म्हणतात, आर्यांची आत्यंतिक हिंसावृत्ती तर जैनांची आत्यंतिक अहिंसा या दोन्ही अव्यवहारवृत्ती म्हणून गौतम बुद्धाने आपला बुद्ध धर्म प्रस्थापित केला. शक्यतो अहिंसा, जरुर तर हिंसा ही गौतम बुद्धाची भूमिका होती. हा बौद्ध धर्म जर टिकून राहिला असता, तर अहिंसेबद्दलचे आज हे प्रश्न उभे झालेच नसते. बुद्धाची बाजू जरी गांधींनी घेतली असली, तरी अहिंसेच्याबाबत बुद्ध आणि गांधी यांच्यात फार मोठा फरक आहे, हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. तो फरक म्हणजे तत्त्व आणि नियम यातला फरक आहे. बुद्ध अहिंसातत्त्व म्हणून मानीत नसे. गांधी अहिंसा हा नियम आहे असा प्रचार करीत आहेत. तत्त्व आणि नियम यांच्यात फरक आहे व तो फार मोठा आहे. (Principal is to be followed) नियम पाळायचा असतो. (Rule is to be obeyed) नियम आला की मनुष्य गुलाम होतो. तत्त्व ठरले, की मनुष्य त्याचा उपासक होतो, गुलाम होत नाही. हा फरक ध्यानात न आल्या कारणाने अनेक समाज रसातळाला गेले आहेत. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड २० वा, पान क्र. २७७-२७८).

तथागत गौतम बुद्धांनी अहिंसा शिकवली, शांती शिकवली, न्याय, मैत्री, स्वातंत्र्य, समता, बंधुता शिकवली. तथागताला एक सामाजिक संदेश द्यायचा होता. डॉ. बाबासाहेबांचे हे मत अगदी रास्त आहे. आधुनिक लेखक, विचारवंत, जागतिक राजकारणी (पहिल्या फळीचे) यांनी बुद्धाच्या अहिंसा आणि शांती याला अधिक महत्त्व दिले आहे. बुद्धाने आपल्या जीवनात जो सामाजिक संदेश सांगितला, तो मूलतः व तत्त्वतः सामाजिक आहे. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. ही अपेक्षा दूर करण्याकरिता बुद्धाला काही सामाजिक संदेश द्यावयाचा होता. त्याचे पुनस्मरण वा चिंतन करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी २२ प्रतिज्ञा दिल्या असाव्यात. बाबीस प्रतिज्ञांचा गोषवारा काढला, तर बुद्धाला केवळ अहिंसा व शांती शिकवायची नव्हती, तर त्याचबरोबर त्यांना समाज व व्यक्ती यांच्यात दुवा साधून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, मैत्री, करूणा यावर आधारित व्यक्तीव्यक्तीत, समाजासमाजात उचित मार्ग प्रस्थापित करून एक सामाजिक संदेशाकडे म्हणजे वर्ण, वर्ग, यज्ञयाग, कर्मकांड, जातीभाव, भेदभाव, पुरोहितवाद (ब्राम्हणी व्यवस्थे)विरोधी संघर्ष (विद्रोह), अंधश्रध्दा, भ्रष्टाचार, अत्याचार यावरील लिखाणाकडे (साहित्याकडे), भाष्याकडे दुर्लक्ष करून बुद्धाच्या अहिंसा व शांती या दोन तत्त्वांवर अधिक भर देतात. ते देणे संयुक्तिक असले, तरी ते तेवढेच पुरेसे नाही. बुद्धाला आणखीही सामाजिक संदेश द्यायचा होता. यावर चौफेर चिंतन व्हावे, ही बाबासाहेबांची अपेक्षा होती आणि त्यासाठी त्यांनी बौद्ध धम्माची आपल्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात धम्म, अधम्म, सद्धम्म यात विभागणी केली आहे असे वाटते, असे विचारवंत विजय सातपुते आपल्या लेखात लिहितात (एका दैनिक वृत्त पत्रातील लेख, दिनांक ०१ एप्रिल २०२२).

१० जून १९५६ रोजी दिल्ली येथे भारतीय बौद्धजन समितीच्या वतीने तथागतांच्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, की नैतिकतेवर आधारलेल्या अहिंसेचा उपदेश बौद्ध धम्मात आहे, याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. अहिंसेचा अर्थ लोकांनी चुकीचा लावला. माणसाने पशुहत्या करू नये किंवा हातात तलवार घेऊन देशरक्षणासाठी लढू नये, ही अहिंसा नाही. अहिंसा दोन गोष्टींवर आधारलेली आहे. आवश्यतेसाठी हत्या आणि हत्या करण्याची इच्छा होणे. जर राष्ट्रावर परचक्र आले, देश संकटात सापडला, तर हातात तलवार घेऊन राष्ट्ररक्षणासाठी तळहातावर शीर घेऊन समरांगणात उडी घेणे आणि शत्रूचा निःपात करणे, त्याची हत्या करणे हे प्रत्येक नागरिकाचे प्रथम कर्तव्य आहे. याचा अर्थ ही हिंसा आवश्यक होती. त्याला बौद्ध तत्त्वज्ञानात उच्चतम प्रतीची अहिंसा म्हणतात. दुसरी मारण्याची इच्छा होते, (डॉ. आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ वा, भाग-३) सिलोन, म्यानमार, व्हिएतनाम आदी देशांतील बौद्ध भिक्खू राष्ट्ररक्षणासाठी रणांगणावर उतरले होते. आज अणुयुध्दाच्या मार्गावर उभ्या असलेल्या जगाला बुद्धांचा विश्वशांती, विश्वबंधुतेचा संदेश मार्गदर्शक ठरला आहे. 'युद्ध की बुद्ध' हा मानवी अस्तित्वाचा प्रश्न आहे, ज्याचे उत्तर बुद्ध हेच देता येईल. रविवार दिनांक १५ फेब्रुवारी १९५३ रोजी नवी दिल्ली येथील भाषणात डॉ. आंबेडकर यांनी एक छोटेसे व विचार

परिलुप्त असे भाषण केले. ते म्हणाले, जगापुढे विशेषतः आशिया खंडापुढे आज दोनच मार्ग उपलब्धत आहेत. एक बुद्धाचा मार्ग व दुसरा मार्क्सचा मार्ग. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा वेळीच जगाने स्वीकार केला नाही, तर कम्युनिष्ट तत्त्वज्ञानाचा विजय होणे अपरिहार्य आहे. बुद्धाचे तत्त्वज्ञान हाच जगाचा एकमेव आधार आहे व त्याचा जेवढा प्रचार होईल, तेवढे जग युद्धापासून दूर व शांततेच्या नजीक जाईल, या डॉ. बाबासाहेबांच्या भाषणाचा तेथे जमलेल्या लोकांवर अत्यंत परिणाम झाला व बौद्ध तत्त्वज्ञानाबदल एक नवीनच दृष्टी घेऊन त्यांच्यापैकी काहीजण बाहेर पडले (वरील खंड १८, भाग-३).

ज्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नव्याने बौद्ध धर्माच्या पद्धतशीर, शिस्तबद्ध, रचनात्मकदृष्ट्या प्रचार व प्रसारासाठी 'द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया' अर्थात, भारतीय बौद्ध महासभेची स्थापना ०४ मे १९५५ रोजी रजिस्टर केली. तिचा रजिस्टर नं. ३२२७ असा व पब्लिक ट्रस्ट नं. ९८२/५५ असा आहे. त्यावेळी भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासंघ, मुस्लिम लीग, मार्क्सवादी, कम्युनिस्ट यांसारख्या सांप्रदायिक साम्यवादी संघटनांनी बुद्धप्रणित लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता यांसारख्या पायाभूत तत्त्वे, तर स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या जीवन मूल्यांपुढे आव्हान उभे केले होते. हिंदुत्ववादी, भांडवलशाही समाजवादाच्या हिंदू जीवनपद्धतीचा पर्याय उभा करण्याच्या प्रयत्नात होते. हिंदू राष्ट्रवादाची त्यांची मागणी ही त्याचकरिता होती. (आधार 'आंबेडकरी तत्त्वविचार : दिशा आणि संघर्ष', निरंजन पाटील, पान क्र. ६७) 'बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया' संस्थेचे ध्येय, उद्दिष्टे खालीलप्रमाणे, 'Memorandum of Association No. 2 Rule - 2 and regulation Governing the Constitution of the society No.111 प्रमाणे The objects of the society shall be 10 ऐवजी क्रमांक ३, नुसार संस्थेने धार्मिक शिक्षण देण्यासाठी विद्यालय किंवा महाविद्यायलये काढल्याचे दिसत नाही. क्रमांक ४ नुसार संस्थेने अनाथाश्रम, दवाखाने व मदत केंद्र स्थापन करण्यात आलेली नाहीत. क्रमांक ४ नुसार सर्व धर्मांचा अभ्यास करण्यासाठी शाळा बेंगलोर येथे सुरू करण्याचा मानस बाबासाहेबांनी बोलून दाखविला होता. पाच एकर जमीन म्हैसूर सरकारकडून मिळवली होती. पण तिचे काय झाले, माहिती मिळत नाही. क्रमांक ६ (७) नुसार बेंगलोर येथे शाळेला जोडून प्रेस सुरू करण्याची व बौद्ध साहित्य छापून प्रकाशित करण्याची बाबासाहेबांची जी कल्पना होती, ती फलद्रूप झाली नाही. क्रमांक ७ नुसारच बुद्धभूषण प्रिंटींग प्रेस Buddhist society of India च्या मालकीची राहील व यशवंतराव त्याचे प्रमुख राहतील, अशी बाबासाहेबांची योजना होती. प्रेसचे काम सध्या आदरणीय भीमराव यशवंतराव आंबेडकर पाहतात. सोबतच ते 'धम्मयान' मासिक आणि पाक्षिक 'प्रबुद्ध भारत' प्रकाशित करण्याचे काम करीत आहेत; परंतु क्रमांक ९ नुसार नवीन प्रेस सुरू केलेली नाही, तशी माहिती नाही. या संस्थेची ध्येय, उद्दिष्टे गाठण्यासाठी आतापर्यंतचे प्रयत्न अपुरे दिसतात, ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करायला हवेत (बौद्धमय भारत ॲड. जी.डी. धोत्रे, पान क्र. ८७-९८) या बाबींकडे संस्थेने गांभीर्यपणे लक्ष दिले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर कावसजी जहांगिर हॉलमध्ये दादासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत एल.एफ. हिंदुळेकर यांनी (आधी ठरल्याप्रमाणे) बौद्ध महासभेच्या अध्यक्षपदासाठी भय्यासाहेबांचे नाव जाहीर केल्यानंतर काही मंडळींनी चुळबुळ सुरू केली. संस्थेचे दुसरे अध्यक्षपद स्वीकारल्यानंर लोकशाहीचे पुरस्कर्ते भय्यासाहेब उर्फ यशवंतराव आंबेडकर यांनी दिनांक ०१-०१-१९३७ रोजी घोषणा केली, की भारतात बौद्ध महासभेच्या घटनेनुसार अध्यक्ष आजन्म अध्यक्ष असतो; परंतु घटनादुरुस्ती करून ही मर्यादा ३ ते ५ वर्षांपर्यंत मर्यादित करावयाची माझी इच्छा आहे. रावळी कॅम्प (मुंबई) येथील सभेत, मी भारतीय बौद्ध महासभेच्या अध्यक्षपदी आजन्म राहू इच्छित नाही, असे त्यांनी सांगितले (प्रबुद्ध भारत ०७-०९-१९५७). अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी इरादा केला, की धम्म प्रचारासाठी प्रचारक आवश्यक असतात, त्यासाठी दीक्षाभूमीवर बौद्ध विद्यापीठ निर्माण करावे, तसेच म्हैसूरच्या महाराजाने दिलेल्या बेंगलोर येथील जागेत प्रसार केंद्र सुरू करावे, असा माझा मानस आहे. बौद्ध विद्यापीठाबाबतची स्पष्ट भूमिका भय्यासाहेबांच्या मेंदूत घर करून होती. धम्म प्रचारासाठी ते केवळ प्रचारक म्हणून थांबले नाहीत, तर पुढे १९६७ साली 'पंडित काश्यप' हे नाव धारण करून श्रामणेरची दीक्षा घेण्याचे धैर्य फक्त भय्यासाहेबांना झाले, हे वेगळे सांगायला नको (सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर, संपादक ज.वि. पवार, पान क्र. २७-२८).

बौद्ध संस्कृतीत ऐतिहासिक स्तूप, लेणी, स्तंभ, शिलालेख हा बौद्ध संस्कृतीचा वारसा बाबासाहेबांनी आपल्याकडे सुपूर्द केला. साहजिकच हा वारसा जतन करणे व त्याच धर्तीवर नवीन प्रतीके निर्माण करणे हे नवदीक्षीत बौद्धांचे कर्तव्य आहे. भय्यासाहेबांनी अशी प्रतीके निर्माण करण्यामध्ये जो पुढाकार घेतला, ती परंपरा संस्थेने सुरू ठेवून त्यांच्या आदर्शाचे कृतीकरण करावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरप्रणित बौद्धांची चळवळ तसेच 'भारतीय बौद्धांच्या समस्या,' भगवान बुद्धाचा मानवतेचा, शांततेचा, बंधुत्वाचा संदेश या विषयावर भय्यासाहेबांनी आपले जे विचार १९७२ साली श्रीलंका येथे आयोजित जागतिक बौद्ध परिषदेत (World fellowship of Buddhist Conference) मांडले, त्याकडे मी बुद्ध जयंतीच्या बुद्धाब्ध २५६५-६६ या वर्षाकडे सर्व बौद्धांचे लक्ष वेधू इच्छितो, की आज निरनिराळ्या संस्था बौद्ध धर्म प्रचाराचे कार्य करीत असल्या, तरी All Roads list to Room या प्रमाणे डॉ. बाबासाहेबांच्या केलेल्या नद्या शेवटी महासागराला येऊन मिळतात. याप्रमाणे डॉ. बाबासाहेबांच्या 'मी सारा भारत बौद्धमय करेल,' या ध्येयपूर्ततेसाठी सर्व संस्था कार्यरत हव्यात. भारतीय बौद्ध महासभेचे ध्येय गाठण्यासाठी जलद गतीने वाटचाल करता येईल. कोणत्याही धम्मसंस्थेची तुलना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या मातृधर्मसंस्थेशी होऊ शकणार नाही, हे लक्षात घेऊन The Buddist Society of India ही धम्मकार्याची मूळ धम्मसंस्था सर्वांनी मानली, तर महासागराप्रमाणे विशाल बौद्ध संघटनेचे स्वरूप प्राप्त होऊन बौद्धांचे आंदोलन झाल्याशिवाय राहणार नाही. ●●●

**(लेखक धम्मयान मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत.)**

# दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे...

महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणातील बराच भूगोल आणि कालखंड व्यापून राहिलेल्या शरद पवार यांचे एक श्रेष्ठ वैशिष्ट्य म्हणजे ते कुणाला कळत नाहीत किंवा आम्ही त्यांना पूर्णपणे ओळखले, असा दावा कोणी करू शकत नाही. खरे तर, यालाही नेतृत्वाचा एक चांगला गुण म्हटला जातो. जे आपल्याला कळतच नाही, ते भारीच असते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी एकदा त्यांचे वर्णन करण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. तेल लावलेले पैलवान असे त्यांनी वर्णन केले होते. हे वर्णन थोडेफार जवळपास जाणारे होते. पण थोडाफार अन्यायही करणारे होते. राजकारणात अशा गोष्टींकडे न्याय-अन्याय पद्धतीने कोणी पाहत नाही. खिलाडू वृत्तीने पाहिले जाते. तेल लावलेल्या पैलवानाला कोणी कोणताही डाव करून किंवा कोणत्याही गुरूचे नाव घेऊन चितपट करता येत नाही. सामना कदाचित बरोबरीने होऊ शकतो. पण असा पैलवान कधी हरू शकत नाही. अनेक खेळांचे नेतृत्व केलेल्या पवार साहेबांना असे कोणी चितपट करू शकत नाही. कारण सगळ्या खेळांचे म्हणजे अगदी खो-खोपासून, कबड्डीपासून, कुस्तीपासून ते क्रिकेटपर्यंत सर्व खेळांतील डावपेचांबाबत ते स्वयंभू महागुरू आहेत. म्हणजे त्यांनी कोणाला गुरू करून घेतले नव्हते. स्वतःच गुरू असलेल्या या वस्तादाला शिष्य मात्र मोजता येणार नाहीत इतके आहेत. अर्थात, शिष्यांनी आपले शिष्यत्व जाहीर केले आहे. वस्तादाला ते मान्य आहेत की नाही, हा भाग वेगळा. भक्त, कार्यकर्ता, शिष्य, एकनिष्ठ, श्रद्धावान असे वेगवेगळ्या श्रेणीत कार्यकर्त्यांची विभागणी होत असते. शरद पवार स्वतःच्या शक्तीवर राजकारण करतात. एखादा पक्ष सोडताना, नवा काढताना, पुनर्प्रवेश करताना, डावपेच आखतानाही ते स्वतःची शक्ती आणि चातुर्य वापरतात. बहुतेक वेळा यशस्वी होतात. पाच-सात दशके भारतीय राजकारणात टिकूनही राहतात. अनेकांनी त्यांना महागुरूच्या रुपात बघितलेले असते. अनेकजण त्यांचा गंडा बांधून डोंगर नसेना का; पण टेकड्या तरी झालेले असतात. कोणी म्हणतील पवार साहेब म्हणजे भारतीय राजकारणातला एक चमत्कार. काही नसताना, वस्त्रानिशी मातृपक्ष सोडून स्वतःचा बलवान पक्ष तयार करण्यात आणि समविचारी पक्षांशी आणि विषम विचारी पक्षाशीही जोडून घेण्यात त्यांना अनेकदा यश आलं आहे. पुलोदमध्येही त्यांनी कोणाबरोबर मैत्री केली. काँग्रेस एस आणि एनसीपी निर्माण करून कोणाशी मैत्री केली, याचा इतिहास ताजा आहे. डावे असोत, आंबेडकरी असोत, जनसंघ असो, काँग्रेस असो, शेतकरी संघटना असो; शरद पवार हे सर्व लीलया कसे घडवतात यालाच चमत्कार मानला जातो.

ऋतू शरद असो अथवा हेमंत, अथवा वसंत, सर्व ऋतूंत आणि




सर्व भूगोलात पवार महाशक्तिमान बनत राहिले. निदान तसा संदेश तरी त्यांनी दिला. सत्तेत असताना अथवा नसताना त्यांचं मोठेपण वाढतच गेलं. वयाच्या ८३ व्या वर्षांपर्यंत अनेक विशेषणांनी त्यांचं नामकरण होत राहिलं. कधी मर्द मराठा, कधी जाणता राजा, कधी श्रेष्ठ राजनीतिज्ञ तर कधी आणखी काही, अशी अनेक विशेषणं त्यांच्या पायावर लोळण घेत राहिली. मराठी माणसाच्या जीवनातील सर्व घटकांवर पवार प्रभाव टाकत राहिले. रयत शिक्षण संस्था असो अथवा दादरचे वाचनालय, सहकार असो वा सांस्कृतिक क्षेत्र, सर्व ठिकाणी पवारांची पदचिन्हे ठळक दिसतील. या सर्व प्रवासात त्यांच्या सावलीचे लाभार्थी अनेकजण झाले, घरातले आणि बाहेरचे. पवारांनंतर कोण याचे उत्तर पवारांनी स्वतः कधी दिले नाही. पण लोक देत होते. सुरुवातीला पवारांनंतर दादा, मग दादा-ताई, मग रोहितदादा अशी उत्तरे लोकच देत होते. नेता जसा लोकांवर सत्ता गाजवतो तसे लोकही नेत्यावर सत्ता गाजवत असतात. तरीही शरद पवार साहेब कधी कुणाला कळत नाहीत ही गोष्ट कायमच राहिली. वारसदार कोण याबाबतही त्यांनी जाहीरपणे कधी ब्र नाही काढला. याबाबतही लोकांच्या मनात काही प्रश्न तयार झाले. काही समीकरणे तयार झाली. साहेब जे बोलतात त्याच्यापेक्षा ते वेगळे करतात. ते सांगतात त्याच्यापेक्षा वेगळे घडते. लोकांनी या गोष्टीलाही शरदनीती असे नाव मोठ्या कौतुकाने दिले आणि साहेबांनी ते मिरवले. साहेबांच्या भाषणात लंबेचौडे शब्द नसतात. डायलॉग नसतो. 'पुन्हा येईन'सारखी भाषा नसते. ते न सांगता येतात आणि न सांगता जातील, पण त्याचा प्रचार करत नाहीत. अजितदादांसारखा गुस्सा साहेबांच्या ओठावर नसतो. साधे-सरळ आणि आशयांनी भरलेले भाषण ते करत असतात. लाखोंच्या सभा

खेचतात. लबाडाच्या घरी जेवण मिळाल्यानंतरच ते मिळाले असे समजावे, भाकरी परतायला हवी यासारखी वाक्ये शब्दकोशात नव्हे, तर त्यांच्या राजकीय शेतीच्या बांधावर उगवलेली असतात. डोक्यावर छत्री घेऊन केलेली सभा एखाद्या राजा महाराजाला घरात बसवू शकते. असंच एक वाक्य त्यांनी उच्चारलं आणि ते म्हणजे भाकरी परतली पाहिजे... लोक गांभीर्याने याचा विचार करू लागले. साहेब भाकरी परतणार म्हणजे आता नेमके काय करणार? भाजपची सत्ता संपवणार, की आणखी काही. भाकरी परतली पाहिजे या तीन शब्दांनी महाराष्ट्राची झोप उडाली. सांकेतिक शब्दांत काय दडलं असेल याचं कोडं भल्याभल्यांना पडलं. साहेब जे म्हणाले ते योग्य होतं. भाकरी परतली नाही तर करपते, घोडा पळवला नाही तर वाया जातो, बस्स्या बैलासारखा बसून राहतो. भाकरी काय आणि घोडा काय त्यांची पाठ-पोट बदलावं लागतं. सर्वजणांना हे पटतं, कळतं; पण भाकरीमागं काय दडलं होतं याची उत्सुकता वाढली. टोपीखाली दडलेलं पाहणं एक वेळ सोपंही असतं. पण भाकरी परतण्याचे नेमके परिणाम काय, कोणाविषयी ते आहे, तव्यात कोण परातीत कोण आणि पाटीत कोण हे चटकन समजण्यासारखं नसतं. पण सारे जण बेसावध असताना एका जाहीर समारंभात साहेबांनी भाकरी परतवण्याचा अर्थ सांगितला आणि ते ऐकून समारंभाला आलेल्या लोकांना चक्कर आली. ही भाकरी म्हणजे शिवथाळीतील किंवा ज्वारी-बाजरीची भाकरी नव्हती, तर स्वतः शरद पवारच भाकरीच्या जागी गेले आणि ती परतवायची म्हणजे पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा देणे, नव्या पिढीवर जबाबदारी टाकणे असे होते. या त्यांच्या घोषणेनंतर भूकंप व्हावा अशी परिस्थिती निर्माण झाली. अनेक नेते ढसाढसा रडू लागले. जनता आक्रोश करू लागली. सत्याग्रह, उपोषण, आंदोलन सुरू झालं. रक्ताने पत्र लिहिणं सुरू झालं. उतावीळ लोकांनी मग शरद पवार नसतील, तर कोण वारस अशी नावंही तयार केली. ती शोधण्याला वेळ लावला नाही. ही नावं रक्ताने पत्र लिहिणाऱ्यांची नव्हे, तर साहेबांच्या रक्ताच्या नात्याशी जोडली गेलेली होती. भावनेच्या भरात आणि संधिसाधूपणातूनही अनेक गोष्टी घडत गेल्या. राज्यात दादा आणि दिल्लीत ताई ही घोषणाही कुणाच्या तरी सुपिक गोष्टीतून आली. सर्वत्र अस्वस्थता, तर्क, कल्पना यांना उधाण आलं होतं. एरव्ही असे काही दिव्य दक्षिणेकडच्या नेत्यांसाठी केलं जातं, त्याचे धनी आता साहेब झाले होते. साहेबांनी लोकांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यायचा होता, असे काही जण म्हणाले. खरे तर, नेते आणि जनता दोन असतात तेथे अशी मागणी रास्त असते. पण नेते आणि जनता परस्परांत विरघळून गेले असतील तर? मग नेत्यातच जनता ओतप्रोत भरली आहे, असे समजत मार्ग काढावा लागतो. नेता जनतेच्या हृदयसिंहासनावर विराजमान असतो तेव्हाच तो असे धाडसी निर्णय घेऊ शकतो. लोकशाही म्हणजे प्रत्येक वेळा पट मांडून सोंगटी मोजण्याचा कार्यक्रम नसते. तिथंही अनेक गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. भाकरी परतवण्याच्या भानगडीमुळे अनेक गोष्टी सिद्ध झाल्या. एरव्ही ती व्यापारी कंपनीकडून करून घ्यावयाच्या सर्व्हेमधूनही सिद्ध झाल्या नसत्या. ते येथे आपोआप झाले. भाकरी परतवल्यानंतर नवी जागा नेमकी कोण घेणार, हे लोकच बोलू लागले. संघटना अधिक बलवान करण्याची भाषा बोलली जाऊ लागली. नेतृत्वावर समाजमनाचा दबाव वाढवण्यात आला. शेवटी भाकरी परतवायची गोष्ट येथे थांबली. ती अधिक करपू नये म्हणून ती परतवण्याऐवजी चुलीतला विस्तव हळूवारपणे बाहेर ओढण्यात आला. आपला निर्णय बदलण्याची भूमिका पवारांनी जाहीर केली. अनेकदा व्यापक कार्यासाठी वचने, आणाभाका मागे घेतल्या जातात. अनेकदा पक्षात बंड करून बाहेर पडणारे त्याच पक्षात पुन्हा जातात. यात जय-पराजय पहायचा नसतो, तर राजकीय धोरणे, चाल-प्रतिचरित्र पहायची असते. पवारांनी स्वतःच्या पदाविषयी केलेली घोषणा मागे घेऊन नेमके काय साध्य केले, याविषयी थोडी वाट पहावी लागणार आहे. काही वेळा प्रश्नांवर उत्तरे उशिरा येतात, तर काही वेळा उत्तराअगोदर प्रश्न येतात. या साऱ्या गोष्टींना राजकारण म्हटले जाते. ते कळण्याइतपतचे शहाणपण आपण स्वतः कमवावे लागते किंवा आपल्या प्रिय नेत्याकडून घ्यावे लागते. इथे दोन गुणिले दोन याचे उत्तर पाचही येऊ शकते. शरद पवारांचा प्रत्यक्षात न दिलेला; पण मागे घेतलेला राजीनामा हे त्यांचे जसे धाडस आहे, तसे राजकीय चातुर्य कळसावर पोहोचल्याची साक्ष आहे. यामुळे अर्थातच सावल्या अगोदर नाराज होतात आणि पुन्हा नंतर... म्हणूनच दिल्या घेतल्या शपथांचा राग कुणी आळवू नये. शपथांच्या बंधनात कुणी कुणाला अडकवू नये. देशात एकतर्फी वाढणारे राजकारण चिंताजनक आहे. आता ते बदलण्यासाठी पुन्हा एकदा भाकरीचा सिद्धांत वापरण्याची गरज आहे. पिझ्झा-बर्गरच्या काळात भाकरी कशासाठी असा खवचट आणि बाळबोध प्रश्न कुणी नाही विचारला म्हणजे खूप झाले आणि पवार साहेबांनी एक पाऊल मागे न घेता आपला निर्धार पूर्ण केला असता, तर काय झाले असते, असा भ्रम निर्माण करणाराही प्रश्न विचारू नये. कारण त्याचे उत्तर काही चांगल्या रुपात दिसले नसते. साहेब, दादा, ताई आणि छोटे दादा ही सारी एकाच नात्याची गुंफण असली तरी साहेब ते साहेबच, असे उत्तर पुण्याजवळ भोर येथे शरद पवार चिकन सेंटर चालवणाऱ्यांनाही ठाऊक असतेच की देवा... विंचू तात्यालाच ते ठाऊक, असा दावा तात्यासुद्धा करणार नाही.

शेवटी तव्यावरच्या भाकरीनं आणखी एक गोष्ट सिद्ध केली आणि ती म्हणजे श्री. पवार भारतीय राजकारणातले अजूनही एक सामर्थ्यशाली नेते आहेत आणि त्यांचा पक्ष, त्यांचे कार्यकर्ते आणि जनता त्यांच्याबरोबर आहे. पवारांसाठी ती काहीही करायला तयार आहे. तीन पक्षांच्या आघाडीत राष्ट्रवादीचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे, हेही या निमित्ताने सिद्ध झाले. विशेष म्हणजे, दादांना जाहीररित्या संदेश मिळाला असावा. दादा कुठेही गेले तरी आम्ही त्यांच्याबरोबरच जाणार असे सांगणाऱ्यांनाही संदेश मिळाला असावा. याचबरोबर आपण आणि मुख्यमंत्रीपद हा प्रवास सोपा नाही. पहाटेच्या शपथविधीइतका तर तो नक्कीच सोपा नाही, हेही समजून घेण्याचा प्रयत्न दादांनी नक्कीच केला असावा. मरेपर्यंत राष्ट्रवादीत राहणार हेही त्यांना स्पष्ट करावे लागले. पण राजकारण अशा स्पष्टीकरणाच्याही पुढे जात असते. कारण कोणतेही असो; पण पहाटेच्या शपथविधीचे समर्थन साहेबांनी केले होते. प्रत्येक वेळेला दादांच्याकडेच संशयाने का पाहिले जाते, हा प्रश्न सर्वांच्याच ओठावर असतो आणि बारामतीच्या स्टॅण्डवरील सामान्य माणूसही एकच साधे उत्तर देईल आणि ते म्हणजे जेथे धूर

असतो तेथे अग्नी असतोच. भाकरीच्या निमित्ताने अनेक पापुद्रे तयार झाले आहेत. पवारांच्या दीर्घ राजकारणाचा वारसा चालवण्यासाठी त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती येणार, की पक्षातील आणि अधूनमधून पक्षावर शिंतोडे उडतात ते कसे रोखायचे हेही प्रश्न आहेत. तूर्त तरी शरद पवारांनी पक्षांसाठी अनेकदा दिलेल्या आश्वासनांशी, व्यक्त केलेल्या निर्धाराशी, शपथांशी बांधिलकी ठेवली आहे. येणाऱ्या कठीण राजकीय कालखंडात या सर्व आणाभाकांचा, निर्धारांचा कस लागणार आहे. ती वेळ जवळ आलीय. आपण जो निर्णय घेतला, त्यावरील जनतेचा विश्वास ढळणार नाही याची काळजी त्यांनाच घ्यायची आहे.

## 'द केरला स्टोरी' चित्रपट नव्हे, तर सांस्कृतिक संघर्षासाठी ठिणगी

भारतीय चित्रपटसृष्टी एकेकाळी पुरोगामी आणि परिवर्तनवादी विचारासाठी प्रसिद्ध होती. अनेक चित्रपटांनी समाजाचा तळ हलवण्यात आणि लोकशाही, समाजवाद, निधर्मीवाद सार्वत्रिक करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. गेल्या काही वर्षांपासून हिंदुत्ववाद अगदी मोकळेपणाने पसरतो आहे आणि त्याच्या आड येणाऱ्या गोष्टी पद्धतशीरपणे आणि प्रसंगी दडपशाहीने दूर केल्या जात आहेत. चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजनाचे साधन नव्हे, तर ते सांस्कृतिक संघर्षाचे वाहक असते या हेतूने जाणीवपूर्वक अनेक चित्रपटांची निर्मिती केली जात आहे. त्यात हिंदी चित्रपटसृष्टी जशी आघाडीवर आहे, तशी अन्य भाषांमधील चित्रपटसृष्टीही आघाडीवर आहे. इतिहासातील हिंदू राजांवर, घटना-घडामोडींवर चित्रपट काढणे वाढले आहे. हा सर्व इतिहास हिंदूराष्ट्राशी जोडला जात आहे. भलेही राजा अनेकदा पराभूत झाला असला तरी त्याच्या पराभवाचे गौरवीकरण केले जात आहे. शेजारी राष्ट्राला हरवण्याच्या घटनांवर, त्यातील पेचप्रसंगावर मोठ्या प्रमाणात चित्रपट आले. सीमेवरच्या हिंदू-मुस्लिम संघर्षावर आले. काश्मीर फाईल्स असा एक चित्रपट. तो सत्तेच्या जोरावर आणि विशिष्ट समाजाच्या द्वेषावर गाजवण्यात आला. हिंदू पंडितांच्या छळावर बेतलेल्या या चित्रपटाने सांस्कृतिक संघर्षाची रेषा अधिक ठळक केली होती. बहुसंख्य असलेल्या समाजावर अल्पसंख्य समाज अन्याय करतो. हाच समाज दहशतवादी, राष्ट्रद्रोही, धर्मद्रोही आहे असे संदेश मिळायला मदत होते. सामान्य माणूस चेतावतो. काही तरी वेगळे करायला प्रवृत्त होतो. स्वतःला संस्कृतिरक्षक, धर्मरक्षक असे जाहीर करतो. केवळ काश्मीर फाईल्सच नव्हे, तर गोडसेवरचा चित्रपट, जुन्या इतिहासातील राजे-रजवाडे यांच्यावरील चित्रपट येत आहेत आणि इतिहासांच्या गुहात खोलवर जाऊन राष्ट्रवादासाठीचे रसायन आणले जात आहे. देवादिकांवरील चित्रपट तर मोठ्या प्रमाणात येऊ घातले आहेत. त्यात राम, बजरंग आघाडीवर आहेत. श्रीलंकेजवळच्या समुद्रातला कथित सेतू काय, पुढच्या महिन्यात येणारा आदिपुरुष काय आणि छोट्या पडद्यावर झालेली देवदेवतांची, बुवा-महाराजांची गर्दी काय, हे सारे सांस्कृतिक क्षेत्रात खळबळ करणारे आणि सांस्कृतिक संघर्ष आयोजित करणारे आहे.




'द केरला स्टोरी' असाच एक चित्रपट. तो मुस्लिम समाजाच्या द्वेषावर उभा आहे, की काय असे वाटायला लागते. कर्नाटकातील निवडणुकीत खुद्द मोठे कारभारीच त्याचा प्रचार करतात. दिल्लीत न्याय मागण्यासाठी दोन-दोन महिने संघर्ष करणाऱ्या खेळाडूंवर ते प्रचारात बोलत नाहीत, तर केरळ स्टोरी या चित्रपटावर बोलतात आणि काँग्रेसला सांस्कृतिक खलनायक आणि दहशतवादाचे पाठीराखे ठरवण्याचा प्रयत्न करतात. प्रचारात बजरंगच मोठी जागा व्यापतो. केरळमधील हिंदू मुलींची फसवणूक करून त्यांना दहतशवाद्यांच्या टोळीत नेले जाते, त्यांच्यावर अन्याय-अत्याचार होतात असे हा चित्रपट सांगतो आणि अत्याचाराला बळी पडलेल्यांची संख्या तीस हजारांहून अधिक आहे, असा दावा करतो. केरळच्या डाव्या सरकारला, काँग्रेसला दहशतवाद्यांचे पाठिराखे असे प्रमाणपत्र देत त्यांची बदनामी करतो. यातील बऱ्याच गोष्टी खोट्या, कल्पित कशा आहेत, हे चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर सिद्ध झाले. मुली तीस हजार नव्हे, तर तीन-चार हजार होत्या, हेही सांगण्यात आले. हिंदुत्ववादी ते मान्य करण्यास तयार नाहीत. चित्रपटगृहात चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांवर त्यांनी फुलांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत केले. हिंदुत्ववादाची प्रयोगशाळा तर सेलसारखी योजना आखण्यात आली. जे लोक चित्रपट पाहून येतील त्यांना चहा-नाश्ता मोफत, अशी ती योजना आली. चित्रपटात अत्याचाराचे प्रसंग येतात तेव्हा अनेक प्रेक्षक मुस्लिमांचा निषेध करणाऱ्या घोषणा देतात. आपापल्या देव-देवतांचा जयजयकार करतात. चित्रपटातील वातावरण हळूहळू बाहेर येते आणि ते निवडणुकीच्या फडात पोहोचते. देशभर पसरते. क्रांती-प्रतिक्रांती असो, पण त्या होण्यापूर्वी सांस्कृतिक क्रांतीची गरज असते. शिक्षणाचे विकृतीकरण, त्यातून डार्विनची आणि महत्त्वाच्या इतिहासाची होणारी हद्दपारी, गोडसेला महानायक बनवण्याचे प्रयत्न, हिंदू राष्ट्राचे समर्थन करणाऱ्यांना मरणोत्तर पुरस्कार आणि आता चित्रपट-नाटकांतून मूलतत्त्ववाद पसरवण्याचे प्रयत्न म्हणजे सामान्य माणसाचा एका अर्थाने विश्वासघातच आहे. मूळ जगण्या-मरण्याच्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करणे आहे. या पार्श्वभूमीवर कोणत्या पडद्यात नेमके काय मुरते आहे हे जाणून घेतले नाही, तर सापळ्यात अडकलोच असे समजावे.

●●●


**– तात्या विंचू**

# बाबुराव बागूल ऊर्फ आबासाठी...

दलित साहित्याला
क्रांतीचे विज्ञान बनवणाऱ्या
आबा,
आम्हाला कधीच कळलं नाही, की
वर्षानुवर्षे आपल्या दारात
पहुडलेल्या स्मशानात
जळण्यासाठी गर्दी केलेल्या
मढ्यांना तुम्ही लढायला शिकवलं तरी कसं?...
हेही कळत नाहीय आम्हाला, की
वर्षानुवर्षे आपल्या दारातील
झाडावर लटकलेल्या वटवाघुळांना
तुम्ही चालायला शिकवलं तरी कसं?...
एवढंच काय..
आपल्या घराला घेरलेल्या
गटारीतील जीवजंतूंना तुम्ही
क्रांतीदूत बनवलं तरी कसं?...
हेच नव्हे तर अजूनही काही आहेत प्रश्न..
'भूमिहीन', 'पावशा', 'अपूर्वा'
आणि मूकनायकांची फौज करून
अघोरी बनलेल्या पाषाणावर
तुम्ही केले प्रहार ते फुटेपर्यंत
आणि हो आबा, चोरी कराव्या लागणाऱ्या जातीशी
स्वस्त होत असलेल्या मरणाशी
माणुसकी काढून घेणाऱ्या मैला वाहण्याशी
वेदाचे बाप होऊन लढलात तरी कसं?...
आबा,
जातीत गेलेला, गुलामीत रुतलेला
धर्मात सुजलेला आणि परंपरेत नागवलेला
सारा माणूसच तुम्ही बसवला
सूर्य-चंद्रांच्या पंक्तीत
त्याच्या पाळण्याची दोरीही दिली
याच माणसाच्या हाती
आबा,
आम्ही माणसं तुमचे ऋणी आहोत
तुम्हीच रचले आमच्यावर पोवाडे
तुम्हीच रचले आमच्यावर महाग्रंथ
तुम्ही केले चक्रव्यूहातून मुक्त
तुम्हीच गायले माणूससुक्त
आबा,
आता कुठं आम्ही चालतोय
तुमच्या कवितेचं बोट अलगद धरून
आणि सांगत आहोत,
'आम्ही सारी माणसं आहोत
विश्वाचे निर्माते आहोत
नवनिर्माणाचे शिल्पकार आहोत'
आबा,
हा शब्दच आभाळाएवढ्या काळजाइतका
युगानयुगे पुराव्या एवढ्या स्निग्ध उबेचा
आबा,
आमचं तसं बरं चाललंय
तुमच्या शब्दांच्या सावल्या आमच्या वाटेवर
आम्ही निघालो आहोत तुमच्याच वाटेवर..
तसं आबा म्हणजे एका क्रांतीचं नाव!
तसं आबा म्हणजे एका क्रांतीचं गाव!

– **उत्तम कांबळे**, नाशिक

# परतीच्या प्रवासाला असताना डार्विन भेटला



काल परवा एनसीईआरटीने
डार्विनला अभ्यासक्रमातून हद्दपार केल्याचे
डार्विनला कळले
तसा डार्विन एनसीईआरटीच्या पुस्तकातून
उठला अन् चालू लागला
दिल्लीच्या बाहेर तो पश्चिमेस राजस्थानच्या
दिशेने जात असताना दिसला
पश्चिमेलाच का?
मला त्याला चालताना पाहून प्रश्न पडला
मी जोरात त्याला हाक मारली
तो थबकला, मलाच विचारू लागला
'काय काम काढलंय, जोराने ओरडतोस!'
'तुमची बॅग, इत्यादी दिसत नाही, खाली हातानेच निघालात...'
मी विचारले त्याला
तसा डार्विन उत्तरला,
'खाली हातानेच तर आलो होतो, पण खाली डोक्याने नव्हे!'
आणि
डार्विन झपाझप पुन्हा पश्चिमेस चालू लागला...
मी दिल्लीत एनसीईआरटीच्या इमारतीखाली
उभा राहून
पुन्हा कोण कोण बाहेर पडते
वाट पाहत आहे....
काळाचा महिमा अगाध आहे

– **प्रभू राजगडकर**, नागपूर

# मार्ग...

कोणत्याही व्यवस्थेच्या विरोधात बोलायचं असेल
तर तुम्हाला प्रामाणिक रहावं लागेल
जर तुम्हीच प्रामाणिक नसाल तर,
व्यवस्थेच्या विरोधात बोलण्याचा हक्क विसरून
जावा लागेल

जे काही विरोधी कामे होतील
ते सहन करत रहावं लागेल
कितीही अन्यायी गोष्टी घडल्या इथे तरी
समाजासाठी झगडत असल्याचं सोंग करावं लागेल
स्वतः प्रामाणिक नसताना
समाजासाठी पूर्णपणे कामे करूच शकत नाही
करत असालही काही कामे
पण त्या कामांना काही अर्थ उरत नाही

अरे, तुम्हीच असाल भ्रष्ट,
तर व्यवस्थेविरुद्ध काय आवाज उठवणार?
व्यवस्थेविरुद्ध बोलायचंच असेल तर,
व्यवस्थेसारखं वागणं तुम्ही कधी सोडणार?

तुम्ही निष्कलंक असताना
करत असलेलं काम सार्थ ठरेल
तुम्ही असाल स्वतः भ्रष्ट
तर सगळेच निरर्थक ठरेल

बाबासाहेबाना आदर्श मानत असाल तर
त्यांचा कार्यकर्तृत्ववाद स्वीकारावा लागेल
चार पैशाच्या पायी विकाल स्वतःसोबतच
समाजाचीसुद्धा अस्मिता
तर बाबासाहेबांचं स्वप्न हे स्वप्नच ठरेल

– **जी. संदीप** (गोणार, नांदेड.)
९५५२८०३९८०

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460


# With Best Compliments





# Sos. Agrotech Pvt.Ltd

